# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १५/ २०१३** **दिनांक १८.१०.२०१३**
**स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शुक्रवार दिनांक १८.१०.२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४- ३१८७ / २०१३, दिनांक १५ ऑक्टोबर,२०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. परंतू सदरहू सभा काही अपरिहार्य कारणास्तव शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृह ऐवजी जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आलेली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-३२४९-२०१३, दिनांक १७ ऑक्टोबर,२०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले.

त्यानुसार सदरहू सभा शुक्रवार दिनांक १८ ऑक्टोबर, २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.अजय मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०८.१०.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.८०६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

---

**विषय नं.०२** **साई आश्रम भाग-०१ येथील वॉटर फाउंटनचे कामाकरीता प्राप्त झालेल्या सिलबंद निविदांवर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूदः-** अधिनियम कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतूद आहे.

**व्यवस्थापन समिती निर्णयः-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९/०२/२०१२ रोजीचे सभेत याबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र.२२१ संमत करण्यातआलेलाआहे. "यावर सविस्तर चर्चा होवून, लॅण्डस्केपींगचे कामासाठी येणारे एकूण रु.२,७३,७०,५००/- मात्रचे एकूण अपेक्षीत खर्चापैकी रु.१,४२,००,०००/- मात्र इतक्या अंदाजे खर्चाची सिव्हिल कामे मे.शापुरजी पालोनजी ॲण्ड कं. लि ; नाशिक यांचे कामाचे स्कोपमध्ये असल्याने निविदा शर्तीनुसार सदरची कामे त्यांचेकडून करुन घेणेस व त्यासाठी अंदाजे रु.२६,००,०००/- मात्र इतक्या अपेक्षीत वाढीव खर्चास, तसेच उर्वरीत रु.१,३१,७०,५००/- मात्र इतक्या अंदाजे खर्चाची कामांसाठी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे स्वतंत्रपणे निविदा मागविणेसाठी मान्यता देण्यात आलेली आहे."

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९/०२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२१ अन्वये रु.१,३१,७०,५००/- मात्रचे मंजुर रक्कमेपैकी साई आश्रम भाग-०१ व ०२ येथील वॉटर फाउंटन व इलेक्ट्रोमेकॅनिकल वर्क इ. चे कामासाठी एकूण रु.२६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार दि.०१/०४/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये याकामासाठी वर्तमापत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता घेण्यात आली. त्यानुसार कोरे निविदा फॉर्म विक्रीची मूदत दि.०१/०५/२०१३ ते दि.११/०५/२०१३ अशी ठेवण्यात आली होती. विहीत मूदतीत खालील ०४ ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

| | |
|---|---|
| ०१ | मे. नेलट्रॉनिक्स इक्युपमेंट कॉर्पोरेशन, पुणे |
| ०२ | इन्स्टॉलेशन इंडिया, पुणे |
| ०३ | निडीली एन्टरप्रायझेस, मुंबई |
| ०४ | प्रिमियर वर्ल्ड टेक्नॉलॉजी लि., कोलकता |

सदर कामाची निविदा पूर्व बैठक दि.१४/०५/२०१३ रोजी शिर्डी येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीस ०४ पैकी ०३ ठेकेदार उपस्थीत होते. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार मुद्द्यांचे स्पष्टीकरण सर्व ठेकेदार यांना दि.१८/०५/२०१३ रोजीचे पत्रान्वये तसेच ई मेलव्दारे दि.१८/०५/२०१३ रोजी पाठविण्यात आले होते. जाहिरातीनुसार सिलबंद निविदा सादर करणेसाठी ठेकेदार यांना दि.२३/०५/२०१३ अखेर पर्यंत मूदत देण्यात आली होती. विहीत मूदतीत खालीलप्रमाणे ०३ ठेकेदार यांनी सिलबंद निविदा सादर केलेली आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | मे. नेलट्रॉनिक्स इक्युपमेंट कॉर्पोरेशन, पुणे (०२ पाकिटे) | २९४१, २९४२ | २१/०५/२०१३ |
| ०२ | इन्स्टॉलेशन इंडिया, पुणे | २९६२ | २२/०५/२०१३ |
| ०३ | निडीली एन्टरप्रायझेस, मुंबई | ३०२२ | २३/०५/२०१३ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे सभेसमोर उघडण्यात येऊन निविदाधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव | निविदेतील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे. नेलट्रॉनिक्स इक्युपमेंट कॉर्पोरेशन, पुणे | ७,१८,३००/- | **७,०३,९३४/-** |
| ०२ | मे.निडीली एन्टरप्रायझेस, मुंबई | १०,७०,२८५/- | अनुपस्थित |
| ०३ | मे.इन्स्टॉलेशन इंडिया, पुणे | १५,३८,०५७/- | १४,६१,१५४/- |

**निर्णय क्र.८०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भाग-०१ येथील वॉटर फाउंटनचे काम करुन घेणेकरीता मे. नेलट्रॉनिक्स इक्युपमेंट कॉर्पोरेशन, पुणे यांचे रु.७,०३,९३४/- मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३ श्री साईबाबा मंदिर परिसराचे महाव्दारालगत सुरक्षा मोर्चे उभारणेकामी प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा उघडून निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव- ०१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधींचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

**०२) व्यवस्थापन समिती निर्णय:-** दि.१२/१२/२०१२ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सभेत समाधी मंदिर परिसरातील महाव्दारालगत सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा मोर्चे उभारणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र. ११०५ संमत करणेत आलेला आहे.

"प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मंदिर परिसराचे चारही महाव्दारांचे ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा मोर्चे उभारणीकरिता पोलिस उपअधिक्षक यांचेकडून सुरक्षा मोर्च्यांचे डिझाईन देण्यात येईल. त्यानुसार संस्थानमार्फत सुरक्षा मोर्चांची उभारणी करण्यात यावी. उपरोक्त कामी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. "

**०३) प्रस्ताव:-** मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी विभाग, शिर्डी यांचेकडील दि. १४/०२/२०१३ रोजीचे पत्राव्दारे सी. आय. एस. एफ. मुंबई यांचेकडून प्राप्त करुन घेणेत आलेल्या सुरक्षा मोर्चाचे डिझ ाईन व स्पेशिफीकेशन प्रमाणे मंदिर परिसराचे चारही महाव्दारांवर सुरक्षा मोर्चाची उभारणी करणे प्रस्तावीत आहे. सदरहु मोर्चे उभारणीकामी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन दि. २७/०४/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर निविदा मागविणेस मान्यता घेणेत आलेली आहे. निविदा सुचनेनुसार कोरे निविदा फॉर्म विकत घेणेची मुदत दि.१३/०५/२०१३ ते दि.२२/०५/२०१३ अखेर होती. सिलबंद निविदा सादर करणेची मुदत दि.२७/०५/२०१३ अखेर सायं. ०६.०० वाजेपर्यंत होती.

**अ)** विहीत मुदतीत खालील ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहे.

**ठेकेदार यांचे नांव व पत्ता**

०१) मे. रविंद्र रबर प्रॉडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर
०२) गायत्री एन्टरप्राईज, नाशिक
०३) पुजा आर्किट्रेक्चरल सिस्टीम प्रा. लि. सांताक्रुझ, मुंबई
०४) बोरकर पॉलीमर्स, कांदिवली (पूर्व) मुंबई.
०५) साई इंडस्ट्रीज, कोपरगांव

**ब)** विहीत मुदतीत खालीलप्रमाणे ठेकेदार यांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदार यांचे नांव व पत्ता | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे. रविंद्र रबर प्रॉडक्टस् अँण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | २९९७ / दि.२२/०५/२०१३ |
| ०२. | साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | ३२२४ / दि.२७/०५/२०१३ |
| ०३. | बोरकर पॉलीमर्स, कांदिवली (पूर्व) मुंबई. | ३३२६ / दि.२९/०५/२०१३ (उशिराने प्राप्त) |

**विभागाचा अभिप्राय/ मतः-** सुरक्षा मोर्चे उभारणेकामी विहीत मुदतीत वरिलप्रमाणे अ.नं. १ व २ अशा दोन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. अ.नं. ३ चे ठेकेदार बोरकर पॉलीमर्स, मुंबई यांनी उशीराने सिलबंद निविदा सादर केलेली आहे. तरी वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा उघडून त्यावर चर्चा/ वाटाघाटीव्दारे निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसराचे महाव्दारालगत सुरक्षा मोर्चे उभारणेकामी विहीत मुदतीत दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्यामुळे, सदरकामी प्रस्तावात नमुद केलेल्या पाचही ठेकेदारांकडून फेर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०४ श्री साईबाबांचे जिवन चरित्रावर आधारित तयार केलेल्या प्रसंग चित्रांना फ्रेम तयार करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून त्यावर चर्चा/ वाटाघाटीव्दारे निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे जिवन चरित्रावर आर्ट गॅलरी तयार करणेकामी आर्टिस्ट, श्री.व्ही.व्ही.सपार, सोलापूर, श्री.सुनील शेगांवकर, पुणे, श्री.हेमंत वाणी, शिर्डी व श्री. राजेंद्र जाधव, पुणे यांचेकडून ६ फुट x ४ फुट या आकारात एकूण ४५ जविन चित्र तयार करुन घेण्याचे मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये ठरले आहे. त्यानुसार वरिल आर्टिस्ट यांचेकडून विविध प्रसंगावर आधारित एकूण २० प्रसंगचित्र तयार करुन घेणेत येवून संस्थान परिसरात बसविणेत आलेले आहेत.

सदरचे चित्रांवर वातावरणातील धुलीचे कण, हवेतील बाष्प यामुळे परिणाम होऊन चित्रे खराब होण्याची शक्यता आहे. याकरीता पहिल्या टप्प्यात मा. व्यवस्थापन समितीचे दि.१२/०६/२०११ चे सभेतील नि.क्र.३९९ अन्वये ८ चित्रांना फायबर फ्रेम करुन घेणेत आलेली आहे. उर्वरीत १२ प्रसंग चित्रांना सिथेटिक फायबर फ्रेम तयार करणेकरीता अंदाजे रु.१,८०,०००/- मात्र खर्चास व सदरचे काम अशा प्रकारचे काम करणारे ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागावून करुन घेणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०८/२०१२ रोजीचे सभेतील नि.क्र. ६७० अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार अशा प्रकारचे काम करणारे ठेकेदार यांचेकडून जा.क्र. ४०४३ दि.०६/१२/२०१२ अन्वये कोटेशन मागविण्यात आली असून प्राप्त झालेल्या सिलबंद कोटेशन्सचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठेकेदारांचे नांव | आवक क्र. व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | ओम आर्टस् , मुंबई | १९३१७ दि.१६/०३/२०१३ |
| ०२. | मोहसीनलीज फ्रेम्स, पुणे | ११२३ दि.१९/०४/२०१३ |
| ०३. | इंसियाह क्रिएशन, पुणे | ११२४ दि.१९/०४/२०१३ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद कोटेशन्स आजचे सभेसमोर उघडण्यात येऊन कोटेशन्सधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता तीनही कोटेशनधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी अनुपस्थित होते. त्यांनी कोटेशनमध्ये दिलेले मुळ दर खालीलप्रमाणे-

**<u>तपशिल-</u>** खालील फोटोकरीता ४" x १.१/२" साईजची सिथेंटीक फायबर फ्रेम, मोल्डींग पट्टी पाठीमागील बाजूस ३ एम.एम. जाडीचा एम.डी.एफ. बोर्ड योग्य त्या सपोर्टसह बसवून ६' x ४' साईज फोटोकरीता ३ एम.एम.जाडीची व ७'-४" x ५' करीता ४ एम.एम.जाडीची प्लेन काच बसवुन, २" कापडाचे माऊंटींगसह फ्रेम तयार करुन भिंतीस फिट करणे.

**अ.**६' x ४' (३ एम.एम.जाडीची काच )- ११ नग

**ब.** ७'-४" x ५'-०" (४ एम.एम.जाडीची काच) - ०१ नग

| अ.नं | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | ओम आर्टस् , मुंबई | २,१८,१२५/- | अनुपस्थित |
| ०२ | मोहसीनलीज फ्रेम्स, पुणे | १,६४,२५०/- | अनुपस्थित |
| ०३ | इंसियाह क्रिएशन, पुणे | १,७८,८७५/- | अनुपस्थित |

**निर्णय क्र.८०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांचे जिवन चरित्रावरील प्रसंग चित्रांना उपरोक्त नमुद केलेल्या साईजप्रमाणे फ्रेम तयार करणेकामी मोहसीनलीज फ्रेम्स, पुणे यांचे रु.१,६४,२५०/- मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०५** **मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मध्ये वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थान बांधकाम ठेकेदार मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि. मुंबई यांचे लवादाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियमाचे कलम २१ (१) विश्वस्त व्यवस्था विनियोग चे अंतर्गत असून कलम २१ (१) प्रमाणे समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करता येईल अशी तरतुद असून, अधिनियम " २१ (१) (छ) प्रमाणे कोणत्याही न्यायालयाचा किंवा लवाद न्यायाधिकरणाचा किंवा कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमा." याचा समावेश प्रमुख तरतुदीमध्ये केलेला आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९/०७/२००९ चे सभेत निर्णय क्र. ६३७.

**प्रस्ताविक:** संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. १६९ मधील जागेत संस्थानचे वर्ग ०४ कर्मचारी यांचे निवासाकरीता १२ इमारतींमध्ये ९६ सदनिकांचे बांधकाम सन २००७ मध्ये पूर्ण करण्यात आले असून, सदरहू सदनिका संस्थान कर्मचाऱ्यांना निवासासाठी देण्यात आलेल्या आहेत. ठेकेदार अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि.,मुंबई यांचे काम दि. १५/०८/२००७ रोजी पुर्ण झाल्यानंतर व ठेकेदार यांनी अंतिम बिलातील त्रुटींची पुर्तता केल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. २१६/७ दि. १६.०३.२००८ अन्वये मंजूरी नंतर अंतिम बिल अदा करण्यात आले आहे.

त्यानंतर ठेकेदार यांनी दि.०१.०४.२००९ चे पत्रान्वये अंतिम बिल व सुरक्षा ठेव स्वीकारलेनंतर रु.२,०७,५०,४४१.०० मात्र इतक्या अतिरीक्त रकमेची मागणी केली असून सदर रक्कम पंधरा दिवसाचे आत न मिळाल्यास आर्बिट्रेशनमध्ये जाणेबाबत कळविले होते.

याबाबत सदरहू प्रकल्पाचे आर्किटेक्ट भालचंद्र चावरे, नाशिक यांची Arbitrator म्हणून नेमणूक करणेस व संस्थानचे कायदेविषय सल्लागार एस.डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचा सल्ला घेऊन पुढील कार्यवाही करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९/०७/२००९ चे सभेत प्रस्ताव अवलोकनार्थ ठेवण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ६३७ अन्वये सदरहू बाबतीत कायदेशीर सल्ला घेवून त्यानुसार उचित कार्यवाही करणेत यावी असे ठरले आहे.

ठेकेदार अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचे दि.१४/११/२००९ व ०४/१२/२००९ रोजीचे पत्राबाबत दिनांक ०२/०१/२०१० रोजी याबाबत सविस्तर चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, "ठेकेदार यांना संस्थानचे म्हणणे यापुर्वीचे पत्रव्यवहाराव्दारे कळविले आहे. तरी सुध्दा ठेकेदार यांना कोर्टात जावयाचे असल्यास त्यांचा प्रश्न आहे. त्यांना पुनःश्च पत्र देण्याची आवश्यकता वाटत नाही अशी चर्चा झाली आहे.

दि. १२ जानेवारी, २०११ रोजीचे पत्रान्वये, ॲड. बकुल बी. भोसले, मुंबई यांनी ठेकेदार मे. अस्मिता इंडीया लि, मुंबई (मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन) यांचे वतीने उच्च न्यायालय, मुंबई मध्ये दावा नं. १४२-२०१० दाखल केला असल्याचे व सदर दाव्याची सुनावनी दि. १४ जानेवारी, २०११ पूर्वी मा. न्यायाधिश, एस. जे. वजीफदर यांचे समोर होणार असल्याने आपणांस इच्छा असल्यास हजर रहावे असे कळविले आहे. सदर पत्र संस्थानला आवक नं. ३५७९२ दि. २० जानेवारी, २०११ रोजी प्राप्त झाले आहे. पाठोपाठ दि. १९.०१.२०११ चे पत्राने त्यांनी सदर मॅटर ॲडमिशन सुनावणीसाठी कधीही येऊ शकते. अर्जाची प्रत यापूर्वीच पाठविली असल्याचे कळविले आहे. सदर (आ. क्र. ३५९८२ दि. २२.०१.२०१० रोजी संस्थानला प्राप्त आहे.)

याबाबत दि.०५ फेब्रुवारी, २०११ रोजी संस्थानचे कायदे विषयक सल्लागार, ॲड. एस. डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचेशी प्रकरणी चर्चा करून, सदर प्रकरणाची एक छायांकीत प्रत त्यांचेकडे सुपुर्त करणेत आली. ॲड. एस. डी. कुलकर्णी, कोपरगांव यांनी याबाबत एक-दोन दिवसात सल्ला देतो असे सांगीतले.

मात्र दरम्यान इंटरनेटव्दारे प्रस्तुत प्रकरणाची माहिती प्राप्त केली असता, मा. उच्च न्यायालय, मुंबई मा. न्यायाधिश, एस. जे. वजीफदर, यांचे समोर दि. २४ जानेवारी, २०११ रोजी प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी झाली. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी श्री. परेश कपाडीया यांची संस्थान करीता Arbitratior म्हणून व ठेकेदार यांचे वतीने एन. ए. बढेका यांची Arbitratior म्हणून नियुक्ती करण्यात येत असल्याचे ऑर्डर झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे सुनावणी बाबत संस्थानचे कायदे विषयक सल्लागार, ॲड. एस. डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचेकडे प्रकरणाचे कागदपत्रासह कोपरगांवी जाऊन सल्ला घेण्यात आला असून, त्याबाबत त्यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

In the above matter I have gone through Arbitration application no 142/ 2010 preferred in High Court. I have seen order dt. 24/1/2011 passed by Hon. High Court. It seems that in our absencry the order is passed. I have gone through the notice which is received by us on 20/1/2011. It

seems that the notice is very short and we had no opportunity to appear in the matter.

Considering the Suituation it is better that we should face the Arbitration inquiry.

संस्थानचे वतीने उपरोक्त प्रकरणात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथिल कामकाजात व आर्बिट्रेशनचे कामकाजात ॲड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड. अमृत वेरनेकर, मुंबई यांचे सल्ल्याने पुढील कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २७/०२/२०११ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्रमांक १८६ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"उपरोक्त कादेशीर कारवाई करणेकामी ॲड. सचिन शानबाग व ॲड. अमृत वेरनेकर, मुंबई यांची नियुक्ती करणेस तसेच त्यांचे सल्ल्याने Arbiration ची नेमणूक करणेस व त्यांची फी अदा करणेस मान्यता देण्यात आली.

सदरहू लवादाबाबत संस्थानचे वतीने ॲड. सचिन शानबाग, मुंबई व Arbitrator म्हणून डॉ. महाशब्दे हे काम पहात आहेत. सदरहू प्रकरणी Presiding Arbitrator नेमणूकीसाठी दिनांक १३ जानेवारी, २०१२ रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधिश, मा. डी. के. देशमुख यांचेसमोर सुनावणी होऊन मुंबई व अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधिश, Justice Ferdino I. Rebello यांची Presiding Arbitrator म्हणून नेमणूक झाली आहे.

Presiding Arbitrator यांनी दिनांक ०१ मार्च, २०१२ रोजीचे Procedural Order ०१ (vii) अन्वये ठरल्यानुसार खालील प्रमाणेचे शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

(vii) Arbitrators fees are fixed as under-

e) Reading charges Rs.1,00,000/- (Rs. One lakhs only) to be paid by each party to each arbitrator.

f) Sitting fee Rs.1,00,000/- (Rs. One lakhs only) per sitting of upto 3 hrs or paart thereof per arbitrator to be shared equally by the claimant and respondents.

g) Each party to deposit initially a sum of Rs.7,500/- (Rs. Seven thousand five hundred only) with presiding arbitrator ans Rs.5,000/- (Rs. Five thousand only) with each co arbitrator, towards administrative expenses.

h) Each party to deposit initially a sum of Rs.3,07,500/- (Rs. Three lakhs Seven thousand five hundred only) with presiding arbitrator ans Rs. 3,05,000/- (Rs. Three lakhs Five thousand only) with each co arbitrator, towards reading fee, hearing/seating fee and administrative charges for the current sitting and next three sittings after deducting TDS along with administrative charges (without deducting TDS) on or before 4 th April 2012.

त्यानंतर Presiding Arbitrator Justice, Ferdino I. Rebello यांनी Procedural Order 04 (ii) अन्वये उपरोक्त फीमध्ये खालील प्रमाणे शुल्क कमी करण्यात आल्याचे कळविले आहे.

The Application by the claimants for reduction of fees is considered. Respondent has raised the issue of non deposit of fee by the claimants. Considering the discussion in the tribunal and the application by the claimants, that objection is rejected. The fees are revised to 60,000/- per sitting to be shared equally by the parties.

**(अ)** आतापर्यंत Tribunal च्या एकूण ०५ सिटींग झालेल्या असून त्यांना खालील प्रमाणेचे शुल्क अदा करण्यात आलेले आहे.

| अ. नं. | नांव | कामाचा तपशिल | आदा करणेत आलेले शुल्क रु. |
|---|---|---|---|
| ०१ | Justice Mr. F.I. Rebello, (Presiding Arbitrator) | रिडींग शुल्क, सुनावणी शुल्क, प्रशासन शुल्क इ. प्रित्यर्थ | १,०७,५००/- |
| | | दि.२२/१०/२०१२, २३/१०/२०१२, ०८/०१/२०१३, ०९/०१/२०१३ व दि. १०/०१/२०१३ बैठकीसाठी रुपये ६०,०००/- प्रती ०३ तासा करीता एकुण ०५ मिटींगसाठी अदा केलेले शुल्क | ३,००,०००/- |
| ०२ | Dr. Krishnabhushan Eknath Mahashabde, Nashik Co-Arbitrator | रिडींग शुल्क, सुनावणी शुल्क, प्रशासन शुल्क इ. प्रित्यर्थ | १,०५,०००/- |
| | | दि.२२/१०/२०१२,२३/१०/२०१२, ०८/०१/२०१३, ०९/०१/२०१३ व दि. | ३,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | Shri. N. A. Badheka, Mumbai (Co- Arbitrator) | १०/०१/२०१३ बैठकीसाठी रुपये ६०,०००/- प्रती ०३ तासा करीता एकुण ०५ मिटींगसाठी अदा केलेले शुल्क | १,०५,०००/-<br>३,००,०००/- |

**(ब)** तसेच संस्थानचे वतीने लवादाचे काम पहात असलेले ॲड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड. अमृत वेरनेकर, मुंबई यांनी मागणी केलेल्या फी बाबत सल्लागार, श्री. बी. एस. पाटील, पुणे यांचेकडून अभिप्राय मागविणेत आला असता, त्यांनी दि. ०३ एप्रिल, २०१२ रोजीचे ई-मेल पत्राव्दारे सदरहू फी योग्य असलेबाबतचा अभिप्राय दिला होता. त्यानुसार त्यांना आजपावेतो खालील प्रमाणेची फी अदा करणेत आली आहे.

| अ. नं. | कामाचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयात सुनावणीसाठी दि.१०.०३.२०११, ११.०३.२०११, १८.०३.२०११ आणि ३१.०३.२०११ रोजी उपस्थीत राहून संस्थानची बाजू मांडली. | १,५०,०००/- |
| ०२ | Written statement and counter claim. | १,००,०००/- |
| ०३ | Attending each Arbitration meeting @ of Rs. 90000/- for each seating = 4 seating | ३,६०,०००/- |
| ०४ | Payment for appearance in Arbitration Petition No. 58 of 2011 | ६०,०००/- |
| | एकुण रुपये- | ६,७०,०००/- |

**<u>मागणी:</u>** यानंतर दिलेल्या सेवेसाठी ॲड. सचिन शानबाग, मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक दिनांक ०५ मार्च, २०१३ रोजीचे पत्राने केलेल्या कामापोटी खालील प्रमाणेचे शुल्क मिळणेबाबत विनंती केली आहे.

| **Bill No.** | **Description** | **Amount** |
|---|---|---|
| 1. | Holding various Conferences with you and Mr.Dinkar Desai- Sectional Engineer & Mr.Gavane –Engineer of Shri Saibaba Sansthan Trust (Shirdi) including reading charges of various files pertaining to the matter. (from the date of inception till date) (@ of Rs.5000/- per meetings)<br>**<u>Note:-</u>** All the abovementioned meetings held on following dates:- 01/03/2012, 18/06/2012, 26/07/2012, 21/08/2012, 22/10/2012 and 23/10/2012, 08/01/2013, 09/01/2013 and 10/01/2013 many other days before attending arbitration tribunal and also after arbitration meetings and during drafting written statements and counter claim and also during application filed by the claimants for challenging jurisdiction of the arbitration tribunal under Section 16 of Arbitration and Conciliation Act. (more than 15 meetings) | 50,000.00 |
| 2. | Studying the Claimants Applications dated 21/8/2012 pertaining to the objection to the Jurisdiction of Arbitral Tribunal to entertain the Respondents Counter-Claims & drafting and filing reply of the Respondents dated 24/7/2012 including research on the subject.<br>**<u>Note:-</u>** The said application filed by the Claimant against the Respondent for the purpose of apposing Counter Claim filed by the Respondent on want of jurisdiction for which they have filed separate application which Respondent have apposed the same by filing their necessary reply and also advancing arguments with the support of reported judgments and citations and after hearing both the parties the Learned Arbitrators have rejected Claimants Application and allowed Respondent to file their counter claim for the sum of **<u>Rs. 13500000/-</u>** | 40000.00 |
| 3. | Dictating & Preparing fair of the Written Statement and Counter –Claim both dated 24/05/2012 & Compilation of documents in all 6 Volumes from 14th May to 24rd May @ Rs 40,000/- Per Day .Therefore 10 days<br>**<u>Less :- Advance fees received Rs.1,00,000/-</u>**<br>**<u>Note:-</u>** The written statement and volume of matter initially was very small when Claimant served the first | 3,00,000.00 |

| | | |
|---|---|---|
| | Application upon the Respondent, however the said Claimant thereafter have served almost six volumes containing almost 3000 pages for their claim of **<u>Rs. 2,07,50,441/-</u>** against the Respondent which need to deny very minutely with the support of documents made and executed between the parties and with the complete instruction from Respondents office bearers which took very long time, however we have covered almost each and every point of Claimants raised in their Application and denied the same in detail with the help of Mr.Dinkar Desai- Sectional Engineer & Mr.Gavane – Engineer of Shri Saibaba Sansthan Trust (Shirdi). It is pertinent to note that Respondent have filed their counter claim of Rs.1,35,00,000/- against the Claimant with support of document and contract made and executed between Respondent and Claimant. It is pertinent to note that due to the large number of documents and volumes involved in the said application Respondent sought extension of time to file their Written Statement which was granted by the Arbitrational Tribunal which read as under:- | |
| 4. | Preparation, Filing and Service of Affidavit of Evidence in lieu of Examination Chief of Shree Dinkar Manohar Desai of the Respondents dated 15/10/2012 – Total 63 Pages (Days consumed – 6 days @ 40,000/- per day ) including working on holiday (Sunday) i.e. 13/10/2012 **<u>Note:-</u>** As directed by the Learned Arbitrators the Respondent have filed their Affidavit of Evidence in lieu of Examination Chief of Shree Dinkar Manohar Desai of the Respondents in support of their counter claim and also in denial of claim made by the Claimant in the their Application. The said Affidavit was prepared on very urgent basis as it consume very long time (daily 12 hours) The said affidavit covers not only denial of application made by the Claimant but also covers Respondents Counter Claim. It is also note that Claimant have filed their written Affidavit of Claim and also filed their written affidavit of evidence as directed by the Arbitration Tribunal. | 240000.00 |
| 5. | Attending the Arbitration hearings on 01/03/2012, 18/06/2012, 26/07/2012, 21/08/2012, 22/10/2012, 23/10/2012, 08/01/2013, 09/01/2013 and 10/01/2013 @ 60,000/- Per Hearing. (total 9 days) Less Rs. 3,60,000/- **<u>Note:-</u>** In the said matter as directed by the Arbitrational Tribunal Respondent has deposited their tribunal fees in time, however the Claimant thereafter have filed application for reduction of fees which was considered by the Arbitral Tribunal order passed to that effect as follows:- | 180000.00 |
| | **Total Payable Amount Rs.** | **8,10,000.00** |

उपरोक्त प्रमाणे ॲड. सचिन शानबाग, मुंबई व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड. अमृत वेरनेकर, मुंबई यांनी कायदेविषयक सेवा दिलेली आहे. तसेच सदरहू प्रकरणी पुढेही त्यांचे सेवेची आवश्यकता आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय:</u>** विषयांकीत कामासाठी ॲड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड. अमृत वेरनेकर, मुंबई यांनी मागणी केलेली फी कमी करावी असे वाटते. तसेच त्यांचे सेवेची यापुढेही आवश्यकता असल्याने, त्यांचे सेवेचे दर निश्चित होणेबाबत त्यांचेशी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे चर्चा करुन निर्णय घेता येईल.

**निर्णय क्र.८१० मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मध्ये वर्ग ०४ कर्मचारी निवासस्थान बांधकाम ठेकेदार मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि. मुंबई यांचे लवादाबाबत संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲड. सचिन शानबाग आजचे सभेसमोर उपस्थित होते, त्यांचे बरोबर समितीने सदर लवादाबाबत चर्चा केली व त्यांच्या सेवेचे दर कमी करणेबाबत विनंती केली असता, ॲड. सचिन शानबाग यांनी सेवेचा दर कमी करणेबाबत त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड.अमृत वेरनेकर, मुंबई यांचेशी चर्चा करुन संस्थानला तसे कळविणेत येईल, असे सांगितले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०६ श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागात युरोलॉजी शस्त्रक्रियेकरीता सर्जीकल साहित्य खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटरमध्ये युरोलॉजीच्या शस्त्रक्रिया करणेसाठी सर्जिकल साहित्यांची उदा. Guide wire, Amplatz sheath etc. ची आवश्यकता आहे. कारण सदर साहित्यांची वार्षीक औषधे खरेदी (२०१२-२०१३) मध्ये मागणी नसल्यामुळे त्यांनी दि.२९/१०/२०१२ (औषध भांडार विभागास प्राप्त दि.०१/१२/२०१२) चे मागणीपत्रान्वये खालील सर्जिकल साहित्यांची मागणी केलेली आहे.

सदर सर्जिकल साहित्य खरेदीकामी M/s. Cook Urology, Pune या कंपनीचे अधिकृत विक्रेते M/s. Shree Enterprises, Pune यांचेकडुन अंदाजे खर्चासाठी दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Cook Urology, Pune यांनी त्यांचे अधिकृत विक्रेते M/s. Shree Enterprises, Pune µांचे मार्फत दि.१५/०१/२०१३ चे ई-मेल पत्रान्वये खालील लागणाऱ्या सर्जिकल साहित्यांचे दर दिलेले आहे.

| Sr. No. | Name of item | Qty | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | 18 x 11 cm Two Part Trocar Needle | 03 | 756.00 | 2268.00 |
| 2. | Hiwire Cook Guide Wire 0.35 x 150 (Hydrolice Coating) | 15 | 3675.00 | 55125.00 |
| 3. | Hiwire Cook Guide wire 0.38x150 (Hydrolice Coating) | 10 | 3675.00 | 36750.00 |
| 4. | Cook Extra stift Guide wire 0.38 x 145 | 05 | 1785.00 | 8925.00 |
| 5. | 20 FR 16 cm Amplatz Sheath | 05 | 1270.50 | 6350.00 |
| 6. | 28 FR 16 cm Amplatz Sheath | 05 | 1270.50 | 6350.00 |
| 7. | 30 FR 16 cm Amplatz Sheath | 05 | 1270.00 | 6350.00 |
| 8. | 34 FR 16 cm Amplatz Sheath | 03 | 1270.50 | 3811.50 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **125929.50** |

वरील प्रमाणे सर्जिकल साहित्य खरेदीकामी अंदाजे रु.१२५९३०/- इतका खर्च येणार आहे.

दि. २६/०२/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र. २४७ अन्वये उपरोक्त सर्जिकल साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. १२५९३०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ७७ दि.०१/०४/२०१३ अन्वये एकुण ०७ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडुन दि.१५/०४/२०१३ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालील प्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झालेले आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे -

०१. M/s. Shree Enterprises, Pune
(प्रशासन शाखेकडुन टपालातुन उघडुन आलेले कोटेशन प्राप्त दि.०९/०४/२०१३)

०२. M/s. Jeevan Health Care India, Ahmednagar
(सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१९/०४/२०१३)

०३. M/s. Eagle Medical Systems Pvt Ltd., New Delhi
(सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२०/०४/२०१३)

०४. M/s. Cook India Medical Devices Pvt. Ltd., Cehnnai
(दि.२६/०४/२०१३ रोजीचे ई- मेल पत्र )

उपरोक्त कोटेशन पैकी अ.नं. ३ चे कोटेशन हे मुदतीनंतर प्राप्त झालेले असून ते तुलनात्मक दर मिळवण्याच्या दृष्टीने त्याचा उपयोग होईल.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ कोटेशन्सपैकी बंद पाकिटात असलेले ०२ कोटेशन्स आजचे सभेसमोर उघडण्यात येऊन, चारही कोटेशन्सधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| Sr. No. | Description | Qty. | M/s. Shree Enterprises, Pune | | M/s. Jeevan Health Care India, Ahmednagar | | M/s. Eagle Medical Systems Pvt Ltd. New Delhi | | M/s. Cook India Medical Devices Pvt. Ltd. Chennai | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 1 | 18 x 11 cm Two Part Trocar Needle | 3 | 765.00 | Absent | 850.00 | 850.00 | 990.68 | Absent | **756.00** | Absent |
| 2 | Hiwire Cook Guide Wire 0.35 x | 15 | 753.00 | | 3750.00 | 3750.00 | 964.00 | | **735.00** | Absent |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 150 (Hydrolic e Coating) | | | | | | | | | |
| 3 | Hiwire Cook Guide wire 0.38 x 150 (Hydrolic e Coating) | 10 | 753.00 | Absent | 3750.00 | 3750.00 | 964.00 | Absent | **735.00** | Absent |
| 4 | Cook Extra stift Guide wire 0.38 x 145 | 5 | 1640.00 | Absent | 1390.00 | **1390.00** | 1874.00 | Absent | 1785.00 | Absent |
| 5 | 20 FR 16 cm Amplatz Sheath | 5 | 1293.00 | Absent | 1390.00 | 1390.00 | 1660.00 | Absent | **1286.00** | Absent |
| 6 | 28 FR 16 cm Amplatz Sheath | 5 | 1293.00 | Absent | 1390.00 | 1390.00 | 1660.00 | Absent | **1286.00** | Absent |
| 7 | 30 FR 16 cm Amplatz Sheath | 5 | 1293.00 | Absent | 1390.00 | 1390.00 | 1660.00 | Absent | **1286.00** | Absent |
| 8 | 34 FR 16 cm Amplatz Sheath | 3 | 1293.00 | Absent | 1390.00 | 1390.00 | 1660.00 | Absent | **1286.00** | Absent |

**निर्णय क्र.८११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत खरेदीकामी निविदाधारकांनी Cook कंपनीचेच दर दिलेले असून, त्यामध्ये अ.नं. ४ करीता M/s. Jeevan Health Care India, Ahmednagar व अ.नं.१,२,३,५,६,७ आणि ८ या करीता M/s. Cook India Medical Devices Pvt. Ltd. Chennai यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०७** **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरिता मशिनरी/ उपकरणे खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील E.N.T. OPD मध्ये अन्न नलिकेतील अनावश्यक (विषारी) पदार्थ काढण्यासाठी Suction Machine ची आवश्यकता असते. सध्या त्यांच्याकडे असलेले Suction Machine हे वापरुन खराब झालेले आहे. तसेच E.N.T. OPD मध्ये E.N.T O.P.D Unit चे फ्युज वारंवार खराब होत असल्यामुळे व सध्या सदर Unit ला Voltage Stabilizer (२ KVA) नसल्यामुळे त्यांनी दि.०२/११/२०१२ चे पत्रान्वये नवीन Voltage stabilizer (२ KVA) ची मागणी केलेली आहे.

तसेच ऑपरेशन थिएटरमध्ये शस्त्रक्रिया केल्या नंतर काही इन्स्ट्रुमेंट निर्जतुकीकरण करणेसाठी Formalin Vaporizer ची आवश्यकता असते. सध्या त्यांचेकडे असलेले Formalin Vaporizer हे वापरुन खराब झालेले आहे. त्यामुळे त्यांनी दोन प्रकारच्या Formalin Vaporizer ची दि.२३/०८/२०१२ चे पत्रान्वये मागणी केलेली आहे.

खालील मशिनरी / उपकरणे खरेदीकामी अंदाजे रु. ११२०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Name of Item | Qty | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. | Dept. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Formalin Vaporizer Length 66cm Height 30 cm Width 30 cm (26" x 12" x 12") | 6 | 6000.00 | 36000.00 | Surgical O.T |
| 2. | Formalin Vaporizer Length 66cm Height 22 cm Width 21 cm (27" x 9" x 8") | 6 | 6000.00 | 36000.00 | Surgical O.T |
| 3. | Electric Portable suction machine with Two bottles | 2 | 10000.00 | 20000.00 | ENT OPD |
| 4. | Voltage Stabilizer (2 KVA) | 2 | 10000.00 | 20000.00 | ENT OPD |
| | | | **Total Amt. in Rs.** | **112000.00** | |

उपरोक्त प्रमाणे मशिनरी/ उपकरणे खरेदीकामी अंदाजे रु.११२०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ९९७ दि.२५/०५/२०१३ अन्वये एकुण ०९ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडुन दि.१५/०६/२०१३ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसुरुन खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

०१. M/s. Purnima Surgical Enterprise, Nashik
(प्रशासन शाखेडकडुन उघडून आलेले कोटेशन प्राप्त दि.१२/०६/२०१३)
०२. M/s. S.K. Agencies, Dhule (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१७/०६/२०१३)
०३. M/s. Kalelkar Surgicals Industries, Mumbai
(ई-मेल कोटेशन प्राप्त दि.२८/०६/२०१३)
०४. M/s. Tejas Electronics, Ahmednagar (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.०३/०७/२०१३)

उपरोक्त अ.नं. १ हे कोटेशन मुदतीत प्राप्त झालेले असून उर्वरीत अ.नं. २, ३ व ४ हे कोटेशन मुदतीनंतर प्राप्त झालेले आहे. परंतु तुलनात्मक दर मिळविण्याच्या दृष्टीने त्याचा फायदा होऊ शकेल त्यामुळे चारही कोटेशन विचारात घ्यावे असे मत आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ कोटेशन्सपैकी बंद पाकिटात असलेले ०२ कोटेशन्स आजचे सभेसमोर उघडण्यात येऊन, चारही कोटेशन्सधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| Sr. No. | Description | Qty. | M/s. Purnima Surgical Enterprise, Nashik | | | M/s. S.K. Agencies, Dhule | | | M/s. Kalelker Surgicals Industries, Mumbai | | | M/s. Tejas Electronics, Ahmednagar | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 1 | Formalin Vaporizer Length 66cm Height 30 cm Width 30 cm (26" x 12" x 12") | 6 | 3 Tray | 7550.00 | Absent | Vardhman Surgicreft (Gujrat) | **5500/-** | Absent | | | Absent but 10% Discount given by Email Letter | | | |
| | | | 4 Tray | 8050.00 | | | - | | | | | | | |
| 2 | Formalin Vaporizer Length 66cm Height 22 cm Width 21 cm (27" x 9" x 8") | 6 | 3 Tray | 4750.00 | Absent | | **4500/-** | Absent | | | | | | |
| 3 | Electric Portable suction machine with Two bottles Noiseless | 2 | Fairdeal | 8660.00 | Absent | | **6800/-** | Absent | 44.D006 | 14375.00 | 12937.5 | | | |
| 4 | Voltage Stabilizer (2 KVA) | 2 | | | | | | | | | | **Tejas** | **7312.00** | **7312.00** |
| | | Warranty | | | | | | | | | | | 2 Year | |

**निर्णय क्र.८१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा विचार करता तक्त्यातील अ.नं. १ ते ३ करीता M/s. S.K. Agencies, Dhule यांचे निम्नतम दर व अ.नं.४ करीता M/s. Tejas Electronics, Ahmednagar यांचे एकमेव दर प्राप्त झालेले आहे ते दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच, याकामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.८८,२२४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०८** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेश खरेदीकामीचे कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांना सन २०१० मध्ये गणवेष वापरण्यासाठी देण्यात आले होते परंतु सदरचे गणवेष रोजच्या वापरामुळे वापरुन फाटलेले/खराब झालेले आहेत त्यामुळे साईनाथ रुग्णालयाने दि.२१/०१/२०१२ अन्वये गणवेषाची मागणी केलेली आहे तसेच श्री साईबाबा रुग्णालयाने दि.२०/०३/२०१२ अन्वये गणवेषाची मागणी केली आहे. गणवेषाची रक्कम धरताना दोन वर्षापुर्वी खरेदी केलेल्या किंमतीवर २० % वाढ गृहीत धरुन ते केवळ हिशोबासाठी धरणेत आलेले आहे. प्रत्यक्षात निविदामध्ये प्राप्त होणारे दर हया पेक्षा वेगळे येण्याची शक्यता आहे.

उपरोक्तप्रमाणे दोन्ही रुग्णालयाच्या सर्व कर्मचाऱ्यांना गणवेष खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रक्कम रु.३,४४,५९४/- चे खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा १८/०७/२०१२ नि.क्र.६०० अन्वये मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन इकडील पत्र क्र.२४६० दि.१४/०८/२०१२ अन्वये एकुण १५ पुरवठा धारकांना कोटेशन पत्र पाठविण्यात आले होते. कोटेशन स्विकारणेची अंतिम तारीख ३१/०८/२०१२ अखेर होती त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे एकुण ६ पुरवठाधारकांचे कोटेशन व नमुने प्राप्त झालेले होते.

सदरहु सहा सिलबंद कोटेशनपैकी एका कोटेशनवर मे.जयहिंद कलेक्शन,अहमदनगर त्यांचे फर्मचा शिक्का व सही नसल्याचे आढळुन आलेले नव्हते त्यामुळे त्याचा विचार करण्यात आला नव्हता. तर उर्वरीत पाच कोटेशन हे मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे दि. ०८.१२.२०१२ रोजी समक्ष उघडण्यात आलेली होती. त्याचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो दि.२६/०२/२०१३ रोजी मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी सादर करण्यात आला होता.

यावर चर्चा होऊन श्री साईबाबा आणि श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता गणवेष खरेदी करणेसाठी सामान्य प्रशासन विभागाकडे नेमणुक करणेत येणाऱ्या ड्रेस डिझाईनरच्या सल्याने कापडाची कंपनी, रंग, व कोड नंबर यांची निवड करुन कापड उत्पादक कंपनीकडुन/अधिकृत विक्रेत्याकडून विहीत पध्दतीने कापड खरेदी करणेत यावे व तद्नंतर फक्त गणवेष शिलाईसाठी कोटेशन मागविणेत येऊन, कर्मचाऱ्यांची मापे घेऊन, गणवेष तयार करणेत यावे, असे ठरले. त्यानुसार मा.कार्यकारी अधिकारी साहेब व उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी दि.३०/०३/२०१३ रोजी अहमदनगर येथील रेमंड कंपणीचे शोरुममध्ये समक्ष सर्व कापडाचा नमुना निवडून मा. जिल्हाअधिकारी साहेब यांचेशी चर्चा करुन मान्य करुन घेतलेला आहे. रेमंड कंपनीचे अहमदनगर येथील शोरुम तसेच त्याच कंपनीचे व कापडाच्या नमुन्याचे पुणे व मुंबई येथुन कापडाचे व शिलाईचे कोटेशन समक्ष आणलेले आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

**कापड खरेदीबाबतचे कोटेशन.**

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त स्थिती | प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मे.हिंद फॅब्रीक, पुणे | बंद स्थिती | ०८/०५/२०१३ |
| २ | मे.महेंद्रकुमार ॲन्ड कंपनी,मुंबई | बंद स्थिती | ०८/०५/२०१३ |
| ३ | मे.एवंती रिटेल सोल्युशन प्रा.लि.,अहमदनगर | बंद स्थिती | ०८/०५/२०१३ |

**शिलाई धारकाचे कोटेशन.**

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त स्थिती | प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मे.हिंद फॅब्रीक, पुणे | बंद स्थिती | ०८/०५/२०१३ |
| २ | मे.महेंद्रकुमार ॲन्ड कंपनी,मुंबई | बंद स्थिती | ०८/०५/२०१३ |
| ३ | मे.एवंती रिटेल सोल्युशन प्रा.लि., अहमदनगर | बंद स्थिती | ०८/०५/२०१३ |

उपरोक्तप्रमाणे कापड खरेदीबाबतची ०३ व शिलाईसाठीची ०३ अशी एकूण ०६ कोटेशन्स आजचे सभेसमोर उघडण्यात येऊन, संबंधीत कोटेशन्सधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, मे.हिंद फॅब्रीक, पुणे व मे.एवंती रिटेल सोल्युशन प्रा.लि.,अहमदनगर हे दोन निविदाधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी हजर होते. वाटाघाटीचे वेळी मे.हिंद फॅब्रीक, पुणे यांनी कोणतीही सुट दिलेली नाही तर मे.एवंती रिटेल सोल्युशन प्रा.लि.,अहमदनगर यांनी कापड खरेदीकरीता व गणवेष शिलाईकरीता त्यांचे मुळ दरावर २% सुट देऊ केलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

**अ-श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना गणवेष शिलाईबाबतचा तुलनात्मक तक्ता.**

| अ. नं. | युनिफॉर्मचे नाव | मे.हिंद फॅब्रीक, पुणे | | मे.महेंद्रकुमार ॲन्ड कंपनी,मुंबई | | मे.एवंती रिटेल सोल्युशन प्रा.लि.,अहमदनगर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | किंमत प्रति नग सर्व करांसह रु./पै. | चर्चा/ वाटाघाटी नंतरचे दर रु./पै. | किंमत प्रति नग सर्व करांसह रु./पै. | चर्चा/ वाटाघाटी नंतरचे दर रु./पै. | किंमत प्रति नग सर्व करांसह रु./पै. | चर्चा/ वाटाघाटी नंतरचे दर रु./पै. |
| १ | फुल ॲप्रन, १२० नग | ४५०.०० | ४५०.०० | ४००.०० | ४००.०० | ३५०.०० | **३४३.००** |
| २ | हाफ ॲप्रन, ६४० नग | ४००.०० | ४००.०० | ४००.०० | ४००.०० | ३५०.०० | **३४३.००** |
| ३ | सलवार/कुडता ३४२ नग | ५५०.०० | ५५०.०० | ५५०.०० | ५५०.०० | ४००.०० | **३९२.००** |
| ४ | पॅन्ट/शर्ट (हाफ) २४ नग | ५२५.०० | ५२५.०० | ५५०.०० | ५५०.०० | ४२५.०० | **४१७.००** |
| ५ | पॅन्ट/शर्ट(हाफ) ४४ नग | ५२५.०० | ५२५.०० | ५५०.०० | ५५०.०० | ४२५.०० | **४१७.००** |
| ६ | पॅन्ट/शर्ट(फुल) २० नग | ५२५.०० | ५२५.०० | ५५०.०० | ५५०.०० | ४२५.०० | **४१७.००** |

**ब- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना गणवेष कापड खरेदीचा तुलनात्मक तक्ता**

| अ.नं. | युनिफॉर्मचे नाव | एकुण आवश्यक कापड | मे.हिंद फॅब्रीक, पुणे | | मे.महेंद्रकुमार ॲन्ड कंपनी,मुंबई | | मे.एवंती रिटेल सोल्युशन प्रा.लि.,अहमदनगर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रेमंड, पॉलिस्टर ६७ % + कॉटन ३३ % | | किमंत प्रति नग सर्व करांसह रु./पै. | चर्चा/ वाटाघाटी नंतरचे दर रु./पै. | किमंत प्रति नग सर्व करांसह रु./पै. | चर्चा/ वाटाघाटी नंतरचे दर रु./पै. | किमंत प्रति नग सर्व करांसह रु./पै. | चर्चा/ वाटाघाटी नंतरचे दर रु./पै. |
| १ | फुल ॲप्रन सफेद, १२० नग | ३६० मीटर कापड | ५६९.०० | ५६९.०० | ५८३.०० | ५८३.०० | ५१७.०० | **५०७.००** |
| २ | हाफ ॲप्रन सफेद, ६४० नग | १६०० मीटर कापड | ५६९.०० | ५६९.०० | ५८३.०० | ५८३.०० | ५१७.०० | **५०७.००** |
| ३ | सलवार/ कुडता बदामी, ३४२ नग | १७१० मीटर कापड | २१६.०० | २१६.०० | २२३.०० | २२३.०० | १८५.०० | **१८१.००** |
| ४ | पॅन्ट/शर्ट (हाफ) शर्ट-ग्रे, पॅन्ट-नेव्ही ब्ल्यु २४ नग, | शर्ट-४८ मीटर कापड | २०३.०० | २०३.०० | २०४.०० | २०४.०० | १७५.०० | **१७२.००** |
| | | पॅन्ट-३० मीटर कापड | ४९१.०० | ४९१.०० | ४९८.०० | ४९८.०० | ४३५.०० | **४२६.००** |
| ५ | पॅन्ट/शर्ट (हाफ) शर्ट-सफेद, पॅन्ट-सफेद, ४४ नग | शर्ट-८८ मीटर कापड | २१६.०० | २१६.०० | २२३.०० | २२३.०० | १८५.०० | **१८१.००** |
| | | पॅन्ट-५५ मीटर कापड | २७६.०० | २७६.०० | ३०७.०० | ३०७.०० | २३४.०० | **२२९.००** |
| ६ | पॅन्ट/शर्ट (फुल) शर्ट-स्काय ब्ल्यु पॅन्ट-नेव्ही ब्ल्यु २० नग | शर्ट-५० मीटर कापड | २०३.०० | २०३.०० | २०५.०० | २०५.०० | १७५.०० | **१७२.००** |
| | | पॅन्ट-२५ मीटर कापड | ४९१.०० | ४९१.०० | ४९८.०० | ४९८.०० | ४३५.०० | **४२६.००** |

**निर्णय क्र.८१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकरीता खरेदी करावयाच्या गणवेशाचे कापड खरेदीकामी रु.१३,७२,०३९/- व शिलाईकामी रु.४,३१,४४०/- अशा एकुण येणाऱ्या रु.१८,०३,४७९/- मात्र खर्चास मान्यता देण्यात येऊन, त्याकामी फेर निविदा मागविण्यात याव्यात.**

**तसेच, याकामी संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात येऊन कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.०९** **C.V.T.S. O.T. या ऑपरेशन थिएटर विभागाकरीता फ्लॅप गाऊन खरेदी करणेबाबतचे कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS-I या विभागाने त्यांचे डि.पी.नं. १८०० दिनांक ०१/०९/२०१२ अन्वये १०० फ्लॅपच्या गाऊनची मागणी केलेली आहे तसेच CVTS-II या ऑपरेशन थिएटर या विभागाने डि.पी.नं.२४७३ दिनांक ०१/०९/२०१२ अन्वये एकुण १०० गाऊनची मागणी केलेली होती.

सदर दोन्ही ओ.टी.मध्ये ऑपरेशनच्या दृष्टिने गाऊनला प्लॅस्टिक कोटेड तसेच बाजुला फ्लॅप व हाताला खाली इलेस्टिक अश्याप्रकारे गाऊनची मागणी केलेली आहे. यापुर्वी फक्त साध्या गाऊनची व पुढे प्लॅस्टिक कोटेड अश्याप्रकारच्या गाऊन वापरात होते. परंतु हृदयाच्या शस्त्रक्रियेसाठी अशाप्रकारच्याच गाऊनची जास्त आवश्यकता आहे असे वरिष्ठ भुलतज्ञ डॉ. राव यांचे म्हणणे आहे. अशाप्रकारचे गाऊनची यापुर्वी खरेदी केलेली नाही.

सदर गाऊन खरेदीकामी मे.के.सी.एम. इंटरनॅशनल,जयपुर यांचेकडे दुरध्वीनीव्दारे चौकशी केली असता त्यांनी एका नगाची किंमत रु.३१५/- असे सांगितले आहे. त्यामुळे २०० नग गाऊन खरेदीकरीता अंदाजे रु.६३०००/- (त्रेसष्ट हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्तप्रमाणे विहीतपध्दतीने कोटेशन मागवुन गाऊन खरेदीस व येणाऱ्या अंदाचे रु.६३०००/- खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा दिनांक ०८/०१/२०१३ नि.क्र.२४ अन्वये मान्यता मिळालेली आहे, त्यानुसार इकडील पत्र क्र.९३३५ दिनांक ११/०३/२०१३ अन्वये एकुण ७ पुरवठा धारकांकडुन दिनांक ३०/०३/२०१३ अखेर कोटेशन पत्र मागविले होते. त्यापैकी ३ पुरवठा धारकांकडुन कोटेशन पत्र मिळालेले आहे त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | प्राप्त तारीख | प्राप्त स्थिती |
|---|---|---|---|
| ०१ | मे.केसीएम इंटरनॅशनल,जयपुर | २९/०३/२०१३ | बंद स्थिती |
| ०२ | मे.रिशी एंटरप्रायजेस,नाशिक | ३०/०३/२०१३ | बंद स्थिती |
| ०३ | मे.दिवान ट्रेडींग कंपनी,भोपाळ | २८/०३/२०१३ | बंद स्थिती |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ सिलबंद कोटेशन्स आजचे सभेसमोर उघडण्यात येऊन, कोटेशन्सधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पुरवठा धारकाचे नाव | तपशिल | कोटेशनमधील दर प्रती नग सर्व करांसह रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर प्रती नग सर्व करांसह रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.केसीएम इंटरनॅशनल,जयपुर | ५३ x ५६ कॉटन १०० % (हाताला खाली इलेस्टीक असलेले)- २०० नग | ३०५/- | **३०५/-** |
| ०२ | मे.रिशी एंटरप्रायजेस,नाशिक | | ६००/- | ६००/- |
| ०३ | मे.दिवान ट्रेडींग कंपनी,भोपाळ | | ५००/- | ५००/- |

**निर्णय क्र.८१४ यावर सविस्तर चर्चा होऊन, C.V.T.S. O.T. विभागाकरीता आवश्यक असलेले २०० नग फ्लॅप गाऊन खरेदी करणेकामी मे.केसीएम इंटरनॅशनल,जयपुर यांचे प्रती नग रु.३०५/- (सर्व करांसह) मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१० श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी.विभागाकरीता Oil Free Electro Mechanical Operation Table खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी विभागात वेगवेगळया प्रकारची शस्त्रक्रिया करणेसाठी सदर Operation Table ची आवश्यकता असते. त्यांच्याकडे सध्या असलेले Operation Table हे वापरुन खराब झालेले असल्यामुळे त्यांनी दि.१५/१२/२०१२ चे मागणीपत्रकान्वये एकुण ०४ नग Operation Table ची मागणी केलेली आहे. परंतु सध्या त्यांना शस्त्रक्रिया करतांना खुपच अडचणी येत असल्यामुळे २ नग (Indian Make) Oil Free Electro Mechanical Remote Control Operation Table तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे.

सदरचे Oil Free Electro Mechanical Remote Control Operation Table खरेदीकामी M/s. M. Shah Co., Mumbai यांचेकडुन अंदाजे खर्चासाठी दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. M. Shah Co., Mumbai यांनी पत्र क्रं. SMS/DS/VB/२०४ दि.२५/१२/२०१२ चे पत्रान्वये सदर प्रति नग रु.२४८०००/- (सर्व करांसह) चे दर कळविलेले होते.

त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Electro Mechanical Remote Control Operation Table with Radio Translucent Top. | 02 | 2,48,000.00 | 4,96,000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **4,96,000.00** |

उपरोक्त ०२ नग Operation Table खरेदीकामी अंदाजे रु.४,९६,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि. २६/०२/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र. २३५ अन्वये उपरोक्त Oil Free Electro Mechanical Operation Table विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,९६,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ९३ दि. ०३/०४/२०१३ अन्वये एकुण ०९ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडुन दि. १०/०४/२०१३ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार एकही कोटेशन प्राप्त झाले नाही. त्यामुळे ९ पुरवठा धारकांना वारंवार दुरध्वनीवरुन तगादा करण्यात आले होते.

परंतु एकही कोटेशन प्राप्त झाले नाही. M/s. PSI Marketing Pvt. Ltd., Nagpur यांनी सदर ओ.टी टेबल बनवत नसलेबाबत त्यांचे पत्र क्र. PMPL/NGP/२०७/००१ दि.१२/०४/२०१३ अन्वये कळविलेले होते. त्यामुळे उर्वरित ८ पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. ९५२ दि. २३/०५/२०१३ अन्वये पुन्हा स्मरण पत्र देऊन कोटेशन मागविण्यात आले त्यास अनुसरुन ०४ कोटेशन प्राप्त झालेले असून त्याचा तपशील खालील प्रमाणे -

०१. M/s. M. Shah AND Company, Mumbai (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.३१/०५/२०१३)
०२. M/s. Meditech India, New Delhi (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.३१/०५/२०१३)
०३. M/s. Prime Sales AND Services, Nashik (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.३१/०५/२०१३)
०४. M/s. Matrix Medicals Pvt. Ltd., Thane (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.०५/०६/२०१३)

उपरोक्त अ. नं. २, ३, व ४ यांना मागणीपत्रक दिलेले नसतांनाही त्यांनी दरपत्रक दिलेले आहे. तुलनात्मक दर मिळविण्याच्या दृष्टीने त्याचा फायदा होऊ शकेल त्यामुळे चारही कोटेशन विचारात घ्यावे असे मत आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेली ०४ सिलबंद कोटेशन्सपैकी M/s. Matrix Medicals Pvt. Ltd., Thane यांचे कोटेशन हे O.T. Light करीता असल्यामुळे त्याचा विचार करण्यात आलेला नाही. उर्वरित ०३ कोटेशन्स आजचे सभेसमोर उघडण्यात येऊन, कोटेशन्सधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता सर्व कोटेशनधारक सभेपुढे अनुपस्थित होते. त्यांचे कोटेशनमधील मुळ दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. | M/s. M. Shah & Company, Mumbai | | | M/s. Meditech India, New Delhi | | | M/s. Prime Sales & Services, Nashik | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 1 | Electro Mechanical Remote Control Operation Table with Radio Translucent Top with Kidney bridge and Urology & Gynaec attachment | 2 | MEDIQUIP | 281250.00 | Absent | **MI 103** | **270000.00** | **Absent** | MEDITECH MI 103 | 275000.00 | Absent |
| | **Warranty** | | 2 Year | | | 2 Year | | | 2 Year | | |
| | **AMC** | | | 3rd Year - 4%<br>4th Year - 4.5%<br>5th Year - 5%<br>6th Year - 6%<br>7th Year -7% | | | 1st Year - 2.5%<br>2nd Year - 3.5%<br>3rd Year - 4.5% | | | 1st Year - 5.5%<br>2nd Year - 6.5%<br>3rd Year - 7.5% | |
| | **CMC** | | | 3rd Year - 8%<br>4th Year - 9 %<br>5th Year - 10%<br>6th Year - 11%<br>7th Year - 12% | | | 1st Year - 4.5%<br>2nd Year - 5.5%<br>3rd Year - 6.5% | | | 1st Year - 8.5%<br>2nd Year - 9.5%<br>3rd Year - 10.5% | |
| | **Delivery** | | | | | 45 Days | | | 45 Days | | |

03. M/s. United Medical Solutions, Pune (सिलबंद कोटेशन प्राप्त दि.०५/०७/२०१३)

वरीलपैकी अ.नं. ३ यांना मागणीपत्र दिलेले नसतांनाही त्यांचे कोटेशन प्राप्त झालेले आहे. परंतु तुलनात्मक दर मिळविण्याच्या दृष्टीने त्याचा फायदा होऊ शकेल. तेव्हा सदर कोटेशन विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ कोटेशनपैकी ०२ सिलबंद कोटेशन आजचे सभेत उघडणेत येऊन, कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलवण्यात आले असता त्यापैकी M/s. Excel Corporation, Nashik आणि M/s. United Medical Solutions, Pune हे दोन कोटेशनधारक आजचे सभेपुढे उपस्थित होते. तर M/s. Suz-Dent (India) Pvt.Ltd., Ahmedabad यांनी ई मेल पत्राद्वारे सूट कळविलेली आहे. त्यांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| Sr. No | Description | M/s. Excel Corporation, Nashik | | | M/s. Suz-Dent (India) Pvt.Ltd., Ahmedabad | | | M/s. United Medical Solutions, Pune | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 1 | **Digital sensors specifications** Size 1 Dimensions : 38.2 mm X 28.2 mm X 6.3 mm Image File Size : 0.8 MB Image Pixels : 1600 X 1200 Size 2 Dimensions : 44.0 mm X 32.7 mm X 6.3 mm Active areas: 37.2 mm X 27.6 mm Image File Size: 1.5 MB Image Pixels: 1920 X 1440 Both Size Theoretical Resolution: 27 lp/mm True Resolution: > 20 lp/mm Total Length:2.9 M+0.1 M Connection: USB 2.0, Pixel Size: 18.5 um X 18.5 um, Gray Levels: 8 bit Design : CMOS Cesium Iodide coated scintillator / Fiber optic, plate Regulatory :- FDA, CE, UL User licensa :- Unlimited limited warranty:Two years parts and factory labor | Skanray Health Care Intraskan DIGI (Size - 1) | 210000.00 | 195000.00 | Apexia Size 1 Unlimited Users licence | 142250.00 | 135000.00 Absent but Discount given by Email Letter | Kodak RVG 5100 Size 1 | 180000.00 | 158400.00 |
| | | | | | | | | Kodak RVG 6100 Size 1 | 320000.00 | 281600.00 |
| | **AMC** | | | 4% | | | Not Required | | | |
| | **CMC** | | | 8% | | | Not Required | | | |
| | **Warranty** | | | 12 Month | | | 2 year | 2 Year | | |
| | **Delivery** | | | 3 week | | | Not Required | | | |
| | **Payment** | | | After delivery | | | | | | |

**निर्णय क्र.८२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे दंत विभागात R.V.G. (Digital Sensor- Digital Dental Radiography) बसविणेसाठी M/s. Suz-Dent (India) Pvt.Ltd., Ahmedabad यांचे निम्नतम दर स्विकारण्ययात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच, दि.२६.०७.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६२ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील दंत विभागासाठी ०१ नग R.V.G. (Digital Sensor- Digital Dental Radiography) खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.१,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली असल्याने सदर R.V.G. (Digital Sensor- Digital Dental Radiography) उपरोक्त पुरवठाधारकाकडून मंजुर दराने खरेदी करणेत यावा, असे ठरले व याकामी येणाऱ्या जादा खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२१** **श्री साईबाबा संस्थानचे इमारतीमधील फॅन, ट्युब साफसफाई व मेन्टेनन्स करुन घेणेकामी प्राप्त झालेली टेंडर्स उघडून टेंडरधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दि १८-०७-२०१२ चे सभेतील विषय क्र.३७ निर्णय क्र. ६०९ अन्वये श्री साईबाबा संस्थानचे सर्व इमारतीमधील फॅन, टयुब साफसफाई व मेन्टेनन्सचे काम एक वर्षासाठी ठेकेदाराकडून कंत्राटी पध्दतीने करुन घेण्यास व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,९६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार टेंडर विक्रीसाठी दि.०८-०६-२०१३ रोजी, दै.सार्वमत अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच वेबसाईटवर टेंडर नोटीस अपलोड केल्याची तारीख ०९-०६-२०१३ अशी होती. वेबसाईटवर ही जाहिरात दि.२५-०६-२०१३ पर्यंत ठेवण्यात आली होती. टेंडरची विक्री दिनांक १०-०६-२०१३ ते दि. २५-०६-२०१३ अशी होती. टेंडर विकत घेणा-यांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | टेंडर विकत घेणारे टेंडरधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हिस प्रा.लि., पुणे |
| ०२) | मे.श्री शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, शिर्डी |
| ०३) | मे.साई सर्व्हिसेस , शिर्डी |

वरीलप्रमाणे एकुण तीन टेंडरधारकांनी टेंडर विकत घेतले होते. टेंडर सबमिशन तारीख २७-०६-२०१२ अशी होती. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे दोनच टेंडर्स प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | टेंडरधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.श्री शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, शिर्डी |
| ०२) | मे.अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हिस प्रा.लि., पुणे |

श्री साईबाबा संस्थानचे सर्व इमारतीमधील फॅन, टयुब साफसफाई व मेन्टेनन्सचे काम एक वर्षासाठी ठेकेदाराकडून कंत्राटी पध्दतीने करुन घेणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०२ टेंडर्स आजचे सभेसमोर उघडण्यात येऊन, टेंडर्सधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नांव | टेंडरमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.श्री शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, शिर्डी | ७,९२,०००/- | ७,९२,०००/- |
| ०२ | मे.अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हिस प्रा.लि., पुणे | ४,३५,६००/- | **४,३५,६००/-** |

**निर्णय क्र.८२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे इमारतीमधील फॅन, ट्युब साफसफाई व मेन्टेनन्स करुन घेणेकामी मे.अलाईड रिसोर्स मॅनेजमेंट सर्व्हिस प्रा.लि., पुणे यांचे वार्षीक रु.४,३५,६००/- मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. तसेच, प्रस्तावित कामी येणाऱ्या जादा खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२२** **संस्थानला अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेबाबत निविदा सादर केलेल्या कंत्राटदारांशी/ ठेकेदारांशी चर्चा वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार पुरविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७-०२-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१३७ नुसार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे यांची दि.०१-०४-२०११ पासून ते दि.३१-०३-२०१३ अखेर ०२ वर्षे कालावधीसाठी लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०३-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२११ नुसार अनुक्रमे **१)** मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि.,पुणे, **२)** मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी), **३)** मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, **४)** मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टम्स प्रा.लि.,पुणे व **५)** मे.जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांची दि.०१-०५-२०११ पासून ते दि.३०-०४-२०१३ अखेर ०२ वर्षे या कालावधीसाठी सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे.

त्याप्रमाणे संबंधीत लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानला प्रतिदिनी व मंजुर संख्येनुसार कंत्राटी पध्दतीने खालीलप्रमाणे अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहेत.

| अ. नं. | एजन्सीचे नांव | संबंधीत एजन्सीला नेमून दिलेला परिसर | पुरविणेत येणारी प्रतिदिनी कंत्राटी कर्मचारी संख्या | | | विभागांना दिलेल्या मंजुरीप्रमाणे कंत्राटी कर्मचारी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अकुशल | कुशल | **एकुण** | अकुशल | कुशल | **एकुण** |
| १. | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे **(लेबर कॉन्ट्रॅक्टर)** | संस्थानचे सर्व संबंधीत विभाग | ९०४ | २८४ | **११८८** | ११२० | ४३१ | **१५५१** |
| २. | मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि., पुणे **(सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | हॉस्पीटल, द्वारावती धर्मशाळा इ.परिसर | १०६ | ०५ | **१११** | ११६ | ०५ | **१२१** |
| ३. | मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी) **(महाद्वार सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | मंदिर व महाद्वार परिसर | ६० | २३ | **८३** | ८२ | ३४ | **११६** |
| ४. | मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, **(सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | मंदिर व मंदिर परिसर | ८४ | ०६ | **९०** | ९८ | ०६ | **१०४** |
| ५. | मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टम्स प्रा.लि., पुणे **(सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | नविन पिंपळवाडीरोड दर्शनलाईन, साई प्रसाद-०१ व ०२, प्रसादालय, साई आश्रम इ.परिसर | १८० | ०९ | **१८९** | ३९१ | २२ | **४१३** |
| ६. | मे.जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई **(सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** | साईबाबा भक्तनिवासस्थान, वाहन व शैक्षणिक संकुल परिसर | ७२ | ०४ | **७६** | ७६ | ०४ | **८०** |
| **एकुण (२ ते ६)** | | | **५०२** | **४७** | **५४९** | **७३३** | **७१** | **८३४** |
| **एकुण (१ ते ६)** | | | **१४०६** | **३३१** | **१७३७** | **१८८३** | **५०२** | **२३८५** |

सदर लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे कामाची (कॉन्ट्रॅक्टची) मुदत अनुक्रमे दि.३१-०३-२०१३ व दि.३०-०४-२०१३ अखेर संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे पुढील ०३ वर्ष कालावधीसाठी संस्थानला अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी प्रचलित पध्दतीप्रमाणे नविन ठेकेदारांची/कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक होईपर्यंत मे.जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांचे व्यतिरिक्त वरिल लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स

यांचे ठेकेदारीस/करारास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०२-२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६६ अन्वये मुदतवाढ देणेत आलेली असुन, त्याचप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

संस्थानला अकुशल, कुशल कामगार, अनुभवी सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुढील तीन वर्षे कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची/ कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करणेसाठी दि.१९-०५-२०१३ रोजी विविध वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्दीस देऊन, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून "सिलबंद निविदा" मागविणेत आल्या होत्या. "सिलबंद निविदा" विक्रीची मुदत दि.२१-०५-२०१३ पासून ते दि.०१-०६-२०१३ पर्यंत अशी होती. तसेच "सिलबंद निविदा" स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.०३-०६-२०१३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

संस्थानला अकुशल, कुशल कामगार, अनुभवी सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून विक्री झालेल्या ३३ निविदांपैकी संस्थानचे मुंबई कार्यालयास-०६ व शिर्डी कार्यालयास-१३ अशा एकूण-१९ "सिलबंद निविदा" प्राप्त झालेल्या आहेत.

सदर प्राप्त झालेल्या १९ "सिलबंद निविदा" मा.कार्यकारी अधिकारी तथा सदस्य, मा.त्रिसदस्य समिती यांचे समक्ष दि.१५-०६-२०१३ रोजी उघणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला आहे. सदर तक्ता यासोबत अवलोकनार्थ सादर केलेला आहे. तसेच संस्थानला अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी निविदा सादर केलेल्या निविदाधारकांपैकी अ.नं.०४, ०७, ०९ व १५ अपात्र असलेमुळे त्यांचे व्यतिरिक्त ज्या निविदाधारकांची/ठेकेदारांची वार्षिक उलाढाल किमान रूपये ०३ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आहे. अशाच पात्र ठेकेदारांना चर्चा/वाटाघाटीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उपस्थित राहणेबाबत कळविणेत आलेले आहे.

सबब, संबंधीत पात्र निविदाधारकांशी/ठेकेदारांशी त्यांचे निविदेतील दरांसंदर्भात चर्चा/ वाटाघाटी होऊन, पुढील ०३ वर्षे कालावधीसाठी नविन लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स नेमणूकीबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.८२७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी पात्र १५ ठेकेदारांना सभेसमोर बोलाविणेत येऊन, सर्वांना त्यांचेवर असलेला आर्थिक बोजा व कायदेशीर उत्तरदायीत्वाची जाणीव करुन देणेत आली. तसेच त्यांना संस्थानचे कामासंदर्भात व कर्मचारी पुरविणेसंदर्भात सुचना देण्यात आल्या व निविदेत दिलेल्या दरामध्ये आणखी काही सुट देणार का, याबाबत ठेकेदारांना विचारणा करणेत आली.**

**संबंधीत ठेकेदारांपैकी कोणाला दर कमी करावयाचे असतील तर पुरश्च संधी म्हणून त्यांचे बंद पाकिटामध्ये अंतीम दर घेऊन पुढील सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.२३ साई आश्रम भाग- ०१ व ०२ चे R-Block इमारतीतील उपहार गृहासाठी तज्ञ सल्लागार नियुक्तीकामी प्राप्त झालेले दरपत्रक उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१- घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**मा. व्यवस्थापन समिती** दि.१५.९.२०१२ सभेतील निर्णय क्रं. ७२९ व मा. व्यवस्थापन समिती दिनांक ३०.३.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २९७.

**प्रस्ताविक**:- श्री साई आश्रम भाग- ०१ व ०२ करीता श्री साईभक्तांचे सोयीसाठी R-Block इमारतीतील उपहार गृह सुरु करावयाचे असल्याने उपहार गृहातील किचन ईक्वीपमेंट्स, स्टे.स्टील फर्निचर, एल. पी. गॅस सिलेंडर मेनफोल्ड यंत्रणा खरेदी व उभारणी तसेच नामवंत ग्रुपला उपहारगृह चालविणेस देणेकामी विषय तज्ञांचे मार्गदर्शन मिळणेकामी मा. व्यवस्थापन समिती दि.२८/०४/२०१२ चे सभेतील निर्णयानुसार सल्लागार नियुक्तीस मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार पाच एजन्सींज यांनी विहीत मुदतीत सिलबंद दरपत्रक सादर कलेले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री संदिप गोवलकर, मुंबई | २. | श्री किरण मांजरेकर, मुंबई |
| ३. | श्रीमती शरली संतोष जोरी, पुणे. | ४. | HCTS इंटरनॅशनल, मुंबई |
| ५. | किचन क्रॉफ्टस्, मुंबई | | |

उपरोक्त एजन्सीं पैकी अ. नं. १ ते ३ चे प्रतीनिधी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे चर्चा व वाटाघाटीसाठी समक्ष हजर होते. प्रत्यक्ष चर्चा व वाटाघाटीनंतर त्यांनी फेर प्रस्ताव बंद पाकीटात दिलेले होते. प्रस्तुत सिलबंद दरपत्रक दिनांक १५.९.२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीसमोर उघडणेत आलेले असुन त्यावर सविस्तर प्रस्ताव तयार करुन पुढिल त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यात यावे असे ठरले. परंतु व्यवस्थापन समिती चे निर्णयानुसार सदर प्रस्तावास जास्त कालावधी झालेला असल्याने नविन फेर प्रस्ताव मागविणेबाबत निर्णय झालेला आहे.

त्यानुसार उपरोक्त संदर्भिय अ. नं. २ चे पत्राने उपरोक्त पाचही एजन्सीकडुन फेर दरपत्रक मागविणेत आलेले आहे. पाच एजन्सीपैकी खालील चार एजन्सी यांनी विहीत मुदतीत दरपत्रक सादर केलेले आहे. त्यापैकी (१) श्री किरण मांजरेकर, मुंबई व (२) HCTS इंटरनॅशनल, मुंबई यांचे दरपत्रक आवक विभागामार्फत नजर चुकीने उघडून आलेले आहेत. (३) श्री संदिप गोवलकर, मुंबई व (४) किचन क्रॉफ्टस्, मुंबई यांचे दरपत्रक बंद स्वरुपात प्राप्त झालेले आहे.

**मागणी:-** मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे प्राप्त सिलबंद दरपत्रक उघडुन निर्णय होणेकामी सदचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करता येईल.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान:-** तांत्रिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** उपरोक्त एजन्सींना मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे चर्चा व वाटाघाटीसाठी समक्ष हजर राहणेबाबत कळविणेत येईल.

साई आश्रम भाग- ०१ व ०२ चे R-Block इमारतीतील उपहार गृहासाठी तज्ञ सल्लागार नियुक्तीकामी प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद दरपत्रकांपैकी बंद स्थितीत असलेली ०२ दरपत्रके आजचे सभेत उघडणेत येऊन, चारही दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नाव | दरपत्रकामधील मुळ दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| **१** | HCTS इंटरनॅशनल, मुंबई | १००१/- | **१००१/-** |
| **२** | श्री संदिप गोवलकर, मुंबई | एकूण प्रकल्प किमतीच्या ३.३३ + सर्व्हिस टॅक्स | एकूण प्रकल्प किमतीच्या ३.३३ + सर्व्हिस टॅक्स |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्री किरण मांजरेकर, मुंबई | ४,००,०००/- + सर्व्हिस टॅक्स | ४,००,०००/- + सर्व्हिस टॅक्स |
| ४ | किचन क्रॉफ्टस्, मुंबई | ३,८९,२००/- + सर्व्हिस टॅक्स | ३,८९,२००/- + सर्व्हिस टॅक्स |

**निर्णय क्र.८२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भाग- ०१ व ०२ चे R-Block इमारतीतील उपहार गृहासाठी तज्ञ सल्लागार नियुक्तीकामी मे. HCTS इंटरनॅशनल, मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.२४ स्टे.स्टील बेनमेरी खरेदी कामी प्राप्त दरपत्रक उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व २१ (१- घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**मा. व्यवस्थापन समिती** दिनांक ३०.३.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय २९८.

**प्रस्ताविकः-** मा.व्यवस्थापन (त्रिसदस्यीय) समिती दि.३०/०३/२०१३ चे सभेमध्ये श्री साईप्रसादालया करीता आवश्यक ०६ नग स्टे.स्टील बेनमेरी खरेदीकामी रक्कम रु. ३,००,०००/- पर्यंतच्या खर्चास व दरपत्रक मागविणेस मान्यता मिळालेली आहे. सदर मान्यतेनुसार खालीलप्रमाणे स्टे. स्टिल फेब्रीकेटर्स व पुरवठादार यांचेकडून दरपत्रक मागविणेत आलेले होते.

०१. मे. मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडिया,मुंबई
०२. मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापुर
०३. मे. ग्रेहाऊंड इंडस्ट्रीज, कोल्हापुर
०४. मे. मेटाप्रो इंडस्ट्रीज, पुणे
०५. मे. सुयोग ईक्वीपमेंट प्रा.लि. पुणे
०६. मे. स्वराज इंडस्ट्रीज, पुणे

त्यापैकी खालील ३ पुरवठादार यांचे विहीत मुदतीत दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

०१. मे. मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडिया,मुंबई
०२. मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापुर
०३. मे. मेटाप्रो इंडस्ट्रीज, पुणे

**मागणीः-** प्राप्त सिलबंद दरपत्रक उघडुन सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर चर्चा वाटाघाटीद्वारे निर्णय होणेकामी सादर करता येईल.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमानः-** तांत्रिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** उपरोक्त विषयाचा निर्णय होणेकामी प्राप्त दरपत्रकधारकांना मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे चर्चा व वाटाघाटीसाठी समक्ष बोलावणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०३ दरपत्रके आजच्या सभेत उघडणेत येऊन, दरपत्रधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलवण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले-

| **अ.नं.** | **दरपत्रकधारकाचे नांव** | **दरपत्रकामधील दर प्रती नग रु.** | **वाटाघाटीअंती देऊ केलेले दर प्रती नग रु.** |
|---|---|---|---|
| **०१** | मे. मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडिया,मुंबई | ५५,१५०/- | अनुपस्थित |
| **०२** | मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापुर | ३९,२५०/- | **३९,२५०/-** |
| **०३** | मे. मेटाप्रो इंडस्ट्रीज, पुणे | ६१,५५७/- | ६१,५५७/- |

**निर्णय क्र.८२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयाकरीता आवश्यक ०६ नग स्टे.स्टील बेनमेरी खरेदी करणेकामी मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापुर यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५ स्टे.स्टील डायनिंग टेबल बैठक सिटाचे नविन स्टे.स्टील टॉप व टॉप मोल्डींग करुन बसविणेचे मजूरीसह प्राप्त दरपत्रक उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम व २१ (१- घ) नुसार भक्तांना जेवन पुरवणे व अन्नछत्र चालवणे.

**मा. व्यवस्थापन समिती** दिनांक ३०.३.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय ३०१.

**प्रस्ताविकः-** मा.व्यवस्थापन (त्रिसदस्यीय) समिती दि.३०/०३/२०१३ चे सभेमध्ये श्री साईप्रसादालयातील चिरलेले सिटाचे टॉप डायनिंक टेबलचे उत्पादक व पुरवठादार यांचेकडून नविन स्टे. स्टील टॉप व टॉप मोल्डींग करुन बसविणेचे मजूरीसह दरपत्रक मागावून विहीत पद्धतीने खरेदीकामी रक्कम रु. ३,००,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदर मान्यतेनुसार खालीलप्रमाणे स्टे. स्टिल फेब्रीकेटर्स व पुरवठादार यांचेकडून दरपत्रक मागविणेत आलेले होते.

०१. मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापुर
०२. मे. ग्रेहाऊंड इंडस्ट्रीज, कोल्हापुर
०३. मे. मेटाप्रो इंडस्ट्रीज, पुणे

त्यापैकी अ. नं. १ राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचे विहीत मुदतीत दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

**मागणी:-** मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचे प्राप्त सिलबंद दरपत्रक उघडुन निर्णय होणेकामी सदचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करता येईल.

प्रस्तुत काम भक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यावश्यक असल्याने मे.राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचे प्राप्त झालेले एकमेव दरपत्रक आजचे सभेत उघडणेत येऊन संबंधीतांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | दरपत्रकामधील दर प्रती नग रु. | वाटाघाटीअंती देऊ केलेले दर प्रती नग रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापुर | ४७५/- (सर्व करासहींत) | ४७५/- (सर्व करासहींत) |

**निर्णय क्र.८३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील स्टे.स्टील डायनिंग टेबल बैठक सिटाचे नविन स्टे.स्टील टॉप व टॉप मोल्डींग करुन बसविणेकामी मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापुर यांचे प्रति नग रु.४७५/- (सर्व करांसह) मात्रचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**तसेच, सदरहू १५०० नग स्टेनलेस स्टील टॉप बसविणेकामी येणाऱ्या रु.४,१२,५००/- मात्रचे वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेंकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६** **गावरान तुप, पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर, चहा पावडर व कॉफी खरेदीकामी मुळ निविदा (Financial Bid) उघडून निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१३-१४ चे माहे ऑक्टो-१३ ते मार्च-१४ अखेर प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक गावरान तुप, पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर, चहा पावडर व कॉफी खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस मा.त्रीसदस्य समितीचे दि.०७.०२.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.७२ अन्वये तत्वत: मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१९.०९.२०१३ रोजी उपरोक्त कार्यवाहीस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार e-Tender चा मसुदा व जाहिरातीचा मसुदा तयार करुन त्यास मा.कार्यकारी अधिकारी सो. यांची मान्यता घेतलेली आहे. सदर खरेदीबाबतची दि.२९-३०.०९.२०१३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध झालेली होती. उपरोक्त खरेदीकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.नं. | तपशील | कार्यवाही |
|---|---|---|
| ०१. | वर्तमानपत्रात निविदा जाहिरात प्रसिद्धी | दि.३०.०९.२०१३ |
| ०२. | वेबसाईटरवर e-Tender प्रसिद्ध करण्याची दिनांक व वेळ | दि.३०.०९.२०१३ दुपारी ०२.०० वा. |
| ०३. | e-Tender डाऊन लोड करण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि.०९.१०.२०१३ सायं.०५.०० वा. |
| ०४. | निविदा (Technical Bid) व नमुने प्रत्यक्ष स्विकारण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि.१०.१०.२०१३ सायं.०५.०० वा. |
| ०५. | निविदा (Technical Bid) उघडण्याची दिनांक | दि.१२.१०.२०१३ सकाळी ११.०० वा. |

त्यानुसार www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.३०.०९.२०१३ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर निविदा ऑनलाईन भरण्याची अंतिम दि.०९.१०.२०१३ सायं.०५.०० वा. पावेतो होती. तसेच नमुने व Technical Bid प्रत्यक्षात स्विकारण्याची अंतिम दि.१०.१०.२०१३ अशी होती. मुदतीअंती दि.१०.१०.२०१३ रोजी सायं.०५.०० वा. पावेतो एकुण ११ निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफे व नमुने प्राप्त झालेले होते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक | नमुने |
|---|---|---|---|
| ०१. | पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई | १०९७१/०९.१०.२०१३ | आहे |
| ०२. | सचिन एजन्सी, शिर्डी | १०९७२/०९.१०.२०१३ | आहे |
| ०३. | साई ॲग्रो इंडस्ट्रीज, टाकळी, कोपरगांव | १०९७३/०९.१०.२०१३ | आहे |
| ०४. | अजंता राज प्रोटीन्स लिमीटेड, आग्रा | १०९७४/०९.१०.२०१३ | आहे |
| ०५. | इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी | ११०३८/०९.१०.२०१३ | आहे |

| | | | |
|---|---|---|---|
| ०६. | सुमेरु बेव्हरेजस प्रा.लि., कात्रज, पुणे | ११०४०/०९.१०.२०१३ | आहे |
| ०७. | श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव प्रवरा | ११०३९/०९.१०.२०१३ | आहे |
| ०८. | पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी | ११०५९/१०.१०.२०१३ | आहे |
| ०९. | शैला एंटरप्रायझेस, नाशिक | ११०६०/१०.१०.२०१३ | आहे |
| १०. | साई धारा ॲक्वा ॲग्रो इंडस्ट्रीज एल.एल.पी, नांदुर्खी | ११०६१/१०.१०.२०१३ | आहे |
| ११. | अरिहंत सेल्स एजसी, इंदौर | ११०६२/१०.१०.२०१३ | आहे |

उपरोक्त निविदांमध्ये गावरान तुपाकरिता ०४ निविदाधारकांचे नमुने प्राप्त झालेले होते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | ब्रॅण्ड/कंपनी |
|---|---|---|
| ०१. | पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई | पंचामृत |
| ०२. | अजंता राज प्रोटीन्स लिमीटेड, आग्रा | मोहक |
| ०३. | इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी | सोनाई |
| ०४. | अरिहंत सेल्स एजसी, इंदौर | अरिहंत |

गावरान तुपाकरिता प्राप्त ४ नमुने दि.१०.१०.२०१३ रोजी सायं.०५.३० वा. मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे आदेशानुसार श्री.डी.टी.उगले व श्री.यु.पी.गोंदकर प्रशासकीय अधिकारी यांचेसमक्ष उघडून त्यातील नमुने प्लॅस्टिकचे बरणीमध्ये सिलबंद करुन, त्यास गोपनीय कोड नंबर देऊन तपासणीकामी मे.अश्वमेघ लॅब, नाशिक येथे दि.११.१०.२०१३ रोजी पाठविण्यात आलेले आहेत. सदर कार्यवाहीचे ध्वनीक्षेपण विभागामार्फत चित्रीकरण करण्यात आलेले आहे.

तसेच दि.१२.१०.२०१३ रोजी निविदाधारकांकडून प्राप्त Technical Bid मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे आदेशानुसार श्री.डी.टी.उगले प्रशासकीय अधिकारी यांचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत समक्ष उघडण्यात आले, त्यावेळी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ९ निविदाधारकांच्या निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या आढळून आलेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई |
| ०२. | सचिन एजन्सी, शिर्डी |
| ०३. | साई ॲग्रो इंडस्ट्रीज, टाकळी, कोपरगांव |
| ०४. | इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी |
| ०५. | सुमेरु बेव्हरेजस प्रा.लि., कात्रज, पुणे |
| ०६. | श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव प्रवरा |
| ०७. | पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी |
| ०८. | शैला एंटरप्रायझेस, नाशिक |
| ०९. | साई धारा ॲक्वा ॲग्रो इंडस्ट्रीज एल.एल.पी, नांदुर्खी |

दि.१०.१०.२०१३ अखेर एकुण ११ निविदाधारकांचे नमुने व Technical Bid प्राप्त झालेले होते, मात्र प्रत्यक्षात उपरोक्तप्रमाणे ९ निविदाधारकांच्या निविदा संकेतस्थळावर मुदतीत प्राप्त झालेल्या असल्यामुळे सदर निविदाधारकांचे Technical Bid उघउण्यात आले. त्यातील कागदपत्रांची तपासणी संस्थानचे वरिष्ठ लेखापाल यांचेमार्फत तपासण्यात आले. त्यातील माहितीचा तक्ता सोबत जोडलेले आहे. त्यामधील आढळलेल्या बाबी खालीलप्रमाणे

०१. अ.क्र.०९ मे.साई धारा ॲक्वा ॲग्रो इंडस्टीज एल.एल.पी., नांदुर्खी यांची वार्षिक उलाढाल ही रक्कम रु.४,०३,२७७/- मात्र आहे. निविदेतील अटी व शर्तीनुसार पॅकेज्ड ड्रिकींग वॉटरसाठी रु.५,००,०००/- वार्षिक उलाढाल अपेक्षित होते. मात्र सदर निविदाधारकाने त्यांचे निविदेतील कागदपत्रांमध्ये आमची भागीदारी संस्था टॅक्स ऑडीटमध्ये आलेली नाही. त्यामुळे आम्ही सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे इनकम टॅक्स रिटनर्स, कम्पुटीशन, सर्टीफाईड केलेला ताळेबंद व नफातोटा पत्रके या सोबत जोडून देत आहोत. असे पत्र दिलेले आहे.

०२. उर्वरीत सर्व निविदाधारकांचे कागदपत्रे हे मागणीप्रमाणे बरोबर असल्याचे निर्देशनास आलेले आहे.

सर्व निविदा उघडल्यानंतर संकेतस्थळावर Financial Bid उघडण्याची दिनांक टाकणे गरजेचे असल्याने सदर निविदेकरिता दि.१७.१०.२०१३ रोजी Financial Bid उघडण्यात येईल असे नमुद केलेले आहे. मे.अश्वमेध लॅब, नाशिक यांचेकडून गावरान तुप तपासणीचा अहवाल दि.१६.१०.२०१३ रोजी प्राप्त होणार आहे. सदरचा अहवाल चर्चा वाटाघाटीचे वेळी मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात येईल. गावरान तुप पुरविणेकामी २ किंवा त्यापेक्षा जास्त पुरवठाधारक असणे आवश्यक आहे,

कारण एकाच पुरवठाधारकस संस्थानची गावरान तुपाची मागणी वेळेत पुर्ण करणे जिकीरीचे होत असल्याचे निर्देशानास येत आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी त्यांचे निर्णयामध्ये गावरान तुपाची आवक होतेवेळी याचिकाकर्त्यांना आगाऊ माहिती देऊन, त्यांचे समक्ष गावरान तुपाचे नमुने घेऊन, एक नमुना संस्थानकडे, एक नमुने तपासणीकामी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे पाठविण्यात यावा, व एक नमुना याचिकाकर्त्यांकडे तपासणीकामी देण्यात यावा, तसेच याचिकाकर्ते हे त्यांचे इच्छेनुसार कोणत्याही लॅब मध्ये त्यांचेकडील नमुना तपासतील असे नमुद केलेले आहे. त्यामुळे गावरान तुपाचे तपासणी अहवाल आल्यानंतर त्यांचे देयके आदा करावी लागतील. गावरान तुपाचे तपासणी अहवाल प्राप्त होण्यास किमान २५ ते ३० दिवस लागतात, त्यामुळे गावरान तुपाचे देयक आदा करणेस १ महिना किंवा त्यापेक्षा अधिक कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे दरम्यानचे काळात पुरवठाधारकांनी बिलाअभावी माल देण्यास नकार दिला अथवा माल वेळेवर पाठविला नाहीतर साईभक्तांना लाडूप्रसाद देणेकामी अडचण येऊ शकते. त्यामुळे दोन किंवा त्यापेक्षा अधिक पुरवठाधारकांना गावरान तुप पुरविणेकामी पुरवठा आदेश दिल्यास संस्थानकामाची गैरसोय होणार नाही, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त निविदांपैकी मे.साई धारा ॲक्वा ॲग्रो इंडस्ट्रीज एल.एल.पी., नांदुर्खी यांचे निविदेबाबत निर्णय होऊन, सर्व निविदांचे Financial Bid दि.१७.१०.२०१३ रोजी उघडून, मे.अश्वमेध लॅब, नाशिक यांचे तपासणी अहवालाचे अवलोकन करुन गावरान तुप व इतर साहित्य खरेदीकामी निविदाधारकांशी दरांबाबत चर्चा वाटाघाटी करुन अंतिम निर्णय होणेस विनंती.

गावरान तुप, पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर, चहा पावडर, कॉफी खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या निविदाधारकांचे फायनान्शीयल बीड व मे.अश्वमेध लॅब, नाशिक यांचेकडून प्राप्त झालेला गावरान तुपाचा तपासणी अहवाल आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. गावरान तुपाचा तपासणी अहवाल व निविदेतील दरांचे अवलोकन करुन संबंधीत निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी सभेसमोर बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | कंपनी/बॅण्ड | निविदेतील दर प्रती क्विंटल/नग (व्हॅटसह) | चर्चा वाटाघाटीचे दर प्रती क्विंटल/नग (व्हॅटसह) |
|---|---|---|---|---|
| **अ.** | **चहा पावडर (लिप), कंपनी- बुक ब्रॉण्ड/टाटा/सपट, मागणी १२० क्विंटल** | | | |
| १ | शैला एंटरप्रायझेस, नाशिक | ब्रुक बॉण्ड - A१ | रु.१८,४९९/- | - |
| **ब.** | **कॉफि फ्लिटर, ब्रुक बॉण्ड, कॅफे गोल्ड, मागणी १० क्विंटल** | | | |
| १ | शैला एंटरप्रायझेस, नाशिक | ब्रु | रु.२९,०००/- | - |
| **क.** | **पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर, १ लिटर बाटली, मागणी १३,००,००० नग** | | | |
| १ | सचिन एजन्सी, शिर्डी | बिसलरी | रु.८.७५ | रु.८,५० |
| २ | साई ॲग्रो इंडस्ट्रीज, टाकळी, कोपरगांव | साईगंगा | रु.६.०० | **रु.५.८०** |
| ३ | सुमेरु बेव्हरेजस प्रा.लि., कात्रज, पुणे | सुमेरु | रु.८.३७ | रु.८.३७ |
| ४ | श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव प्रवरा | राजहंस | रु.६.०० | **रु.५.८०** |
| ५ | पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी | साईझिल | रु.६.६५ | रु.६.४५ |
| ६ | साई धारा ॲक्वा ॲग्रो इंडस्ट्रीज एल.एल.पी, - नांदुर्खी | साई धारा | रु.५.४८ | अपात्र |
| **ड.** | **पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर, ५०० मिली बाटली, मागणी ९,००,००० नग** | | | |
| १ | सचिन एजन्सी, शिर्डी | बिसलरी | रु.६.२५ | रु.६,२५ |
| २ | साई ॲग्रो इंडस्ट्रीज, टाकळी, कोपरगांव | साईगंगा | रु.५.०० | **रु.४.९०** |
| ३ | सुमेरु बेव्हरेजस प्रा.लि., कात्रज, पुणे | सुमेरु | रु.५.२७ | रु.५.२७ |
| ४ | श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव प्रवरा | राजहंस | रु.४.९० | **रु.४.९०** |
| ५ | पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी | साईझिल | रु.५.३० | रु.५.१० |
| ६ | शैला एंटरप्रायझेस, नाशिक | केनली | रु.८.३० | अनुपस्थित |
| **ई** | **गावरान तुप (गायीचे) ॲगमार्क असलेले, मागणी ६००० क्विंटल (सहा महियांसाठी)** | | | |
| १ | पंचामृत डेअरी प्रा.लि., मुंबई | पंचामृत | रु.२९,८००/- | - |
| २ | इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी | सोनाई | रु.२९,९२५/- | - |

**निर्णय क्र.८३१ यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

१. उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधारेखीत निम्नतम दर मान्य करणेत येऊन, संबंधीत पुरवठाधारकांना कार्यादेश देण्यात यावा.

२. मे.साईधारा ॲक्वा ॲग्रो इंडस्ट्रीज एल.एल.पी., नांदुर्खी यांची वार्षिक उलाढाल कमी असल्याने त्यांची निविदा रद्द करण्यात यावी व त्यांनी दिलेल्या दरांचा विचार करण्यात येऊ नये.

३. १ लिटर पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर (मागणी १३,००,००० नग) खरेदीकामी मे.साई ॲग्रो इंडस्ट्रीज, टाकळी, कोपरगांव व मे.स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव या दोन्ही पुरवठाधारकांचे निम्नतम समान दर असल्यामुळे त्यांना समप्रमाण विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा.

४. ५०० मिली पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर (मागणी ९,००,००० नग) खरेदीकामी मे.साई ॲग्रो इंडस्ट्रीज, टाकळी, कोपरगांव व मे.स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव या दोन्ही पुरवठाधारकांचे निम्नतम समान दर असल्यामुळे त्यांना समप्रमाण विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा.

चहा पावडर व कॉफी खरेदीकामी एकाच निविदाधारकाचे दर आल्याने तसेच गावरान तुप खरेदीकामी दोनच निविदाधारकांचे दर आल्याने लेखापरिक्षणाच्या दृष्टीने ते योग्य होणार नाही. त्यामुळे गावरान तुप, चहा पावडर व कॉफी खरेदीकामी फेर ई-निविदा मागविण्यात याव्यात.

दरम्यानचे काळात सध्या पुरवठा करत असलेल्या पुरवठाधारकांकडून मागील मंजुर दराने गावरान तुप, चहा पावडर व कॉफी आवश्यकतेनुसार खरेदी करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.२७ श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग व मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाकरीता आर्किटेक्ट संस्थांकडून प्राप्त झालेल्या वाणिज्यिक प्रस्तावांबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनार्थ येणारे साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. उत्सव काळात तसेच सलग सुट्ट्यांचे दिवशी मंदिर परिसर व लगतचे भागात मोठ्या प्रमाणावर साईभक्तांची गर्दी होते. त्यावेळी दर्शन रांगेचे हॉल व जुने पिंपळवाडी रस्त्याचा दक्षिणेकडील मंदिर परिसराचा भाग पूर्ण क्षमतेने भरतो . काही प्रसंगी दर्शन रांग त्याबाहेर जाते. त्यासाठी संपूर्ण मंदिर परिसर व जुने प्रसादालय परिसर यांचे एकत्रीकरण, पुनर्नियोजन व पुनर्विकास करण्याचे संस्थानतर्फे ठरविण्यात आले आहे. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.१२/१२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ११०४ अन्वये आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे व आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर, मुंबई यांचे आराखड्यांचे परिक्षण करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले होते. त्यानुसार दोन्ही आर्किटेक्ट यांनी दि.१७/०४/२०१३ रोजीचे मा.त्रीसदस्य समितीचे सभेपुढे श्री साईबाबा मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाबाबत सादरीकरण केले. आर्किटेक्ट यांचे सादरीकरण पाहून सदरहू प्रकल्पाकरीता किती टक्के फी आकारणार तसेच सदरहू फी मध्ये ते कोण कोणत्या सेवा देणार याचा सुस्पष्ट प्रस्ताव मागविण्यात यावा असे ठरले.

याकामी संस्थानला सदरहु प्रकल्पाकरिता आर्किटेक्ट संस्थांकडून अपेक्षित असणाऱ्या सेवांबाबत (Scope of work & Schedule of services) त्यांना ई-मेल व्दारे कळविण्यात आले. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**1. SCOPE OF ARCHITECTURAL SERVICES:**

The Architect shall provide architectural services in respect of the following works, as and when required by the Sansthan:

1.01 Building work and site development.
1.02 Structural engineering work.
1.03 Sanitary, plumbing, drainage, water supply and sewerage work.
1.04 Electrical work.
1.05 Heating, ventilation and air conditioning work (HVAC)
1.06 Landscape work.
1.07 Graphic signage.
1.08 Interior designing.
1.09 Acoustical work.

**2. SCHEDULE OF ARCHITECTURAL SERVICES:**

The Architect shall, after taking instructions from the Trust, render the following services:

2.01 Prepare conceptual design with reference to requirements given and prepare approximate estimate of cost on cubic measurements or on area basis.

2.02 Modify the conceptual design incorporating required changes and prepare preliminary drawings and designs and study model for approval of the trust, along with revised estimate of cost.

2.03 Prepare drawings, necessary for submission to statutory bodies for sanction and assist and advise on formalities necessary for the approval of such drawings.

2.04 Prepare tender stage drawings, detailed specifications, estimate of cost along with measurements, rate analysis and schedule of quantities sufficient to invite tenders.
2.05 Prepare draft tender document for approval and final tender document after approval of the draft tender document, incorporating changes and revisions instructed by the trust.
2.06 Prepare a short list of contractors, together with appropriate justification.
2.07 Coordinate with the trust for invitation of tenders, scrutiny of bids, sending clarifications to queries, making comparative statements, negotiations with bidders, evaluation of bids, time schedules and submitting the report regarding evaluation of the bidders to the trust.
2.08 Prepare and submit complete working drawings including large scale and full size details sufficient to commence the work at the site and for the proper execution during construction.
2.09 Clarify and take decisions on interpretation of the drawings and specifications that may be necessary and attend conferences and meetings as and when required and to ensure that the project proceeds generally in accordance with conditions of contract.
2.10 Time to time supervision of all ongoing civil and infrastructure work at site as per plans, for civil works for buildings and for roads, area drainage, parking facilities, compound wall, pavements, electrical work within buildings and external electrical work. Drainage and Plumbing work including the construction of ESR & GSR. Sewage treatment and water treatment works. Landscaping work of gardens, pathways etc.
2.11 To monitor overall quality and workmanship of the project.
2.12 To monitor the progress of work and to advise the contractors for deployment of man power, machinery etc. so as to adhere to the time schedule for the project.
2.13 Conducting review meetings at least once in a month with all agencies and the Trust.
2.14 To approve the mix design for concrete works submitted by the contractor.
2.15 To provide technical details and clarifications to the queries raised by the contractor or the trust regarding drawings and specifications of architectural, structural and services work.
2.16 On completion of the work, the Architect will prepare and submit two sets of "as built" drawings (one set on reproduction prints) of the buildings and services.

उपरोक्त सेवांसाठी (Scope of work & Schedule of services) दोन्ही आर्किटेक्ट संस्थांनी दिलेल्या फीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Particulars | Architect Hafeez Contractor, Mumbai | Architect Pushkar Kanvinde, Pune |
|---|---|---|---|
| 1. | **Percentage of Fees offered** for the Scope of Work & Schedule of services mentioned above. | 2% (of Gross value of work done) + service tax as applicable + Actual travelling expenses towards the return car/taxi fare for visit | 2% (of Gross value of work done) + service tax as applicable + Actual travelling expenses towards the return car/taxi fare for visit |
| 2. | **Other terms & conditions** | Agreed to work at above mentioned fees with following conditions.<br>1. Santhan has to pay directly to the artist for making Perspectives, Models and Coloured Layouts.<br>2. Sansthan shall appoint separate liasoning architect for getting all Municipal Approvals Laisoning will not be in their scope. | -- |

वरीलप्रमाणे संस्थानतर्फे कळविण्यात आलेल्या Scope of work मध्ये ठेकेदार यांची बिले तपासून प्रमाणित करणे या कामाचा समावेश करण्यात आलेला नाही. कारण सदर प्रकल्प हा मोठया स्वरुपाचा असल्याने त्यासाठी स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यामुळे ठेकेदाराची बिले तपासून प्रमाणित करण्याचे कामाचा समावेश प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांचे स्कोपमध्ये करता येईल.

तरी आर्किटेक्ट यांचेकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त वाणिज्यिक प्रस्तावांवर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील दोन्ही संस्थांनी दिलेल्या संकल्पनात्मक डिझाईन्सबाबत साईभक्त व सर्वसाधरण नागरीकांची मते जाणून घेणेसाठी राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरातीव्दारे निवेदन प्रसिध्द करुन प्रतिक्रिया मागविणेत याव्यात. त्यासाठी सदर डिझाईन्स साईभक्त व नागरीक यांना पहाणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८** **संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मधील कर्मचारी निवासस्थान इमारतीचे सांडपाण्याचे व्यवस्थापनाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद:-**

अधिनियमांच्या कलम- २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** संस्थानचे वर्ग-४ कर्मचाऱ्यांकरिता मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मध्ये १२ सदनिका असलेल्या एकूण आठ इमारतीचे बांधकाम करणेत आलेले आहे. सदरहू ९६ सदनिका सेवाधाम येथील कर्मचारी व साईबाबा हॉस्पिटल येथील डॉक्टर, नर्स यांना रहीवासाकरिता देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर निवासस्थानचे लगत संस्थान कर्मचाऱ्यांची श्री साईप्रसाद हौसिंग सोसायटी आहे. सदर इमारतीचे ड्रेनेज लाईनचे सांडपाणी लगतचे नाला क्र. ३२ मध्ये सोडण्यात आलेले आहे.

सरपंच, निमगांव कोऱ्हाळे यांनी दि. २४/०६/२०१३ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान कर्मचाऱ्यांची साईप्रसाद हौसिंग सोसायटी चे सांडपाणी लगतचे नाला क्र. ३२ मध्ये उघडयावर सोडण्यात आलेले असल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. तसेच डासाचे प्रमाणही वाढलेले आहे. करिता सदरचे सांडपाणी हे वसाहती पासून ते नगर मनमाड रस्त्याचे पूर्वेस एक कि.मी. अंतरापर्यंत बंद गटारातून सोडणेबाबत कळविले आहे.

**प्रस्ताव:-** उपरोक्तप्रमाणे नाला क्र. ३२ मध्ये सोडण्यात आलेले पाणी बंदीस्त गटारातून वाहुन जाणेसाठी वसाहत ते नगरमनमाड रस्त्याचे पूर्व १ कि.मी. पर्यंत असे एकूण १.५ कि.मी. लांबीची ड्रेनेज लाईन टाकावी लागेल. तसेच साई आश्रम भाग-२ मधील इमारतीचे सांडपाण्याचे लाईन नाला क्र.३२ पर्यंत जोडलेली असून सदरची लाईनसुध्दा वरिलप्रमाणे नगर मनमाड रोडचे पूर्वेस एक कि.मी. पर्यंत जोडावी लागेल. याप्रमाणे दोन्ही प्रकल्पाचे सांडपाणी बंदीस्त गटारातून वाहून जाणेसाठी ड्रेनेजकरिता ४५० एम.एस. व्यासाची आर. सी. सी. पाईप लाईन टाकावी लागेल. कर्मचारी निवासस्थानचे नाला क्र. ३२ पर्यंत आणण्यात आलेली ड्रेनेज लाईन पूर्वेस, साई आश्रमची आलेल्या ड्रेनेज लाईनला जोडता येईल. त्यापासून पुढे साधारणत: १.४ कि.मी. पर्यंत ४५० एम.एम. व्यासाची आर.सी.सी. पाईप लाईन टाकावी लागेल. याकामी ३०० एम.एम. व्यासाचे १०० मी. व ४५० एम.एम. व्यासाची १४०० मी. अंतर असलेली ड्रेनेज लाईन टाकावी लागेल. याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No. | Description | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| **01.** | Excavation for pipe trenches in earth soil of all types, sand, gravel & soft murum including removing the excavated material up to a distance of 50 m. & lifts as below, stacking and spreading as directed, manual dewatering, preparing backfilling etc complete. Lift o to 1.5 m. | 2250 | M3 | 134 | 3,01,500.00 |
| **02.** | Providing ISI Standard R.C.C. pipes in standard lenths of following class & diamenter suitable for eighter collars or rubber ring joints, including all taxes unloading & stacking etc complete. As per Is 458/ 1988. | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **a.** | 300 mm | 100 | Rmt | 652/- | 65,200.00 |
| **b.** | 450 mm | 1400 | Rmt | 1088/- | 15,23,200.00 |
| **03.** | Lowering laying and jointing in proper grade & allignment R.C.C. pipe with rubber joints (excluding cost of rubber ring or R.C.C. collar) including cost of conveying from stores to site of work, cost of jointing material, labour, giving hydraulic testing etc. Complete as directed by Engineer- incharge collar joints as per 783 / 1985. | | | | |
| **a.** | 300 mm. dia. | 100 | Rmt | 168/- | 16,800.00 |
| **b.** | 450 mm dia. | 1400 | Rmt | 266/- | 3,72,400.00 |
| **04.** | Providing & Construting on sewer, B.B. masonry circular manhole concentric cone 1.2 m dia at bottom and 0.5 m dia at top and up to deuth of 2.00 m with 23 cm brickwork in CM 1 :4 Proportion excluding excavation including foundation concrete 250 mm thick and haunches & channels in c.c. 1 :2 :4 proportion finishing channels in Smooth rendering Providing C.I. Dapuri type steps each weighing 5.5 Kg 1.4 coping Providing and Fixing approved make and quality S.F.R.C Frame and cover of 56 cm dia etc. Complete as directed by Engineer in charge. | 50 | No | 18014 | 9,00,700.00 |
| **a.** | Rebate for every decrease in depth of 50 cm or part there of | | | 2332/- | |
| **05.** | Refilling the pipe trenches with available excavated stuff with soft material first over pipeline and then material. In 15 cm. Layers with all leads & lifts including consolidation etc complete. | 1950 | M3 | 27/- | 52,650.00 |
| | Total Amount | | | | 32,32,450.00 |
| | Add 5% Conte | | | | 1,61,622.00 |
| | **Total Net Amount** | | | | **33,94,072.00** |

**विभागाचा अभिप्राय/ मत :-** उपरोक्तप्रमाणे मौजे निमगांव हद्दीतील नाला क्र. ३२ मध्ये साईआश्रम व संस्थान कर्मचारी निवासस्थान इमारतीचे सांडपाणी सोडणेकामी नाल्याचे कडेने आर. सी. सी. पाईपची ड्रेनेज लाईन नगर-मनमाड रस्त्याचे पूर्वेस १ कि.मी. पर्यंत टाकणेकामी रक्कम रु.३३,९४,०७२/- मात्र इतका अंदाजे खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करता येईल. याप्रमाणे ड्रेनेज लाईन टाकणेसाठी मा. कार्यकारी अभियंता जलसंपदा विभाग, नाशिक यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तरी याकामी येणारे रक्कम रु.३३,९४,०७२/- मात्रचे अंदाजे खर्चास मा. त्रिसदस्य समितीची मान्यता मिळणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.८३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मधील कर्मचारी निवासस्थान इमारतीच्या सांडपाण्याचे व्यवस्थापनासाठी नाल्याचे कडेने आर. सी. सी. पाईपची ड्रेनेज लाईन नगर-मनमाड रस्त्याचे पूर्वेस १ कि.मी. पर्यंत टाकणेकामी मा. कार्यकारी अभियंता जलसंपदा विभाग, नाशिक यांची परवानगी घेणेत यावी. सदर ड्रनेज लाईनचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३३,९४,०७२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, उपरोक्त खर्चास संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात येऊन, मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२९** **राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत वेळोवेळी लागु करण्यात येणारे नियम, रुग्णांस मोफत औषधे, रक्त इ. पोटी रक्कम रिफंड करणे व मंजुर पॅकेज रकमेपेक्षा प्रत्यक्ष हॉस्पिटलचे बिल कमी झालेली बिले सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त संदर्भीय विषयी, मा.व्यवस्थापन समिती सभेच्या दि.२९.७.२०१२ रोजीच्या सभेतील विषय नं.३, निर्णय क्र.६४७ अन्वये, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने च्या अंमलबजावणीसाठी शासन नियुक्त नॅशनल इन्शुरन्स कंपनीशी MoU करण्यात येवुन, सदर योजनेची, दि.१४.२.२०१३ पासुन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अंमलबजावणी चालु करण्यात आलेली आहे.

**१) योजने अंतर्गत वेळोवेळी लागु करण्यात येणारे नियम:-** सदर योजनेची जसजशी अंमलबजावणी करण्यात येत आहे, तसतशा, मुळ MoU मध्ये स्पष्टपणे नमुद करण्यात न आलेल्या, नवीन बाबी व नियम नॅशनल इन्शुरन्स कंपनीकडुन वेळोवेळी लागु करण्यात येत असुन, सदर नवीन नियम हे मुख्यत: Gudelines for Preauth Approval & Claim Settlement या विषयी असुन, त्या अंतर्गत प्रोसिजर्स्, क्लेम सेटलमेटस्, विविध कारणे व नियमांनुसार करण्यात येणारी मंजुर रक्कमांध्ये करण्यात येणारी कपात/डिडक्शन्स् इ.बाबी व नियम लागु करून बंधनकारक करण्यात आलेले असतात.

उपरोक्त बाबी व नियम MoU मध्ये स्पष्टपणे नमुद करण्यात आलेल्या नसुन, MoU च्या Clause No.5, Sub. Clause 5.6 अंतर्गत “Provider agrees to follow the guidelines issued by the RGJAY Society/Insurer/MDIndia on specific specialties”, असे नमुद करण्यात आले आहे.

त्यानुसार, सोसायटी, नॅशनल इन्शुरन्स कंपनी व MDIndia कडुन वेळावेळी लागु करण्यात येणाऱ्या Guidelines, नियम व अटी बंधनकारक आहेत, अशा प्रकरे आजतागायत लागु करण्यात आलेले नियम खालील प्रमाणे :-

**1. PRE AUTHORISATION :-** The process of Pre-Authorization commences post the REGISTRATION of the patient. The Network Hospital based on the diagnosis admits the patients and sends e-preauthorization to the insurer of the RGJAY. Only in cases, where the patient is admitted in the hospital will the preauthorization be processed.

**2. A. IDENTIFICATION, REGISTRATION AND ADMISSION:-**
**HEALTH CARD:-**

Beneficiaries shall be identified by a “Health Card” issued by the society. This card would be used across all the Network Hospitals to access Health Insurance Benefits. The photograph embedded in the Health Card will be taken as the proof for determining the eligibility of the beneficiaries. If the patient name is not appearing in Health Card/Ration card, he/she should not be enrolled.

If the name is on image of B1 verification form /ration card, but photo is not there even then s/he will still be accepted subject to production of valid photo identity. If the beneficiary instead of health card presents yellow, orange, Antyodaya, Annapurna ration card with valid photo id, s/he will be accepted.

While enrolling/registration of patient based on Health Card, the ARM would ask the beneficiary to furnish Ration card based on which health card was issued on or before discharge.

For New Yellow/ Orange Ration Cards/Annapurna/Antyodaya cards issued after 1st July 2012, the beneficiaries would not be eligible for enrollment/ benefits under the scheme.

**2. B. VERIFICATION OF PRE-AUTHORIZATION DETAILS:-**

**During the Pre-Authorization Process, the following details will be verified & processed accordingly:**-

i. Beneficiary Details
ii. Identity of beneficiary (Not required for beneficiaries holding health card and if the patient photo is visible on ration card)
iii. Date of Admission
iv. Diagnosis
v. Estimated Duration of stay
Vi. Clinical Notes/Operative Notes/claim history
vii. All mandatory investigation reports & other relevant investigations if any -
viii. Package selected by hospital
ix. Name & Qualification of treating Doctor

The list of mandatory investigations for various procedures prepared by technical experts will be circulated and published on website. In case these mandatory investigations are not complied with or partially complied with, NWH will be reminded on every 8 hours and after 48 hours pre-auth

request will be closed.

**2. C. PROCESS OF RAISING QUERIES TO HOSPITAL :-**

If any of above information is missing then query has to be raised to the hospital to enable further processing of the Pre-Authorisation. Aarogyamitra has to follow-up for compliance.

In the meantime, while waiting for a query reply, if there is another Pre-Authorization request received for any other member of the family and approval given, then prior Pre-Authorization will be limited to the BSI (Balance Sum Insured). Same process of closing after 48 hrs will apply for all queries from hospitals

**2. D. SUM INSURED :-**

The Scheme shall provide coverage for meeting all expenses relating to hospitalization of beneficiary members up to INR 1,50,000/- per family per year in any of the Empanelled Hospital/Nursing Home/Day Care Unit.

The benefit shall be available to each and every member of the family on floater basis i.e. the total amount of Rs.1,50,000/- (Rupees one & Half Lakhs only) can be availed either by one individual or collectively by all members of the family. The First Preauth request in, should be First Out. (FIFO)

* Sum Insured includes the treatment of follow up packages.

For Renal Transplant Patient Sum Insured will be INR 2, 50,000 per year.

Response: The break up for renal Transplant:

**निर्णय क्र.८३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत माहिती व तंत्रसंचनालय, महाराष्ट्र शासन यांना पत्र देऊन त्यांचा अभिप्राय घेण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.३३ संगणकाचे अद्ययावत प्रशिक्षण घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात दररोज नव-नविन तंत्रज्ञान येत असतात व त्याची अद्ययावत माहिती व त्याचा जास्तित जास्त बापर दैनंदिन कामकाजात होणेसाठी प्रशिक्षण आवश्यक आहे. सदरील तंत्रज्ञानात होणारा बदल हा साधारणपणे ३ ते चार वर्षा इतका असतो. यामुळेच माहिती तंत्रज्ञान विभाग महाराष्ट्र शासन यांनी दर तिन वर्षांनी तंत्रज्ञानत बदल झाल्यामुळे संगणकीये साहित्य खरेदी करणेबाबतचा जीआर काढलेला आहे. सदरील जीआर सॉफ्टवेअर क्षेत्रात देखील लागू पडतो.

सध्या माहिती तंत्रज्ञान विभागाकडे विभाग प्रमुख व ६ तांत्रिक अधिकारी/ कर्मचारी आहे. साईटेक प्रकल्प हा अंतिम टप्प्यात असल्याने त्यांचे नुतनिकृत व अद्ययावत संगणक प्रणालीचे Source Code कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे हे इकडील विभागास देणार आहे. त्यामुळे माहिती तंत्रज्ञान विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांना अद्ययावत तांत्रिक प्रशिक्षणाची तातडीने आवश्यक्ता आहे. याबाबत मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे सोबत दिनांक २१/०८/२०१३ रोजी आढावा बैठक झालेली आहे.

**मागणी :** साईटेक प्रकल्प व सध्याचे तंत्रज्ञानाचे आधारे प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे कार्यगट प्रस्तावित करण्यात आलेले असून यासाठी पुणे येथिल Seed Infotech Ltd, Pune या नामांकित प्रशिक्षण देणाऱ्या कंपनीस संपर्क साधून प्रशिक्षणाचा खर्च मागविण्यात आलेला असून तो पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | प्रशिक्षण कोर्सचे नांव | प्रशिक्षण कालावधी (दिवस) | प्रशिक्षणाचा प्रतिदिनी खर्च | कर्मचारी/ कार्यगट |
|---|---|---|---|---|
| 01 | Java/ J2EE- JBOSS, Apache, Spring, Hibernate, Struts | 20 | 19,000/- + TAX | श्री गवळी, श्री पुजारी |
| 02 | Microsoft.Net-ASP.Net and C# | 12 | 18,000/- + TAX | श्री कोते, श्री शिंदे, श्री जोरी |
| 03 | Oracle 11G SQL, PL/SQL and DBA | 15 | 18,000/- + TAX | श्री कोते, श्री गवळी, श्री शिंदे |
| 04 | OBIEE | 10 | 29,000/- + TAX | श्री कोते, श्री पुजारी, श्री शिंदे |
| 05 | Network and Sys Admin- CISCO and Windows, Juniper Firewall | 20 | 23,000/- + TAX | श्री कोते, श्री गवळी, श्री पुजारी, श्री शिंदे, श्री जोरी |
| 06 | Linux Admin | 05 | 14,000/- + TAX | |
| 07 | Corporate Communication | 03 | 17,000/-+ TAX | |
| 08 | Project & Suport Management | In pune (20 दिवस) | 50,000/- + TAX (Lum-Sum) | श्री राहुल गलांडे |

प्रशिक्षकांसाठी जाणे-येण्याचे भाडे व राहाण्याचा खर्च देणे अपेक्षित आहे. साईटेक प्रकल्पा अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या संगणक प्रणालींचे Source Code कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे हे संस्थानला देणार असल्यामुळे संस्थानला सदर तंत्रज्ञानाचे Traning घेणे अपेक्षित आहे. उपरोक्त नमूद केलेल्या संगणक प्रणाली साईटेक प्रकल्पात वापरण्यात आलेल्या आहेत. सर्व प्रशिक्षण एकाच वेळी घेणे खर्चीकबाब ठरु शकते यामुळे वर नमूद केलेल्या कोर्सपैकी अ.नं. १,२,३,५,६ व ७ चे प्रशिक्षण प्रथम टप्प्यात देण्यात यावे व त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता असावी, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :** उपरोक्त विविचेनानुसार माहिती तंत्रज्ञान विभागातील कर्मचाऱ्यांचे तांत्रीक ज्ञान व कामकाजाच्या अधारे Java/ J2EE- JBOSS, Apache, Spring, Hibernate, Struts, Microsoft.Net-ASP.Net and C#, Oracle 11G SQL, PL/SQL and DBA, OBIEE, Network and Sys Admin- CISCO and Windows, Juniper Firewall, Linux Admin, Corporate Communication, Project & Suport Management इत्यादीचे प्रशिक्षण Seed Infotech Ltd., Pune यांचेमार्फत घेणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाचे मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.८३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत साईटेक प्रकल्प राबविणाऱ्या मे.कॉग्निझंट टेक्नॉलॉजी, पुणे या कंपनीच्या प्रतिनिर्धीबरोबर मा.कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेबरोबरचा मुळ करारनामा तपासून चर्चा करावी व यथायोग्य निर्णय घ्यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.३४** **संस्थानचे वेबसाईटसाठी Cyber Expert/ Consultant नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानची **www.saibaba@sai.org.in** या नावाने वेबसाईट दिनांक १९ नोव्हेंबर, १९९८ पासून ऑनलाईन आहे. या वेबसाईटवर संस्थान प्रकाशीत सर्व प्रकाशने, ऑनलाईन डोनेशन, ऑनलाईन रुम बुकींग, नेट बॅकींग आदि. सुविधा श्री साईभक्तांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच Vistaas digital Media Private Ltd., Mumbai यांचेमार्फत संस्थानचे व त्यांचे वेबसाईटवर संपूर्ण दिवसांचे लाईव्ह दर्शन सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. या व्दारे संस्थानला वार्षिक रु.३.२ करोड रॉयल्टी स्वरुपात मिळत आहे.

उपरोक्तप्रमाणे उपलब्ध असलेल्या सेवा-सुविधा व त्या वेळोवेळी करण्यात येत असलेले बदल यामुळे संस्थान वेबाईटला भेट देणाऱ्या साईभक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या दैनंदिन साधारणतः १० ते १५ हजार साईभक्त भेट असून ऑनलाईन या वेबपेजला दैनंनि २० ते २२ हजार साईभक्त भेट देतात. www.google.com या Serach Engine वर www.shrisaibabasansthan.org ही वेबसाईट एक नंबरवर आहे.

संस्थानचे वेबसाईटला भेट देणाऱ्यांमध्ये काही विघ्नसंतोषी व्यक्तीचाही समावेश असण्याची शक्यता असते. सदर व्यक्ती संस्थान वेबसाईट हॅक करुन लाईव्ह दर्शन लिंक कॉपी करणे, वेबपेजला हॅक करणे तसेच इतर वेबसाईटवर श्रींविषयी चुकीची माहिती देणे आदि. प्रकार करतात.

आकृतीबंधानुसार वेबसाईट कक्षामध्ये सायबर लॉ बाबातचे कुठलेही पद सामाविष्ठ नसुन सायबर लॉबाबतचे शैक्षणिक पात्रतेचा एकही कर्मचारी इकडील कक्षाकडे उपलब्ध नाही. वेबसाईट कक्षात असणा-या कर्मचारी/ अधिकारी हे तांत्रिक स्वरुपाची कामे करत आहे. उपरोक्तप्रमाणे चुकीची माहिती शोधून त्यावर काय कार्यवाही करावी यासाठी ॲडव्होकेटचा सल्ला घ्यावा लागतो. परंतु यात पाहिजे तसा सल्ला मिळत नाही व कारवाई होत नाही.

**मागणी:** उपरोक्तप्रमाणे विविध वेबसाईटवर संस्थान व श्रींविषयी उपलब्ध असलेली चुकीची माहिती शोधणे व त्यावर योग्य कार्यवाही करणे हे जोखमीचे व जबाबदारीचे कामकाज असल्याने सदरचे कामकाजासाठी Cyber Expert / Consultant नेमणूक करणे आवश्यक आहे, असे मत आहे.

याबाबत ॲड. प्रशात माळी, ॲडव्होकेट मुंबई हायकोर्ट यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी त्यांचे ई-मेलव्दारे खालीलप्रमाणे कामकाजात लिगल ॲडव्हायजरची मदत होईल, असे कळविले आहे. त्यानूसार खालील कामासाठी Cyber Expert / Consultant नेमण्यात यावा.

०१. संस्थानने परवानगी दिलेल्या टि.व्ही चॅनेल्स, मोबाईल, इंटरनेट यांव्यतिरिक्त अन्य कोणत्या टि.व्ही चॅनेल्स, मोबाईल, इंटरनेटवर श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा सुरु आहे, याची वेळोवेळी माहिती घेणे.

०२. विविध चॅनेल्स पार्ट्या यांचेशी वेळोवेळी करण्यात येणाऱ्या करारनाम्यांसंदर्भात कामकाज करणे.

०३. श्रींविषयी किंवा श्री साईबाबा संस्थान विषयी चुकीची माहिती देणाऱ्या संबधीतांवर/ वेबसाईटवर कायदेशीर कारवाई करणे.

०४. वेबसाईट देखभाली विषयीचे, वेबसाईट कायद्याचे संपूर्ण ज्ञान/ कौशल्य असलेले कर्मचारी संस्थानकडे उपलब्ध नाही व असे उमेदवार मिळत नसल्याने वेबसाईट संदर्भातील कामकाज सायबर लॉ लिगल ॲडव्हायजर यांचेकडून करुन घेता येईल.

०५. आयटी आणि आयटी सिक्युरिटीशी निगडीत उत्पादनांबाबत सल्ला देणे.

०६. संस्थानला एखादी सिक्युरिटी सिस्टिम कार्यान्वीत करणेकामी सल्ला देणे.

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेकामी त्यांसाठी वर्षाला साधारण कमीत कमी रु. ८ लाख फी अपेक्षीत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः** उपरोक्तप्रमाणे, संस्थानचे वेबसाईटला भेट देणाऱ्यांमध्ये काही विघ्नसंतोषी व्यक्तीचाही समावेश असण्याची शक्यता असते. सदर व्यक्ती संस्थान वेबसाईट हॅक करुन लाईव्ह दर्शन लिंक कॉपी करणे, वेबपेजला हॅक करणे तसेच इतर वेबसाईटवर श्रींविषयी चुकीची माहिती देणे आदि. प्रकारवर नियत्रंन करणेकामी व कायदेशीर कारवाईकामी वरीलप्रकारे नांमवंत संस्थेस संस्थानचे सायबर लॉ लिगल ॲडव्हायजर म्हणून नेमणूक करणे कामी संस्थान वेबसाईटवर जाहिरात देवून निविदा मागविणेसाठी सदर प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.८३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान वेबसाईट हॅक करुन लाईव्ह दर्शन लिंक कॉपी करणे, वेबपेजला हॅक करणे, इतर वेबसाईटवर श्रींविषयी चुकीची माहिती देणे असे प्रकार रोखण्यासाठी सायबर क्राईम विभागाकडून Consultant बाबत माहिती जमा करुन सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

**तसेच, तोपर्यंत असे प्रकार आढळून आल्यास पुढील कार्यवाहीसाठी सायबर क्राईम विभाग, अहमदनगर यांचेकडे पाठवित जावे व यासाठी सायबर क्राईम विभाग, अहमदनगर यांना नियमाप्रमाणे त्यांची फी आदा करावी, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.३५** **सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ लागू करणेकामी गोपनीय अभिलेख्याच्या सरासरी प्रतवारीमध्ये शिथीलता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय,क्रमांक वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३ दि.१/४/२०१० व महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय, क्रमांक वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा-३ दि.५/७/२०१० अन्वये राज्य शासकिय कर्मचा-यांना लागू असलेली 'सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ' संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांना लागू करणेबाबत मा.व्यवस्थापन त्रिसदसीय समितीचे दि.२६/०२/२०१३ रोजीचे सभेमध्ये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्र. १४७:- "शासन निर्णय क्रमांक वेतन -११०९/प्र.क्र.४४/सेवा मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दि.०१ एप्रिल २०१० नुसार राज्य शासकिय कर्मचा-यांना लागू करणेत आलेली "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना" संस्थान आस्थापनेवरील पात्र ठरणा-या कर्मचा-यांना लागू करण्यात यावी.

तसेच सदर योजनेचा दुसरा लाभ मिळणेसाठी साधारणपणे पात्र असलेल्या २३४ कर्मचा-यांची शासन निर्णयाप्रमाणे गोपनीय अहवालाची पडताळणी करुन पात्र कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसरा लाभ देणेत यावा."

उपरोक्त निर्णयानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्ट '१' मधील कर्मचा-याना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेपासून सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ देय होत आहे.

संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयात सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ मंजूर करताना पदोन्नतीची संधी उपलब्ध असलेल्या पदाचा वेतन बँड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात यावे असे नमूद केलेले आहे.

संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयात सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ मंजूर करताना एकाकी व पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसलेल्या पदांसाठी वेतन बँड मध्ये बदल होणार नाही. त्यांना अतिरिक्त ग्रेड वेतन मिळेल असे नमूद केलेले आहे.

संस्थान आस्थापनेवरील पदांची (पदोन्नतीची पदे, पदोन्नतीची संधी उपलब्ध नसेलेली व एकाकी पदे) व्याख्या निश्चित केलेली नसल्याने उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार दुसरा लाभ देय झालेल्या कर्मचा-याची वेतननिश्चिती करताना अडचणी येत आहेत.

सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ प्रथम दर्शनी देय होत असलेली संस्थान आस्थापनेवरील पदे सोबतचे परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविली आहेत.

सहावा वेतन आयोग सुधारित वेतन नियम,२००९ मधील तरतूद क्र.१४

दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचा-यांची वेतननिश्चिती -

**(२)** दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्यानंतर पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असूनही प्रत्यक्ष पदोन्नती न मिळालेल्या कर्मचा-यास पदोन्नतीच्या पदाचा वेतन बॅण्ड अनुज्ञेय राहील आणि सदर वेतनबॅण्डमधील वेतननिश्चिती यथास्थिती नियम ७ किंवा ११ नुसार करण्यात यावी. मात्र त्यास कालबध्द पदोन्नती किंवा सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेड वेतन अधिक सदर ग्रेड वेतन आणि पदोन्नतीच्या पदाचे ग्रेड वेतन यामधील फरकाच्या ५० टक्के किंवा रु.१००/- यापैकी जे जास्त असेल ते ग्रेड वेतन अनुज्ञेय राहील. उर्वरीत ग्रेड वेतन अनुज्ञेय असल्यास प्रत्यक्ष पदोन्नतीचे वेळेस अनुज्ञेय होईल. मात्र पुन्हा वेतनवेढीचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

**(३)** दिनांक १ जानेवारी २००६ पूर्वी कालबध्द पदोन्नती अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या व पदोन्नतीच्या संधी नसलेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीत अनुज्ञेय वेतन बॅण्ड व ग्रेड वेतन मंजूर करण्यात येईल व त्यांची वेतननिश्चिती यथास्थिती नियम ७ किवा ११ नुसार करण्यांत यावी. तसेच त्यांना खाली दिल्या प्रमाणे अतिरिक्त ग्रेड वेतनही अनुज्ञेय राहील.

**अ)** उक्त योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेड वेतन रु.२०००/- पर्यंत असल्यास अतिरिक्त ग्रेड वेतन रु.२००/-

**(ब)** उक्त योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेड वेतन रु.२०००/- पेक्षा जास्त व रु.४०००/- पेक्षा कमी असल्यास अतिरिक्त ग्रेड वेतन रु.३००/-

**(क)** उक्त योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेड वेतन रु.४०००/- पेक्षा जास्त व रु.५०००/- पेक्षा कमी असल्यास अतिरिक्त ग्रेड वेतन रु.४००/-

**(ड)** उक्त योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या विद्यमान वेतनश्रेणीस अनुज्ञेय ग्रेड वेतन रु.५०००/- पेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त ग्रेड वेतन रु.५००/- असे नमूद केलेले आहे. त्यामुळे सोबतचे परिशिष्ट "अ" मधील अ.नं. ९ ते १२ पदावरील कर्मचा-यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला लाभ मंजूर करताना संस्थान आस्थापनेवरील पदांची व्याख्या निश्चित झाली नसल्याने व संबंधिताना कार्यात्मक पदोन्नती (पदोन्नतीचे पद) दिली नसल्याने सहावा वेतन आयोगातील सुधारित वेतन नियम,२००९ तरतूद क्र.१४ (२) अन्वये वेतन निश्चितीचा लाभ देण्यात आलेला आहे.

संदर्भ क्र.२ नुसार खालील पदांसाठी सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ मंजूर करताना त्यांचे वेतन बँड मध्ये बदल होणार नाही त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे अतिरिक्त ग्रेड वेतन देय होईल.

दुसरा लाभ देय झालेल्या कर्मचा-यांमधील साधारणपणे पदोन्नतीची संधी उपलब्ध नसलेली/ एकाकी पदे सोबत परिशिष्ट 'ब ' मध्ये दर्शविली आहेत.

**तसेच सदर योजनेच्या दुस-या लाभासाठी पात्रतेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.**

**०१)** पहिला लाभ घेतलेल्या व त्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यास दुसरा लाभ मंजूर करतांना तो पहिल्या लाभाप्रमाणेच दिनांक २० जुलै २००१, च्या आदेशामधील व यासंबंधी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या स्पष्टीकरणात्मक आदेशातील तरतूदींच्या अधिन राहून मंजूर करण्यात यावा. म्हणजेच ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येणार आहे, त्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळण्यासाठी विहीत केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

**०२)** पहिल्या लाभांतर्गत पदोन्नतीच्या ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे त्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती न मिळालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत, दुसरा लाभ मंजूर करण्यासाठी, त्याला ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येणार आहे त्या पदावरील पदोन्नतीसाठी विहीत केलेली गोपनीय अहवालाची किमान सरासरी प्रतवारी प्राप्त करणे आवश्यक राहील.

यापूर्वी संस्थान कर्मचा-यांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करतांना पात्र तारखेच्या लगतच्या मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेऊनच कालबध्द वरची वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. या कारणासाठी विभागीय परिक्षा घेण्यात आलेली नाही. या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचा विचार करता सोबतचे परिशिष्ट-०१,०२,०३ मध्ये नमूद केले कर्मचारी सुधारित आश्वासित प्रगती योजना मधील दुसरा लाभ देण्यास पात्र होतात किंवा कसे ? याची छाननी प्रशासना तर्फे प्रामुख्याने खालील निकषावर करण्यात आलेली आहे.

संबंधीत कर्मचा-यांचे देय तारखेच्या लगतच्या मागील ०५ वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात आलेले आहेत. गोपनीय अहवाल लिहीतांना कर्मचा-याबाबत सर्वसाधारण मूल्यमापन खालील प्रमाणे करण्याची पध्दती आहे.

०१) अ+ = अत्युकृष्ट ०२) अ= उत्कृष्ट ०३) ब+ = निश्चित चांगला ०४) ब = चांगला
०५) ब - = साधारण ०६) क = साधारणपेक्षा कमी.

**शासकिय सेवेतील कर्मचा-यांचे पदोन्नतीसाठी गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचे निकष ठरविण्यासाठी खालील प्रमाणे मार्गदर्शक तत्वाचा विचार करण्यात येतो.**

**०१)** वेतन श्रेणीतील पे बँड -१एस (रु. ४४४०-७४४०) पासून पद धारण करणारे आणि प्रतिमहिना रु. १३०० परंतु वेतन श्रेणीतील पे बँड -२ (रु. ९३००-३४८००) पर्यंत पद धारण करणारे आणि प्रतिमहिना रु.४२०० पर्यंत ग्रेड वेतन घेणारे कर्मचा-यांसाठी पाच वर्षाचे गोपनीय अभिलेखाची सरासरी प्रतवारी **ब+ (निश्चित चांगली)** प्राप्त करणे आवश्यक आहे.

**०२)** वेतन श्रेणीतील पे बँड -२ (रु. ९३००-३४८००) पासून पद धारण करणारे आणि प्रतिमहिना रु. ४२०० पेक्षा जास्त परंतु वेतन श्रेणीतील पे बँड -३ (रु. १५६००-३९१००) पर्यंत पद धारण करणारे आणि प्रतिमहिना ५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणारे कर्मचा-यांसाठी पाच वर्षाचे गोपनीय अभिलेखाची सरासरी प्रतवारी **'अ ' (उत्कृष्ट )** प्राप्त करणे आवश्यक आहे.

**०३)** वेतन श्रेणीतील पे बँड-०१ एस (रु.४४४०-७४४०) व प्रतिमहिना ग्रेड वेतन रु.१३०० पासून ते वेतन श्रेणीतील पे बँड -३ (रु. १५६००-३९१००) व प्रतिमहिना ग्रेड वेतन रु.५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणारे एकाकी/पदोन्नतीची संधी उपलब्ध्द नसलेल्या पदावरील कर्मचा-यांच्या गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी **'ब+'(निश्चित चांगली)** प्राप्त करणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे मार्गदर्शक तत्वानुसार -

**अ) "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत"** दुस-या लाभासाठी सोबतच्या **परिशिष्ट '१'** मधील **एकूण- १३५** कर्मचारी पात्र होत आहेत.

**ब) "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत"** दुस-या लाभासाठी सोबतच्या **परिशिष्ट '२'** मधील **एकूण- ८७** कर्मचारी अपात्र होत आहेत.

**क)** **"सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत"** दुस-या लाभासाठी सोबतच्या **परिशिष्ट '३'** मधील **एकूण- ०५ कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल अपूर्ण असल्याने** सदर कर्मचारी अपात्र होत आहेत.

संस्थान आस्थापनेरील सर्व पदांची विगतवारी (पदोन्नतीची पदे,पदोन्नतीची संधी उपलब्ध नसलेली/ एकाकी पदे) संस्थान प्रशासकिय पातळीवर ठरविणे अडचणीचे होत आहे. सबब सदर पदाची निश्चिती प्रशासकीय पातळीवर करुन प्रशासनाने दिलेला अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करुन व्यवस्थापन समितीकडून मान्यता घेऊन, त्यातील बदलास अधिन राहून सध्या उपरोक्त पदांची विगतवारी परिशिष्ट 'अ' व 'ब ' प्रमाणे ठरविता येईल. त्याबाबत संबंधिताकडून तसे " बंधपत्र " घेता येईल.

उपरोक्त प्रस्तावित केलेप्रमाणे मार्गदर्शक तत्वानुसार "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत "दुस-या लाभासाठी सोबतच्या परिशिष्ट '१' मधील एकूण- १३५ पात्र कर्मचा-यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/८९१/२०१३ दि.१० जून २०१३ व जा.नं.एसएसएस/वशी-०१/११४६/२०१३ दि.०४ जुलै २०१३ रोजीच्या आदेशातील दुरुस्तीनुसार लागू करण्यात आलेले आहे.

सदर योजना लागू करण्यासाठी चे मार्गदर्शक तत्वानुसार सोबतच्या परिशिष्ट-०२ मधील एकूण-८७ कर्मचारी हे उपरोक्त योजना लागू करण्यासाठी अपात्र ठरलेले आहेत.

सदर अपात्र कर्मचा-यांनी विनंती अर्ज केला असून त्यात "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार दुसरा लाभ १३५ कर्मचा-यांना मिळालेला असून त्याबद्दल मा.त्रिसदसीय समिती सदस्य व मा.उपकार्यकारी अधिकारी, प्रशासकिय अधिकारी यांचे धन्यवाद मानतो.

परंतु सदर योजनेचा लाभ काही कर्मचा-यांना मिळालेला नाही. आम्ही कर्मचारी आपणास समक्ष भेटलो असता तुमचे गोपनीय अहवालाची प्रतवारी नियमात बसत नसलेचे सांगीतले आहे.

आम्ही सर्व ०१ ते ८७ कर्मचारी आपणास विनंतीपूर्वक कळवू इच्छितो की, आमची संस्थानमध्ये साधारणत ३४ ते ३६ वर्षे सेवा झालेली आहे. या काळात आमचेकडून कोणतेही गैरवर्तन झालेले नाही. तरीही आम्ही सदरचे लाभापासून वंचीत रहात आहोत. तरी गोपनीय अहवालाची प्रतवारी शिथील करुन सदरचे योजनेचा लाभ आम्हांस मिळावा" असे नमूद केले आहे**.**

उपरोक्त कर्मचा-यां मध्ये ०१ सहाय्यक पुजारी, ८३ वर्ग-०४ कर्मचारी तसेच ०३ सिस्टर इनचार्ज असून त्यांचेबाबत लगतचे ०५ वर्षामध्ये सेवा पुस्तकातील नोंदी तसेच वैयक्तीक धारिण्या पाहील्या असता त्यामध्ये-

| परिशिष्ट | तपशिल | ४२०० किंवा त्यापेक्षा कमी ग्रेड वेतन घेणारे कर्मचारी | ४२०० पेक्षा जास्त ग्रेडवेतन घेणारे कर्मचारी |
|---|---|---|---|
| ०१ | गैरवर्तन रिपोर्ट नसलेले कर्मचारी | ४२ | ०१ |
| ०२ | गैरवर्तन रिपोर्ट नुसार ताकीद, सक्त ताकीद अशी किरकोळ स्वरुपाची शिक्षा झालेले कर्मचारी | ०७ | ०२ |
| **०३** | गैरवर्तन रिपोर्ट नुसार विनापरवानगी गैरहजर, दंड, सेवा निलंबन अशा गंभीर स्वरुपाची शिक्षा झालेले कर्मचारी | २५ | ०० |
| **०४** | गोपनिय अहवालानुसार बी- प्रतवारी असलेले कर्मचारी | १० | ०० |

**अ)** परिशिष्ट ०१ मध्ये गैरवर्तन केलेबाबत संबंधीत विभाग प्रमुख यांचे अहवाल नाहीत व त्यांना शिक्षा, ताकीद देण्यात आलेली नाही असे एकूण- ४२ तसेच त्यांना शिक्षा केलेबाबत नोंदी नाहीत तसेच कुठल्याही प्रकारे ताकीद, दंड अथवा निलंबन अशा शिक्षा झालेल्या नाहीत तथापी त्यांचे गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी **'ब'** अशी येत आहे. परिशिष्ट ०१ मध्ये सिस्टर इनचार्ज पदावरील -०१ कर्मचारी असून त्यांची प्रतवारी बी + अशी येत आहे.

**ब)** परिशिष्ट ०२ मध्ये काही कर्मचारी यांचे बाबत गैरवर्तन रिपोर्ट नुसार ताकित, सक्त ताकिद अशी किरकोळ स्वरुपाची शिक्षा झालेल्या आहेत तथापी त्यांचे गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी **'ब'** अशी येत आहे. असे एकूण- **०७** आहेत. परिशिष्ट ०२ मध्ये सिस्टर इनचार्ज पदावरील -०२ कर्मचारी असून त्यांची प्रतवारी बी + अशी येत आहे.

**क)** परिशिष्ट ०३ मध्ये गैरवर्तन रिपोर्ट नुसार विनापरवानगी गैरहजर,दंड, सेवा निलंबन अशा गंभीर स्वरुपाची शिक्षा झालेले एकूण- २५ कर्मचारी आहेत.

**ड)** परिशिष्ट ०४ मध्ये गोपनिय अहवालानुसार बी- प्रतवारी असलेले एकूण १० कर्मचारी आहेत.

**ई)** तसेच उपरोक्त एकूण ८७ कर्मचाऱ्यांपैकी परिशिष्ट ०३ मधील गंभीर स्वरुपाची शिक्षा झालेले २५ व परिशिष्ट ०४ मध्ये गोपनिय अहवालाची सरासरी प्रतवारी बी- असलेले १० असे एकूण ३५ कर्मचारी अपात्र आहेत.

सदर योजना लागू करणेबाबतचे मार्गदर्शक तत्वे व तसेच उपरोक्त ०१ ते ८७ कर्मचारी यांचे अर्जातील विनंती विचारात घेऊन शिथीलता द्यावयाची झाल्यास "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत" दुसरा लाभ मंजूर करतांना (ज्या ठिकाणी गोपनीय अहवालाची (शासकिय सेवेत) सरासरी प्रतवारी 'ब+' आवश्यक आहे तेथे (गैरशिस्त वर्तन रिपोर्ट नाही किरकोळ स्वरुपाची शिक्षा झालेले) 'ब' आणि ज्या ठिकाणी 'अ' अशी आवश्यक आहे त्याठिकाणी (गैरशिस्त वर्तन रिपोर्ट नाही किरकोळ स्वरुपाची शिक्षा झालेले) 'ब+' अशी शिथील करुन धरावी लागेल.

यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०२/२००९ चे सभेतील निर्णय क्र.७५ (०३) नुसार अश्वासित प्रगती योजनेचा लाभ देताना व मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.१४८ नुसार पदस्थापना करताना गोपनिय अहवालाचे प्रतवारीमध्ये शिथीलता देण्यात आली आहे.

तरी उपरोक्त (अ) व (ब) मध्ये नमूद प्रमाणे गोपनिय अहवालाच्या प्रतवारीमध्ये शिथीलता देणेबाबत तसेच योजनेचा लाभ सोबतच्या परिशिष्ट ०१ व ०२ मध्ये नमूद केलेल्या एकूण ५२ कर्मचाऱ्यांना सदर योजनेचा लाभ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.८४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावीत कर्मचाऱ्यांना त्यांच्या गोपनीय अहवालाबाबत माहिती देण्यात यावी व त्यानुसार संबंधीत कर्मचाऱ्यांचे लेखी म्हणणे घेण्यात येऊन, त्या-त्या विभागाचे विभागप्रमुख तसेच, प्रशासकीय अधिकारी/ प्र.प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्राय घेण्यात यावे व अपात्र कर्मचाऱ्यांमधील योग्य कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालाचा पुनर्विचार होणेसाठी सदरहू अभिप्राय मा.व्यवस्थापन समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **नविन मोबाईल मेडीकल व्हॅन वाहन खरेदीकामी प्राप्त कोटेशन्स उघडून चर्चा/ वाटाघाटीअंती निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२७/०४/२०१३ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.४०५ अन्वये, नवीन मोबाईल मेडीकल व्हॅन खरेदी करणे कामी टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून टाटा एलपी ७०९ या मॉडेलची चेसी खरेदी करुन नामांकित बॉडीबिल्डर यांचेकडून आपणास आवश्यक अशी मोबाईल मेडीकल व्हॅन बॉडीबांधणी करुन घेणेस व या कामी येणारे अंदाजे रु.१४,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. चौदा लाख मात्र) चे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

वरील निर्णयानुसार, खालील प्रमाणे टाटा एलपी ७०९ मॉडेलच्या चेसी करीता टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून जा.नं.एसएसएस/वाहन/२४५९/२०१३ दि.२७/०८/२०१३ ने तसेच बॉडी बांधणी करीता बॉडीबिल्डर यांचेकडून जा.नं.एसएसएस/वाहन/२४६० दि.२७/०८/२०१३ ने कोटेशन बोलाविण्यात आली होती. सदर कोटेशन दि.०७/०९/२०१३ अखेर पोहोचतील अशा प्रकारे पाठविणे बाबत कळविण्यात आले होते. परंतु, टाटा४०७ चेसी करीताचे अ.नं.०१ व ०३ चे कोटेशन्स मुदतीत प्राप्त झालेली असुन अ.नं.०२ चे तसेच बॉडीबांधणीचे तीनही कोटेशन्स उशीरा प्राप्त झालेली आहेत. प्राप्त झालेली कोटेशन्स खालील प्रमाणे.

**अ) टाटा एलपी ७०९ चेसी करीता प्राप्त कोटेशन्सः-**

| अ.नं. | पार्टीचे नांव | आवक नंबर / दिनांक | |
|---|---|---|---|
| ०१ | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर | ९४२१-०७/०९/२०१३ | बंद कोटेशन |
| ०२ | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक | १०२१२-२४/०९/२०१३ | ई-मेल कोटेशन |
| ०३ | मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर | ९४१२-०७/०९/२०१३ | बंद कोटेशन |

**ब) बॉडी बांधणी करीता प्राप्त कोटेशन्सः-**

| अ.नं. | पार्टीचे नांव | आवक नंबर / दिनांक | |
|---|---|---|---|
| ०१ | सिगमा ॲटो क्राफ्ट प्रा. लि., ठाणे | ९६८९-१३/०९/२०१३ | बंद कोटेशन |
| ०२ | जयानंद खिरा & कंपनी प्रा. लि., पुणे | ९८१८-१७/०९/२०१३ | खुले कोटेशन |
| ०३ | सॅमसन मोटर्स, वसई | १०१८०-२३/०९/२०१३ | खुले कोटेशन |

**अ) टाटा ७०९ (LP ७१२/ ४२) चेसी खरेदीकरीता** प्राप्त झालेले बंद कोटेशन्स आजचे सभेत उघडणेत येउन कोटेशन्सधारकांना सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता अ.नं.०१ व ०३ चे कोटेशनधारकांनी without cowl दर भरलेचे निदर्शनास आले, त्यामुळे त्यांना Cowl सहित दर देण्यास सांगणेत आले. त्यांनी देऊ केलेले दर खालीलप्रमाणे.

| अ.नं. | पार्टीचे नांव | कोटेशन मधील दर (Without Cowl) रु. | नवीन दर (Cowl सहित) | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | स्टर्लिग मोटर्स, बाभळेश्वर | ८,७१,७३५/- | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०२ | स्टर्लिग मोटर्स, नाशिक | ८,९४,३३९/- | ९,०७,०९६/- | ८,६७,०९६/-<br>(CRTM charge extrra) |
| ०३ | मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर | ८,५९,८७१/- | ९,०७,०९६/- | ८,६४,९९६/-<br>(CRTM charge extrra) |

**ब) बॉडी बांधणी करीता** प्राप्त झालेले बंद कोटेशन्स आजचे सभेत उघडणेत येउन कोटेशन्सधारकांना सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पार्टीचे नांव | कोटेशन मधील दर (टॅक्स सहित) रु. | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेले दर (टॅक्स सहित) रु. |
|---|---|---|---|
| ०१ | सिगमा ॲटो क्राफ्ट प्रा. लि., ठाणे | १३,७२,१००/- | १३,५०,०००/- |
| ०२ | जयानंद खिरा & कंपनी प्रा. लि., पुणे | ८,८३,४४४/- | ८,६६,५६९/- |
| ०३ | सॅमसन मोटर्स, वसई | ९,०९,९२८/- | अनुपस्थित |

**निर्णय क्र.८४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, नविन मोबाईल मेडीकल व्हॅन वाहन खरेदीकामी (अ) टाटा ७०९ (LP ७१२/ ४२) चेसी करीता मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर यांचे रु. ८,६४,९९६/- (CRTM charge extra) मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**(ब) सदर चेसीवर बॉडी बांधणी करीता कोटेशनधारकांनी दिलेल्या अंतीम दरामध्ये फारच तफावत असल्यामुळे उपरोक्त तीनही कोटेशनधारकांना चर्चा/ वाटाघाटीकरीता पुन्हा एकत्रित बोलविणेत यावे.**

**तसेच याकामी येणा-या सर्वसमावेशक वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२ सेवाकराबाबत सल्लागाराची नेमणूक होणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक १० सप्टेंबर, २०१३ रोजी मा.आयुक्त सेंट्रल एक्साईज ॲण्ड कस्टम्स्, सर्व्हिस टॅक्स, औरंगाबाद यांचे कार्यालयाचे श्री. ऐ.जी.साबळे अधिक्षक, त्यांचे पथकासोबत साईबाबा संस्थानला विविध मार्गाने मिळणारे मक्ता शुल्क (Royalty), वाहनतळ, दुकानगाळे, रक्कम रुपये १०००/- पेक्षा जास्त सेवाआकर असलेल्या निवासस्थानापासुन मिळालेले उत्पन्न, दर्शन आरती पासुन मिळालेले उत्पन्न, विदेशातील संस्थाना दिलेली रक्कम, संस्थानचे कंत्राटदार आदी बाबतचे दस्तऐवजाची पडताळणी करीता कागदपत्राची मागणी केलेली होती. याबाबत त्यांना लेखी मागणी करणेबाबत सुचविल्या नतंर त्यांनी संस्थानला उपरोक्त संदर्भ क्र.०१ चे पत्र दिले आहे.

दिनांक ११ सप्टेंबर, २०१३ रोजी मुख्य लेखाधिकारी यांचे नांवे पत्र क्रमाक F.NO VGN(30) 05SIV-III/ Shirdi/12-13 दिनांक ११ सप्टेंबर, २०१३ कॅम्प शिर्डी समन्स (SUMMONS) नुसार खालील प्रमाणे कागदपत्राची मागणी केली होती.

1. Copies of the audited Balance Sheets for the period 2007- to June 2013
2. Copies of following ledgers for the period Oct 2007 to June 2013
   a. Royalty payments ledgers in respect of various service providers.
   b. Amount received ledgers from the Renting of the Immovable Property namely Business Premises, Parking Places, Shops / outlets etc

c. Lodging receipts of room for which declared tariff is Rs 1000/- or more per day 11/5/2011 to June 2013
d. Fixed rate charges received ledgers on account of special darshan of Aarti Passes for the period 01/07/2012 to June 2013
e. Online booking service charges received from customers.
f. Import Services Payments made ledgers in respect of services received from foreign countries firms namely Lesser vision Garden, Hong Kong etc
g. Hire charges received in respect of carrying the passengers rent a Cab Services.
h. Expenses ledgers in respect of the payments made to the contractors namely Laddu Making Chapatti Making, House Keeping, Security Services Maintenance & Repair Services, Payments made to the Contractors for the Building Construction stc.and its repair & maintenance
i. details of services provides by Computer Data Cable and
j. Copies of the agreements for providing services and receiving services in respect of services mentioned at serial No.2 (a to h) along with the sample copies of the invoices.
k. Payments received for sponsorship services.

उपरोक्त दोन्ही पत्राचे अनुषंगाने मा.कार्यकारी अधिकारी यांचे पुर्वपरवानगीने २००७ ते ऑगस्ट २०१३ अखेर लगेच उपलब्ध होणारे जमाखर्च उतारे व खाते उतारे तसेच संस्थान व कंत्राटदारामध्ये झालेल्या विविध कराराच्या प्रती त्यांना पडताळणी व इतर कागदपत्र तपासणीसाठी समक्ष घेऊन गेलेले आहे.

श्री. ए. जी.साबळे, अधिक्षक व त्यांचे सहका-यांचे समवेत झालेल्या समक्ष चर्चे दरम्यान, संस्थानचे काही सेवा प्रथमदर्शनी (Prima facie) सेवाकराच्या (सुधारीत) अधिनियमाचे कक्षेत येत असल्याचे त्यांनी सांगितले. तथापी सेवा-सुविधा उत्पन्नाचे साधन नसुन भक्ताचे सोईसाठी असल्याचे प्रशासनाने त्यांना निर्दशनास आणुन दिले आहे.

तसेच महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर (VAT) अधिनियम,२००२ ची अमंलबजावणी ०१ एप्रिल,२००५ पासुन करण्यात आलेली असुन या कायदयामध्ये ट्रस्टचाही समावेश करण्यात आलेला आहे. याबाबत श्री साईबाबा संस्थानला या कायदयातुन सुट मिळावी म्हणून मा.आयुक्त विक्रीकर, मुंबई यांचकडे डी.डी.क्यु (Determination of Disputed Question/ ॲडव्हान्स रुलींग दाखल करण्यासाठी तत्कालीन मा.विश्वस्त मंडळाचे मान्यतेने ॲडव्होकेट पी.सी.जोशी, हायकोर्ट मुंबई यांची नेमणुक करण्यात आलेली असुन त्यांनी दि.२० एप्रिल, २००९ रोजी डी.डी.क्यु दाखल केलेला आहे. यापुर्वी विक्री करातुन प्रसाद भोजनास विक्रीतुन सवलत मिळणेकामी ॲडव्होकेट जोशी यांची नेमणुक केलेली होती. त्यानूसार सन १९९१-९२ पासुन विक्रीकरात सवलत मिळालेली आहे.

तथापी संस्थानला जर पुर्वलक्षी प्रभावाने सेवाकर लागु झाल्यास सेवाकराची रक्कम व त्यावरील दंडाची रक्कम भरावी लागेल. तरी याबाबत सेवाकराचे बाबतीत त्या क्षेत्रातील तंज्ञाचे मार्गदर्शन तथा सल्लागार म्हणून नेमणुक करावी लागेल. त्यांचे मार्गदर्शनानूसार मा.आयुक्त, सेंट्रल एक्साईज ॲण्ड कस्टम्स्, सर्व्हिस टॅक्स, औरंगाबाद यांचे समक्ष संस्थानची प्रभावी बाजु मांडता येईल.

उपरोक्त विवेचनाप्रमाणे अनुभवी असे सेवाकर सल्लागार योग्य ते उचित मानधन देवुन नेमणुक करणेस मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेत निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.८४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ सेंट्रल एक्साईज ॲण्ड कस्टम्स, सर्व्हिस टॅक्स औरंगाबाद यांनी निर्धारीत केलेल्या सेवाकर (Service Tax) रकमेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** दिनांक १०-११ सप्टेंबर, २०१३ रोजी मा.आयुक्त, सेंट्रल एक्साईज ॲण्ड कस्टम्स्, सर्व्हिस टॅक्स, औरंगाबाद यांचे कार्यालयाचे श्री. ए.जी.साबळे अधिक्षक, त्यांचे पथकासोबत साईबाबा संस्थानला सेवाकराचे पडताळणी करीता भेट दिली होती. त्यावेळेस त्यांनी संस्थान मार्फत दिल्या जाणां-या सेवा व त्यापोटी संस्थानला विविध मार्गाने मिळणारे मक्ताशुल्क (Royalty), वाहनतळ, दुकानगाळे,एटीएम जागाभाडे, तसेच ज्या निवासस्थानाना रुपये १०००/- मात्र किंवा त्यापेक्षा जास्त आकारा पासुन मिळालेले

उत्पन्न, दर्शन आरती पासुन मिळालेले उत्पन्न, विदेशातील संस्थाना दिलेली रक्कम, संस्थानचे कंत्राटदार आदीचे सन २००८-०९ ते २०१२-१३ अखेरचे दस्तऐवज पडताळणी कामी घेऊन गेलेले होते. तसेच याव्यतिरीक्त संस्थान व कंत्राटदारामध्ये झालेल्या विविध कराराच्या प्रती व इतर कागदपत्र त्यांनी पडताळणी व तपासणीसाठी समक्ष घेऊन गेलेले होते.

**(ब)** आता, NO VGN (30)/05/SIV-I I I /Shirdi/2012-13/159 dt11/10/2013 रोजीचे पत्रान्वये त्यांनी खालील प्रमाणे कळविले आहे.

१. आपणांमार्फत दिनांक ११ सप्टेंबर, २०१३ रोजी नोंदविण्यात आलेल्या जबाबानुसार,सेवा कराचे अदायगी बाबत मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने प्राधान्याने कार्यवाही करणेत येत आहे, असे आपण म्हटले आहे तथापि, अदयाप पावेतो सेवा कराची अदायगी इकडील कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

२. संस्थानला त्या त्या वर्षी मिळालेली रक्कम व त्यावर त्या त्या कालावधीतील प्रचलित सेवाकराचे दरानूसार सेवाकराची आकारणी अंदाजे ४.१५ कोटी पेक्षा जास्त येत असुन सेवाकराची नोंदणी करुन रक्कमेचा भरणा करण्यात यावा. (सोबत तक्ता माहीतीसाठी जोडला आहे.)

३. दिनांक ०१ मे, २०११ पासुन खोलीभाडे रुपये १०००/- मात्र किंवा त्यापेक्षा जास्त आकारणी केली असल्यास,त्यापासुन मिळालेल्या उत्पन्नाचे विवरण लवकरात लवकर कळवावे.

४. दिनांक ०१ जुलै,२०१२ पासुन/ त्यापुढील कालावधीत धर्मादाय बाबीवर (Charitable activities) केलेल्या खर्चाचे विवरण कळवावे.

५. उपरोक्त मागितलेली माहीती कळवावी तसेच कर निर्धारीत सेवांचे नोंदणीकरण करुन घेऊन सोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे/ त्यात नमुद केलेप्रमाणे सेवाकराचा भरणा करावा.

संबंधिताना काही माहीती आपल्यास कळवावी लागणार आहे. तसेच सेवाकरांचे नोंदणीकरण करावे लागणार आहे.

**(क)** उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे, सेवाकराचे रक्कमेत वाढ होण्याची शक्यता आहे. संबंधित कार्यालयाने सेवा आकाराची आकारणी करताना पुर्वलक्षी प्रभावाने केलेली दिसत आहे.

तरी याबाबत सेवाकराचे क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन तथा सल्लागार यांचे मार्गदर्शनानूसार पुढील कार्यवाही करावी लागणार आहे. त्यामुळे याकामी सल्लागार तथा सुट सेवेतील तज्ञांचे मार्गदर्शनानुसार वरील रक्कम भरणा करणे, नोंदणीकरण करणे याबाबत धोरण निश्चित करणेकामी मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेत निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.८४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषयाचे चर्चेचे वेळी उपस्थित असलेले संस्थानचे अधिकृत आयकर सल्लागार श्री.शंकर आंदानी, अहमदनगर यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थानमार्फत पुढील पत्रव्यवहार करुन आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ आयकर कायद्यातील तरतुदीन्वये दि.३१.०३.२०१३ अखेर शिल्लक असलेल्या अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीस सर्व माध्यमांव्दारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३)(सी)(v) अन्वये करमुक्त आहे. सन २००२ मधील सुधारित तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५ % उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते शक्य न झाल्यास ८५ % उत्पन्नापैकी अखर्चित राहिलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल. पुढील ५ वर्षाच्या मुदतीत ही अखर्चित रक्कम पूर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या आर्थिक वर्षात ती करपात्र म्हणुन हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर लागु असलेल्या जास्तीत जास्त दराने आयकर आकारणी केली जाईल.

आयकर कार्यालयाकडे दाखल करण्यात आलेल्या रिटर्न नुसार दि.३१ मार्च, २०१३ अखेर अखर्चित उत्पन्न खालीलप्रमाणे शिल्लक आहे.

| अ.क्र | आर्थिक वर्ष | शिल्लक अखर्चित रक्कम (रुपये ) | खर्च करावयाची अंतिम मुदत |
|---|---|---|---|
| १ | २००८-०९ | ११,७०,९५,३७७/- | ३१.०३.२०१४ |
| २ | २००९-१० | १०८,४०,२६,३९८/- | ३१.०३.२०१५ |
| ३ | २०१०-११ | १२३,२४,६०,५८३/- | ३१.०३.२०१६ |
| ४ | २०११-१२ | १३४,१५,२९,५३०/- | ३१.०३.२०१७ |
| ५ | २०१२-१३ | १८३,२६,८४,५५६/- | ३१.०३.२०१८ |
| | **एकूण-** | **५६०,७७,९६,४४४/-** | |

कोणत्याही वर्षात एकूण उत्पन्नाच्या पूर्ण ८५% खर्च न झाल्यामुळे अखर्चित उत्पन्नाचा आकडा दरवर्षी वाढत गेलेला असुन दि.३१.३.२०१३ रोजी एकुण अखर्चित उत्पन्न रु.५६०.७७ कोटीवर पोहोचले आहे. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातही अखर्चित उत्पन्न साधारणपणे रु.१९० कोटी पर्यंत असेल, म्हणजे एकुण अखर्चित उत्पन्न रु.७५०.७७ कोटी एवढे होऊन ते टप्प्या-टप्प्याने खर्च करावयाची मर्यादा दिनांक ३१.३.२०१९ पर्यंत आहे. म्हणजे यापुढील सन २०१३-१४ ते २०१७-१८ या पाच वर्षात रु.५६०.७८ कोटी खर्च होणे अपेक्षित आहे.

उपरोक्त नमुद अखर्चित उत्पन्न रु.५६०.७८ कोटी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाअखेर खर्च करणेबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. अन्यथा अखर्चित उत्पन्नावर त्या-त्या वर्षासाठी जास्तीत जास्त असलेल्या दराने आयकर भरावा लागेल.

तरी प्रत्येक वर्षात वाढणाऱ्या उत्पन्नाच्या प्रमाणात खर्चातही त्याप्रमाणात वाढ होणे आवश्यक असुन वर नमुद केल्याप्रमाणे करावयाचे खर्चाबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी सादर.

**निर्णय क्र.८४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर कायद्यातील तरतुदीन्वये दि.३१.०३.२०१३ अखेर शिल्लक असलेल्या अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत संस्थानचे विविध विभागांमार्फत खर्चाबाबतचे धोरण ठरविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ बांधकाम / पाणी पुरवठा / बगीचा / विद्युत विभागप्रमुख/ वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील C.R.U.-०१ चा सेंट्रल ए.सी.प्लांट दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटल मधील ह्दय शस्त्रक्रीया केलेल्या रुग्णांसाठी कार्डीयाक रिकव्हरी युनिट क्र.०१ (CRU-१) कार्यरत आहेत. सदर ठिकाणाचा एरिया बंदिस्त असून सेंट्रल ए.सी.प्लांटव्दारे तापमान नियंत्रित ठेवले जाते. श्री साईबाबा हॉस्पीटल विभागाने सदर ए.सी.प्लांट बंद पडल्याचे कळविले होते. आणि सदर यंत्रणा जास्त वेळ बंद राहिल्यास ह्दय शस्त्रक्रिया केलेल्या रुग्णांना इनफेक्शन व इतर गंभीर परिणाम होण्याची शक्यता कळविली होती. त्यामुळे अतिशय तातडीने सदर ए.सी.यंत्रणा दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार सदर यंत्रणा चेक केली असता यंत्रणेच्या AHU चा ब्लोअर खराब झाल्याचे निदर्शनास आले. तसेच कंडेसिंग युनिटचे स्पेअर व ब्लेड बदलणेसह गॅस चार्जिंग करणे आवश्यक होते. याकारणाने सदर यंत्रणा पुर्णपणे बंद पडलेली होती. लागणारे स्पेअर व अनुषंगिक मटेरीअल ज्या त्या साईजमध्ये तसेच गॅस आपणाकडे उपलब्ध नसल्याने व सदर यंत्रणा लवकरात लवकर चालू करणे गरजेचे असल्याने दुरुस्तीचे काम बाहेरील फर्म कडून तातडीने करुन घेणे गरजेचे होते.

त्यानुसार सदर यंत्रणा दुरुस्तीकामी बाहेरील फर्मचे कोटेशन तातडीने बोलावून प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :-

| अ. क्र. | तपशील | मे.ओंकार इंजि. वर्क्स प्रा.लि., पुणे. | मे.कॉलीटायर ए.सी. ॲण्ड रेफ्री, इंजि.पुणे. | श्री साई डिझेल्स, तळेगांव, पुणे. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री साईबाबा हॉस्पीटल मधील C.R.U.-१ चा सेंट्रल ए.सी. प्लांट दुरुस्ती | रु. ०,९९,०५५.०० | रु. १,१२,०९४.०० | रु. १,२८,६७०.०० |
| | + १२.५ % वॅट(मटेरीअल वर) :- | रु. ०,०८,९०९.०० | रु. ०,०९,५१७.०० | रु. ०,१२,१३४.०० |
| | + १२.३६% सर्व्हिस टॅक्स | रु. ०,०३,४३४.०० | रु. ०,०४,४४५.०० | रु. ०,०३,९०६.०० |
| | एकुण रक्कम :- | रु. १,११,३९८.०० | रु. १,२६,०५६.०० | रु. १,४४,७१०.०० |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलमधील C.R.U.-१ चा सेंट्रल ए.सी.प्लांट दुरुस्ती करणेकामी वरील तक्त्याप्रमाणे मे.ओंकार इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि.,पुणे यांचे दर कमी असल्याने त्यांचेकडून तातडीने सदरचे काम करुन घेऊन सदर यंत्रणा कार्यान्वित करुन घेण्यात आली. आता त्यांनी केलेल्या कामाचे सोबत बील क्र.एसपी/ ओईडब्ल्युपीएल/२८६ दि.२१-०९-२०१३ अन्वये रक्कम रु.१,१०,१००/- सादर केलेले आहे. मे.ओंकार इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि.,पुणे यांना बीलाची रक्कम आदा करावी लागणार आहे.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**तसेच, मे.ओंकार इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि.,पुणे यांच्या बीलाची रक्कम रु.१,१०,१००/- मात्र आदा करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **कार्यकारी अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार भत्ता व इतर सुविधा निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी चे कार्यकारी अधिकारी या पदावर श्री.किशोर रामराव मोरे, जिल्हाधिकारी (विशेष कार्यअधिकारी) पुणे महानगर पालीका पुणे यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात आलेली होती. त्यांनतर त्यांना वेळेवेळी सदर प्रतिनियुक्तीचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यांना देण्यात आलेली मुदतवाढ दि.३१/०७/२०१३ अखेर संपुष्ठात आल्यानंतर 'कार्यकारी अधिकारी' श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी या पदाच्या कार्यभारबाबत महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.सासंवि-२०१३/६/प्र.क्र.३/२०१३/का.सोळा मंत्रालय मुंबई-३२ दि. २६ सप्टेंबर २०१३ खालील प्रमाणे झाला आहे.

श्री. किशोर रामराव मोरे, कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ता.राहाता जिल्हा-अहमदनगर यांना सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यात येत असून त्यांच्या सेवा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करण्यात येत आहेत. तसेच श्री. मोरे यांना कार्यमुक्त केल्यामुळे रिक्त झालेल्या कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेशापर्यंत उपविभागीय अधिकारी, शिर्डी जिल्हा.अहमदनगर यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीच्या कार्यकारी अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने पूर्णवेळ झालेल्या अधिकारी यांना श्री साईबाबा संस्थान मार्फत खालील प्रमाणे सोयी-सुविधा पुरविल्या जातात.

०१. शासनाकडून संस्थान कडे प्रतिनियुक्तीने हजर होतांना मिळणारे वेतन व भत्ते आणि इतर खर्च तसेच प्रतिनियुक्ती भत्ता

०२. संस्थान कर्मचा-या प्रमाणे दिपावली सानुग्रह अनुदान (माहे ऑक्टोबर ते माहे सप्टेबर अखेर या कालावधीत मिळालेले पगाराची रक्कम - १२ इतकी रक्कम )

०३. फर्निचर सह निवासव्यवस्था, विद्युत आकार.

०४. संस्थान कर्मचा-यांना संस्थान रुग्णालयामार्फत पुरविण्यात येणा-या वैद्यकिय सुविधा व वैद्यकिय बिले व व पाल्याचा शैक्षणिक फी परवातावा.

०५. संस्थान कामकाजाकरीता लॅन्डलाईल फोन, मोबाईल, इन्टरनेट सुविधा, आयपॅड इ. व त्यांचे येणारे बिल.

०६. संस्थान कामकाजाकरीता संस्थानचे वाहन (चालकासह )

उपरोक्त शासन निर्णयानुसार श्री. अजय सुभाष मोरे, उपविभागीय अधिकारी शिर्डी उपविभाग शिडी यांनी दि.२७/०९/२०१३ पासून कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी या पदाचा **अतिरिक्त कार्यभार** स्वीकारलेला आहे.

महाराष्ट्र शासन वित्तविभाग शुध्दीपत्रक क्रमांक :वेतन-१३११/प्र.क्र.१७/सेवा -३ मंत्रालय मुंबई - ३२ दि.२८ऑगष्ट २०१३ मध्ये दोन किंवा अधिक पदांवरील नियुक्तीच्या कालावधीतील अतिरिक्त वेतन/ विशेष वेतनाच्या दरात सुधारणा करणेबाबत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ च्या नियम ५६ नुसार शासकिय कर्मचा-याकडे स्वतःच्या पदाव्यतिरिक्त दुस-या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविल्यास, अशा दुस-या पदाकरीता यापुढे त्या पदाच्या संभाव्य वेतनाच्या ५ टक्के दराने, परंतु दरमहा रु.१५००/- एवढया कमाल मर्यादेपर्यंत, अतिरिक्त वेतन/विशेष वेतन अनुज्ञेय राहील अशी तरतूद आहे त्या ऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ च्या नियम ५६ नुसार, शासकिय कर्मचा-याकडे स्वतच्या पदाव्यतिरिक्त दुस-या पदाकरीता यापुढे त्या मूळ वेतनाच्या (पे बँड मधील वेतन अधिक ग्रेड पे) ५ टक्के एवढया दराने अतिरिक्त वेतन/विशेष अनुज्ञेय राहील.

शासन निर्णयानुसार श्री. अजय मोरे, उपविभागीय अधिकारी शिर्डी उपविभाग यांचेकडे कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी या पदाचा अतिरिक्त कार्यभार असे पावेतो खालील प्रमाणे सोयी सुविधा देता येतील.

०१. शासन निर्णयानुसार अतिरिक्त कार्यभार भत्ता

०२. दिपावली सानुग्रह अनुदान (माहे ऑक्टोबर ते माहे सप्टेबर अखेर या कालावधीत संस्थान कडून मिळालेले पगाराची एकूण रक्कम- १२ इतकी रक्कम )

तसेच वरीलप्रमाणे अ.नं. ०३ ते ०६ वर नमूद केलेप्रमाणे.

तरी श्री. अजय मोरे, उपविभागीय अधिकारी शिर्डी उपविभाग यांचेकडे कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी या पदाचा अतिरिक्त कार्यभार असेपावेतो वरील प्रमाणे सोयी सुविधा पुरविणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **उपकार्यकारी अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार भत्ता व इतर सुविधा निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी चे उपकार्यकारी अधिकारी या पदावर डॉ. यशवंतराव माने तहसीलदार राहाता ता.राहाता जिल्हा-अहमदनगर यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात आलेली होती. त्यांनतर त्यांना वेळेवेळी सदर प्रतिनियुक्तीचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यांना देण्यात आलेली मुदतवाढ दि.१८/०९/२०१३ अखेर संपुष्ठात आल्यानंतर 'उपकार्यकारी अधिकारी' श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी या पदाच्या कार्यभारबाबत महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.सासंवि-२०१३/६/प्र.क्र.६१/२०१३/का.सोळा मंत्रालय मुंबई-३२ दि. २६ सप्टेंबर २०१३ खालील प्रमाणे झाला आहे.

डॉ. यशवंतराव माने, उपकार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी ता.राहाता जिल्हा-अहमदनगर यांना सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यात येत असून त्यांच्या सेवा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करण्यात येत आहेत. तसेच श्री. माने यांना कार्यमुक्त केल्यामुळे रिक्त झालेल्या उपकार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेशापर्यंत तहसीलदार राहाता, ता.राहाता जिल्हा-अहमदनगर यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीच्या उपकार्यकारी अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने पूर्णवेळ नेमणूक झालेल्या अधिकारी यांना श्री साईबाबा संस्थान मार्फत खालील प्रमाणे सोयी-सुविधा पुरविल्या जातात.

०१. शासनाकडून संस्थान कडे प्रतिनियुक्तीने हजर होतांना मिळणारे वेतन व भत्ते आणि इतर खर्च तसेच प्रतिनियुक्ती भत्ता

०२. संस्थान कर्मचा-या प्रमाणे दिपावली सानुग्रह अनुदान (माहे ऑक्टोबर ते माहे सप्टेबर अखेर या कालावधीत मिळालेले पगाराची रक्कम - १२ इतकी रक्कम )

०३. फर्निचर सह निवासव्यवस्था, विद्युत आकार.

०४. संस्थान कर्मचा-यांना संस्थान रुग्णालयामार्फत पुरविण्यात येणा-या वैद्यकिय सुविधा व वैद्यकिय बिले, व पाल्याचा शैक्षणिक फी परवातावा.

०५. संस्थान कामकाजाकरीता लॅन्डलाईल फोन, मोबाईल, इन्टरनेट सुविधा, आयपॅड इ. व त्यांचे येणारे बिल.

०६. संस्थान कामकाजाकरीता संस्थानचे वाहन (चालकासह )

उपरोक्त शासन निर्णयानुसार श्री. आप्पासाहेब शिंदे तहसीलदार राहाता ता.राहाता जिल्हा-अहमदनगर यांनी दि.२७/०९/२०१३ पासून उपकार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या पदाचा **अतिरिक्त कार्यभार** स्वीकारलेला आहे.

महाराष्ट्र शासन वित्तविभाग शुध्दीपत्रक क्रमांक :वेतन-१३११/प्र.क्र.१७/सेवा -३ मंत्रालय मुंबई - ३२ दि.२८ऑगष्ट २०१३ मध्ये दोन किंवा अधिक पदांवरील नियुक्तीच्या कालावधीतील अतिरिक्त वेतन/विशेष वेतनाच्या दरात सुधारणा करणेबाबत खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ च्या नियम ५६ नुसार शासकिय कर्मचा-याकडे स्वतःच्या पदाव्यतिरिक्त दुस-या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविल्यास, अशा दुस-या पदाकरीता यापुढे त्या पदाच्या संभाव्य वेतनाच्या ५ टक्के दराने, परंतु दरमहा रु.१५००/- एवढया कमाल मर्यादेपर्यंत, अतिरिक्त वेतन/विशेष वेतन अनुज्ञेय राहील अशी तरतूद आहे **त्या ऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१ च्या नियम ५६ नुसार, शासकिय कर्मचा-याकडे स्वतच्या पदाव्यतिरिक्त दुस-या पदाकरीता यापुढे त्या मूळ वेतनाच्या (पे बँड मधील वेतन अधिक ग्रेड पे ) ५ टक्के एवढया दराने अतिरिक्त वेतन/विशेष अनुज्ञेय राहील.**

शासन निर्णयानुसार श्री. आप्पासाहेब शिंदे, तहसीलदार राहाता ता. राहाता जिल्हा-अहमदनगर यांचेकडे उपकार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी या पदाचा अतिरिक्त कार्यभार असे पावेतो खालील प्रमाणे सोयी सुविधा देता येतील.

०१. शासन निर्णयानुसार अतिरिक्त कार्यभार भत्ता

०२. दिपावली सानुग्रह अनुदान (माहे ऑक्टोबर ते माहे सप्टेबर अखेर या कालावधीत संस्थान कडून मिळालेले पगाराची एकूण रक्कम - १२ इतकी रक्कम )

तसेच वरीलप्रमाणे अ.नं. ०३ ते ०६ वर नमूद केलेप्रमाणे.

तरी श्री. आप्पासाहेब शिंदे, तहसीलदार राहाता ता.राहाता जिल्हा.अहमदनगर यांचेकडे उपकार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी या पदाचा अतिरिक्त कार्यभार असल्याने वरील प्रमाणे सोयी सुविधा पुरविणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८ २९.११.२०१३ ते २८.११.२०१४ अखेर व्दारावती इमारतीतील टिव्हींच्या टाटास्काय कनेक्शनची फी भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती इमारतीत असलेल्या ८० व्हीआयपी रूममध्ये उतरलेल्या साईभक्तांना टीव्हीवर बातम्या व इतर चॅनेल पाहता यावे यासाठी दि.०४/०७/२०१० रोजी झालेल्या मा.व्य.समीतीच्या सभेत निर्णय क्र. ५८१ नुसार ८० टाटा स्काय कनेक्शन घेण्यात आले आहे. त्याची वार्षिक रिचार्ज फि दि.२८/११/२०१३ रोजी संपत असल्याने पुढील वर्षाकरीता दि.२९/११/२०१३ ते २८/११/२०१४ पर्यंत ८० रूमचे ८० कनेक्शन रिचार्ज करावयाचे आहेत. सध्या टाटा स्काय कंपनीतर्फे धमाल मिक्स पॅक हे प्रती कनेक्शनला २२०/- रूपये दर महिन्यास फी असलेले पॅकेज आहे. यामध्ये Regular pack मध्ये ७१ चॅनेल व Regional Telugu Pack मध्ये १२ असे एकुण ८३ चॅनेल दिसतात.

याशिवाय एका वर्षासाठी मुख्य कनेक्शनला १० महिन्याची व उप कनेक्शनला ११ महिन्यांची फी भरण्याची सवलत असून एकुण कनेक्शन पैकी प्रत्येकी ०४ कनेक्शनचे एक ग्रुप केल्यास एक कनेक्शनसाठी दरमहा रू.२२०/- व उर्वरीत तीन कनेक्शनला दरमहा रू. १८०/- भरण्याची कंपनीची सवलत आहे. ८० रूम चे २० ग्रुपचे २० मुख्यकनेक्शन ६० उपकनेक्शन होतात. त्याप्रमाणे ०१ वर्षाची फी रु. १,६२,८००/- होत आहे.

टाटास्कायचे अधिकृत डिस्ट्रीब्युटर श्री रूपचंद भागचंद कासलीवाल,श्रीरामपुर यांनी ०१ वर्षाकरीता ८० रुमच्या फी कनेक्शन करीता रूपये १,६२,८००/- चे कोटेशन दिले आहे.

तरी वरील कोटेशन प्रमाणे टाटास्कायचे अधिकृत डिस्ट्रीब्युटर श्री रूपचंद भागचंद कासलीवाल, श्रीरामपुर यांचेकडून रिचार्ज करण्याकरीता ऑर्डर देणेस व येणाऱ्या रक्कम रूपये १,६२,८००/- (अक्षरी रूपये एक लाख बासष्ट हजार आठशे मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९ श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१३ अंदाजपत्रकातील सर्व बाबींवर कमी झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१३ मधील खर्चाकरीता मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२१/०६/२०१३ च्या सभेतील निर्णय क्र.५१३ अन्वये एकुण रुपये ३६,८३,६८१/-( अक्षरी रक्कम रुपये छत्तीस लाख त्र्यांऐंशी हजार सहाशे एक्यांऐंशी ) चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. प्रत्येक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षा सर्व बाबींबर कमी खर्च झालेला आहे. त्याचा अहवाल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशिल | मान्य केलेली अंदाजपत्रकीय रक्कम | प्रत्यक्षात झालेला खर्च | तरतुदी पेक्षा कमी झालेला खर्च | तरतुदी पेक्षा जादा झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडप, कमानी, स्टेज व इतर | १०,८५,०००-०० | ४,१९,६६५-०० | ६६५३३५-०० | ०० |
| २ | कलाकार बिदागी -(कीर्तनकार व निमंत्रीत कलाकार, कलाकार हजेरी कार्यक्रमासह) | १,५०,०००-०० | १४,४६०-०० | १३५५४०-०० | ०० |
| ३ | मिष्टान्न खर्च (श्रम परिहार मजुरीसह ) | ६,९३,६८१-०० | ४,४३,५४६-० | २५०१३५-०० | ०० |
| ४ | विद्युत रोषणाई, जनसेट भाडे, इंधन खर्च इ. | १,३०,०००-०० | ७६,१४०-०० | ५३८६०-०० | ०० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदी-प्रसादासह १ लाख ५५ हजार तहहयात, आश्रयदाते विदेशी भक्तांसह | १३,००,०००-०० | ११,३८,७२२-०० | १६१२७८-०० | ०० |
| ६ | जादा कंत्राटी कर्मचारी स्वयंसेवक(विद्यार्थी) मानधन | २,००,०००-०० | १,७४,०४८-०० | २५९५२-०० | ०० |
| ७ | इतर खर्च-मंदिर रंगकाम मंदिर प्रसाद, प्रसादालय फर्निचरभाडे, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, फोटोग्राफी,पेंटर बीले | १,००,०००-०० | ४७,०३४-०० | ५२९६६-०० | ०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | पालख्याचे ठिकाणी पिण्याचे पाण्याची व्यवस्था खर्च- टँकर व डिझेल सह. | २५,०००-०० | १९,९२४-०० | ५०७६-०० | ०० |
| ९ | उत्सवात येणारे भक्तांसाठी रांगेत वाटण्यात येणा-या पाऊचचा खर्च. | ०० | ०० | ०० | ०० |
| १० | मंदिर व मंदिर परीसर फुलांचे डेकोरेशन | ०० | ०० | ०० | ०० |
| ११ | प्रथमोपचार केंद्राकरीता तातडीचे औषध खरेदी | ०० | ०० | ०० | ०० |
| | **एकूण-** | **३६,८३,६८१-००** | **२३,३३,५३९-००** | **१३५०१४२ -००** | **००** |

उपरोक्त तपशील पाहता श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१३ करीता एकुण रुपये ३६,८३,६८१/-( अक्षरी रक्कम रुपये छत्तीस लाख त्र्याऐंशी हजार सहाशे एक्यांऐशी) अंदाजपत्रक तरतुद करण्यात आलेली होती. या उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकुण रुपये २३,३३,५३९ /- (अक्षरी रुपये तेवीस लाख तेहतीस हजार पाचशे एकोणचाळीस मात्र) खर्च झालेला आहे. तरी सदरचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात येऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१३ साठी प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१० कै. शंकर नाथा गोंदकर यांनी संस्थानला देणगीदाखल दिलेल्या सिटी सर्व्हे नं.२० मधिल जागेत मंदिर विभागातील पुजाऱ्यांसाठी संडास, बाथरुम व वॉश बेसिनची सुविधा करणेबाबत**

**प्रस्ताव-** मा. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश तथा मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.२८/०८/२०१३ रोजी मंदिर परिसराची पहाणी केली. सदर पहाणीदरम्यान मा. अध्यक्ष सो. यांनी दिलेले निर्देश सामान्य प्रशासन, कार्यासन ५ यांनी दि.३१/०८/२०१३ रोजीचे टिपणीव्दारे कळविले आहेत. त्यातिल क्र.५ अन्वये मा. अध्यक्ष सो यांनी "श्री.शंकरनाथा गोंदकर यांनी देणगी दिलेले सिटीर्व्हे नं.२० मध्ये पुजाऱ्यांसाठी संडास बांथरुम बांधण्यात यावे. तुर्त बांधकाम होईपर्यत सध्या असलेल्या जागेत भांडे बसवून दयावेत." असे निर्देश दिलेले आहेत.

श्रींचे समाधी चौथऱ्यावर पुजारी सोवळे व चोपदार गणवेष घालून काम करतात. सदर कर्मचाऱ्यांसाठी पुर्वीचे ध्यान मंदिर व सध्याचे संरक्षण विभागाचे कंट्रोल रुमचे ठिकाणी संडास / बाथरुमची व्यवस्था केलेली आहे. सदरचे ठिकाणी एकच संडास असल्यामुळे एका वेळी फक्त एकच कर्मचारी जाऊ शकतो. तसेच सदर ठिकाण मंदिर कर्मचाऱ्याव्यतिरिक्त कंट्रोल रुमचे कर्मचारीही वापर करतात. त्यामुळे मंदिर कर्मचाऱ्यांना जास्त वेळ त्याठिकाणी थांबून रहावे लागते. दि.०६/०७/२०१३ रोजीचे पत्रान्वये मंदिर विभागप्रमुख यांनी मंदिर विभागाकडील कर्मचाऱ्याकरीता संस्थानला कै.शंकर नाथा गोंदकर यांचेकडून देणगी मिळालेल्या सि.स.नं.२० मधिल जागेत दोन संडास, एक युरीनल व एक बाथरुम तातडीने बांधून मिळावे तसेच पुजारी व चोपदार यांचेकरीता सदरहू जागेत कायमस्वरुपी दोन मजल्यांची स्वतंत्र बिल्डींगचे बांधकाम करुन मिळणेबाबत विनंती केली आहे.

सदर ठिकाणी कायमस्वरुपी बहुमजली बांधकाम करावयाचे झाल्यास त्यासाठी विद्यमान विकास नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय होणारे बांधकाम करावे लागेल. सध्या सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात दोन संडास, एक बाथरुम व वॉश बेसिनची व्यवस्था करता येईल. त्यासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु.१.२५ लक्ष मात्र इतका खर्च येईल. तरी वरीलप्रमाणे कामास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८५० यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला देणगी मिळालेल्या सिटी सर्व्हे नं.२० मधिल जागेत मंदिर विभागातील पुजाऱ्यांसाठी संडास, बाथरुम व वॉश बेसिनची सुविधा करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१.२५ लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११ संस्थान वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता वाढीव साठवण तलाव तयार करणे, नविन स्वयंचलीत जलशुध्दीकरण केंद्र उभारणे, ओव्हर हेड टँक (ESR) जलवाहिन्या टाकणे इ. कामांबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे साठवण तलाव व जलशुध्दीकरण केंद्र मौजे कनकुरी ग्रामपंचायत हद्दीमध्ये आहे. साठवण तलाव व जलशुध्दीकरण केंद्र इ.ची कामे १९९२ साली पुर्ण करण्यात आलेली आहेत. सदरहु योजना ही मौजे कनकुरी, मौजे पिंपळवाडी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची संयुक्त योजना आहे. सदरहु योजनेव्दारे मंदिर परिसर, संस्थान भक्तनिवासस्थाने, स्टाफ क्वॉर्टर्स, श्री साईप्रसादालय, मौजे कनकुरी, मौजे पिंपळवाडी येथे शुध्दीकरण केलेल्या पाण्याचा पुरवठा केला जातो.

**पाणी पुरवठा योजनेचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे-**

| अ.नं. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| ०१ | पाणी पुरवठा योजना कधीपासून कार्यान्वित करणेत आली. | सन १९९२ |
| ०२ | महिन्याला इरिगेशन विभागाकडुन घेण्यात येणारे सरासरी पाणी. | १२,५९,१०,३३३ लिटर्स. |
| ०३ | साठवण तलावाची क्षमता. | ३३२ एम.एल. |
| ०४ | साठवण क्षमता किती दिवस पुरते. (सर्वसाधारण गर्दीचे काळात) | ४० ते ४५ दिवस. |
| ०५ | साठवण तलावात उन्हाळयात अथवा गर्दीच्या काळात किती दिवस पाणी पुरते. | ३० ते ३५ दिवस. |
| ०६ | २४ तासात अंदाजे सरासरी किती दिवस पाणी पुरवठा करण्यात येतो. | ३८ ते ४० लाख लिटर्स. |

कनकुरी साठवण तलाव येथे संस्थानचे तीन साठवण तलाव आहेत. सदरहु तलावांची एकुण क्षमता ही ३३२ एम.एल. इतकी आहे. सर्वसाधारण गर्दीचे काळात व पावसाळा तसेच हिवाळयात सदरहु साठवण तालावातील पाणी हे साधारणतः ४० ते ४५ दिवस पुरते. गर्दीचे काळात, उत्सव कालावधीत व उन्हाळयामध्ये साठवण तलावातील पाणी हे ३० ते ३५ दिवस पुरते. संस्थान साठवण तलावाचे लगतचे स्थानिक शेतकऱ्यांचे विहीरी व बोअरवेलची संख्या मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे साठवण तलावातील पाण्याचे गळतीचे प्रमाणही मोठया प्रमाणात वाढलेले आहे.

संस्थानचा दैनंदिन पाणी वापर मोठया प्रमाणावर वाढलेला आहे. मात्र फिल्टर प्लँट क्षमता पुर्वीचीच असल्याने शुध्द केलेल्या पाण्याचा पुरवठा कमी पडत आहे. आजची व भविष्यातील वाढीव पाण्याची गरज लक्षात घेता नविन वाढीव फिल्टर प्लँटची आवश्यकता निर्माण झालेली आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे मार्गदर्शन मागितले असता, त्यांचे प्रतिनिधींनी प्रत्यक्ष पाहणी करून त्यानुसार सन २००७-२००८ मध्ये स्केलेटन प्रोजेक्ट तयार केला. त्या योजनेचे अंदाजे रु. ३,२६,५६,१८७/- मात्रचे इस्टिमेट दिलेले होते. त्याप्रमाणे सदरचे खर्चावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मागणी केलेली २% रक्कम रु. ६,५३,१२२/- मात्रची रक्कम त्यांचेकडे भरणा करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०७.२००७ रोजी झालेल्या सभेतील आयत्या वेळचा विषय नं. ३२, निर्णय क्रमांक ६२७ नुसार मान्यता घेण्यात येवून रु. ६,५३,१२२/- मात्रची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे भरणा करण्यात आली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सर्व्हेनुसार व त्यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि. १६.०३.२००८ चे सभेतील निर्णय क्रं.२५२ नुसार एकुण रु.७,४८,६५,५४०/- मात्रचे खर्चास तत्वतःमान्यता घेण्यात आलेली होती. त्यानुसार संस्थानमार्फत कंन्सलटंटची नियुक्ती करुन काम करणेसाठी प्रस्ताव मागविण्यात आले. त्यानुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबत दि. ०३.०१.२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा वाटाघाटी करण्यात येवून सभेतील निर्णय क्रं. १४ अन्वये किर्लोस्कर कंन्सलटंट प्रा.लि. पुणे यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली.

दि. ०६.०३.२०१० रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत किर्लोस्कर कंन्सलटंट यांची सेवा समाप्त करुन इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांची कन्सलटंट म्हणून नेमणून करण्यात यावी, तसेच तसेच उपरोक्त कामांसाठी सर्व निविदा रद्द करुन नव्याने निविदा मागविण्यात याव्या असे ठरले.

दि. ०५.०९.२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत वाढीव क्षमतेच्या स्वयंचलित जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे, ओव्हर हेड टँक उभारणे, जलवाहिन्या टाकणे इ. कामांसाठी येणारे रु. २८.१६ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांना सल्ला सेवा पुरविण्याकरीता प्रकल्पाच्या किमतीचे ३% अधिक सर्व्हिस टॅक्स इतकी फी आदा करण्यात यावी असे ठरले.

त्यानुसार दि.११/१०/२०१० रोजीचे वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे कोऱ्या निविदा विक्री करणेसाठी दि.११/१०/२०१० ते दि.३०/१०/२०१० अखेर कालावधी ठेवण्यात आला होता. सदरहू मूदतीत खालील ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

1. Laxmi Civil Engineering Services Pvt. Ltd; Kolhapur.
2. Pratibha Industries Ltd; Mumbai.
3. IVRCL Infrastructure & Projects Ltd; Pune.
4. Kirloskar Brothers Ltd; Pune.
5. K J Infrastructure Projects (I) Pvt. Ltd; Pune.
6. Megha Engineering & Infrastructure Ltd; Hyderabad.

उपरोक्त निविदाधारकांपैकी खालील ०३ ठेकेदारांनी विहित मुदतीत सिलबंद निविदा सादर केलेल्या होत्या.

| Sr.No. | Name of Contractor |
|---|---|
| 01 | Megha Engineering &Infrastructure Ltd; Hyderabad. |
| 02 | Pratibha Industries Ltd; Mumbai. |
| 03 | Laxmi Civil Engineering Services Pvt. Ltd;Kolhapur. |

तरी उपरोक्त तीन (०३) निविदा सादरकर्त्यांनी सादर केलेल्या सिलबंद निविदा उघडून त्यावर चर्चा तथा वाटाघाटीने निर्णय होणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेपुढे ठेवण्यात आलेल्या होत्या.

यावर सविस्तर चर्चा होवून, संस्थानला वाढीव पाणी पुरवठा होणेसाठी लोकवर्गणीच्या १०% रक्कम भरुन या योजनेसाठी अनुदान मंजुर करुन घेणेसाठी मा. मंत्री महोदय यांची तारीख घेवून, त्यांचे समवेत मा.विश्वस्तांच्या समितीने बैठक लावून चर्चा करावी व अनुदान मंजुर करुन घेणेसाठी प्रयत्न करावे तसेच यापुर्वी संस्थानकरीता थेट दारणा व निळवंडे धरणांतून पाणी आणणेकामी सर्व्हे करण्यात आलेला आहे. त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीस सादर करावा असे ठरले.

त्यानंतर मा.ना.प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांची मा.श्री. जयंतराव ससाने अध्यक्ष व मा.श्री. शंकरराव कोल्हे उपाध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी भेट घेवून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नविन वाढीव पाणीपुरवठा योजना करणेबाबत चर्चा केली. चर्चेत मा.मंत्री महोदय यांनी संबंधीत अधिका-यांना याबाबत सत्वर कार्यवाही करणेबाबत सुचना दिल्या. प्रधान सचिव पाणी पुरवठा यांनी याकामी लगतच्या ग्रामपंचायत व शिर्डी संस्थान यांनी १० % वर्गणीचा ठराव जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडे द्यावा अशा सुचना दिल्या. मा. व्यवस्थापन समितीच्या बैठकीत दि. १३/०२/२०११ रोजी विषय नं.०४ निर्णय क्रं.०४ अन्वये  सदर योजनेवर होणा-या एकुण अंदाजपत्रकीय रकमेच्या १०% इतकी रक्कम लोकवर्गणीचे स्वरुपात शासनाकडे भरणेस मान्यता देण्यात देण्यात आली.

त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत निळवंडे धरण उद्‌भव घेवून पुन्हा नव्याने सर्वेक्षण, अंदाजपत्रक व आराखडे तयार करणेसाठी त्यांना एकुण अंदाजपत्रकीय रकमेच्या २% इतके Preparation Charges भरावे लागणार असल्याने दि. २४.०९.२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रं. ७४५ नुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मागणीनुसार सर्व्हेक्षण करणेसाठी तूर्त सध्या रु. १० लाख मात्र रक्कम आदा करणेस मान्यता देणेत आली. त्यानुसार सदरची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना आदा करण्यात आलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर यांचे  जा.क्रं./ताशां/ २०१/२०१३, दिनांक ०६.०२.२०१३ चे पत्र माहीतीसाठी संस्थान कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदरच्या पत्रात वाढीव शिर्डी संस्थान, कनकुरी, पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजनेची ढोबळ किंमत सन २०११-२०१२ चे दरसुची नुसार रु. २५०६९.११ लक्ष मात्र इतकी नमूद करण्यात आलेली आहे. संस्थानचे नविन वाढीव पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून इकडील कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत.

सन २०१८ मध्ये शताब्धी महोत्सव साजरा करण्यात येणार असल्याने सदर योजनेचे कामांबाबत दिनांक ११/१०/२०१३ रोजी में.इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री आशिष दोषी हे शिर्डी येथे आले असता, मा. कार्यकारी अधिकारी साहेब, वरिष्ठ मुख्य अभियंता, बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे समवेत झालेल्या चर्चेप्रमाणे त्यांनी संस्थानचे वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता वाढीव साठवण तलाव तयार करणे, कनकुरी साठवण तलाव ते ओव्हर हेड टँक (ESR) व पुढे संस्थान परिसर, साईप्रसाद, नविन भक्तनिवासस्थान, साईआश्रम प्रकल्प भाग १ व भाग २ व वाढीव फिल्टर प्लँट इ. कांमासाठी नव्याने सल्ला सेवा पुरविण्याची तयारी दर्शविलेली आहे.

सन २०१० मध्ये वाढीव क्षमतेच्या स्वयंचलित जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे, ओव्हर हेड टँक उभारणे, जलवाहिन्या टाकणे इ. कामांसाठी रु. २८.१६ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. आता चालू डि.एस.आर. दरानुसार सदर अपेक्षित खर्चात वाढ होणार आहे. याबाबत मा. कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात दि. ११/१०/२०१३ रोजी झालेल्या बैठकीत मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. २२१ पै व २४५ मधील संस्थान मालकीचे जमिनीत नवीन आर.सी.सी. साठवण तलावाचे बांधकाम करुन दुस-या टप्प्यात सध्याचे साठवण तलावाचे नूतनीकरण कामाचा समावेश करावा अशी चर्चा झाली आहे. त्यानुसार में. इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. आशिष दोषी यांचेशी चर्चा करुन त्यांना नियोजीत प्रकल्पासाठी अपेक्षित खर्चाचा अंदाज कळविणे बाबत विनंती करण्यात आली. त्यानुसार त्यांनी नविन आर.सी.सी. साठवण तलावाचे बांधकाम करणे, सध्याचे साठवण तलावाचे आर.सी.सी. बांधकाम करुन नुतनीकरण करणे, डब्ल्यू.टी.पी., पंपींग मशिनरी, रायझिंग मेन,

डिस्ट्रीब्यूशन, इ.एस.आर., बॉटलिंग प्लान्ट, एक्सप्रेस. फिडर, इत्यादी कामांचा समावेश असलेल्या नविन वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार एकूण रुपये १३४.२४ कोटी मात्र इतका अपेक्षित खर्च कळविला असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **Description** | **Amount in Rs. Crores** | |
|---|---|---|
| Cost of Tednder floated in Oct 2010 | 28.16 | Crore |
| Increase due to DSR rates | 8.45 | Crore |
| New Balancing Tank (RCC, 300 ML) | 30.30 | Crore |
| Pumping machinery and Rising Main for new balancing tank | 5.00 | Crore |
| Modification of Existing Balancing Tank (Earthen 332 ML to RCC 550 ML) | 48.60 | Crore |
| Express Feeder | 2.50 | Crore |
| Bottling Plant | 1.00 | Crore |
| **Total** | **124.01** | **Crore** |
| Contingencies 5% | 6.20 | Crore |
| Design and PMC 3% | 3.72 | Crore |
| Technical santion 0.25% | 0.31 | Crore |
| **Total Block cost** | **134.24** | **Crore** |

तरी संस्थान करीता वरील प्रमाणे वाढीव पाणी पुरवठा योजना प्रकल्प हाती घेण्यास व त्यासाठी येणारे रुपये १३४.२४ कोटी मात्रचे प्राथमिक ढोबळ अंदाजे खर्चास तत्वत: मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदर प्रकल्पासाठी सविस्तर प्लॅन इस्टीमेंटसह, डि.पी.आर. (Detailed Project Report) तयार करणेसह सर्व समावेशक प्रकल्प व्यवस्थापन सल्लासेवा (Project Management Consultancy Services) पुरविणेसाठी में. इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांची ३% (तीन टक्के) अधिक सर्व्हीस टॅक्स यापूर्वीचेच मंजुर फी व अटी शर्तीवर नेमणूक करणेस मान्यता मिळणेस विनंती.

में. इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. आशिष दोषी हे वरील प्रमाणे नियोजित प्रकल्पाचे सादरीकरण करणेसाठी आजचे सभेपुढे उपस्थित आहेत. तरी त्यांचे सादरीकरण पाहून उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८५१** **आजचे सभेत मे. इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. आशिष दोषी हे उपस्थित होते. त्यांनी उपरोक्त प्रस्तावीत प्रकल्पाचे सभेपुढे सादरीकरण केले .**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी वाढीव पाणीपुरवठा योजना करणेकामी थेट निळवंडे धरणातून पाणी आणण्याचे नियोजन आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरवा करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **स्टीम बॉयलरकरीता गॅस लाईनचे व्हॉल्व खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रास्ताविकः-** श्री साई प्रसादालयात दैनंदिन प्रसाद भोजन तयार करणेकरीता लागणाऱ्या वाफेची निर्मीती थरमॅक्स कंपनीच्या बॉयलरद्वारे केली जाते. त्याकामी थर्मक्स कंपनीचे RXD ८५० व RXG ४०० स्टीम बॉयलर वापरीत आहोत. मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना गेल्या आठ वर्षापासून बॉयलर सर्व्हीसींगचे वार्षिक सर्व्हीस कॉंट्रॅक्ट दिलेले आहे. स्टीम बॉयलरला इंधन म्हणून एल.पी. गॅसचा वापर करणेत येतो. दिनांक २८.९.२०१३ रोजी RXD ८५० बॉयलरच्या गॅस लाईनचे रेग्युलेटर व सेफ्टी व्हॉल्व खराब झालेमुळे बंद झालेला आहे.

थरमॅक्स कंपनीचे अधिकृत डिलर मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना बॉयलर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे. त्यांचे टेक्निशियन हे दिनांक ८.१०.२०१३ ते १२.१०.२०१३ चार दिवस दुरुस्ती करणेकरीता आलेले होते. परंतु व्हॉल्व व रेग्युलेटरची पुर्ण असेम्ब्ली खराब झालेली असल्याने सदरचे व्हॉल्व नविन खरेदी करावे लागणार आहे. सर्व व्हॉल्व हे इम्पोटेड (मेड इन जर्मनी) आहे. मार्केटमध्ये सदरचे व्हॉल्व व रेग्युलेटर कंपनीचे अधिकृत डिलर व्यतीरिक्त मिळत नाही. त्यामुळे मॅक्सीथर्म वर्क्स,

औरंगाबाद यांचेकडून खरेदी करावे लागणार आहे. दिनांक १४.१०.२०१३ रोजी त्यांनी इमेलद्वारे दरपत्रक दिलेले आहे. दरपत्रकाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | पार्ट नं. | मालाचा तपशील | संख्या | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | P२३SK१००३० | Safety shut Valve | १ | ५०४६०.०० | ५०,४६०.०० |
| २ | P२३RK१०१२० | Regulator | १ | ७६,५७५.०० | ७६,५७५.०० |
| ३ | P२३TK१००३० | Safety Relief Valve | १ | ४५,०६०.०० | ४५,०६०.०० |
| ४ | P२३CK१००१० | Solenoid Valve | १ | २७,५८५.०० | २७,५८५.०० |
| ५ | P२३CK१०११० | Solenoid Valve | १ | ३२,२२०.०० | ३२,२२०.०० |
| ६ | P२३CK१०१२० | Solenoid Valve | १ | १६,४५५.०० | १६,४५५.०० |
| | | | | एकुण | २,४८,३५५.०० |
| | | | | व्हॅट १२.५% | ३१,०४४.३८ |
| | | | | एक्साईज डयुटी १२.३६% | ३०,६९६.६८ |
| | | | | पॅकींग व फॉरवडींग ४% | ९,९३४.४२ |
| | | | | एकुण रक्कम | ३,२०,०३०.२६ |
| | | | | पुर्णांकित रक्कम रुपये | **३,२०,०३०.००** |

**मागणीः-** श्री साईप्रसादालयात प्रसाद भोजन बनविणेकामी RXD -८५० स्टीम बॉयलर कार्यान्वित असणे अत्यंत आवश्यक आहे. उत्सव काळात सदरचा स्टीम बॉयलर बंद असल्याने मुळे RXG- ४०० स्टीम बॉयलर (कमी क्षमतेचा) अविरत कार्यान्वित ठेवावा लागला. प्रसादभोजनातील भात व दाळ बनविणेकामी अडचण येत असल्याने RXD ८५० स्टीम बॉयलर प्रसाद भोजन बनविणेकामी कार्यान्वित असणे अत्यंत आवश्यक आहे. उपरोक्त व्हॉल्व हे इर्म्पोटेड असल्याने कंपनीमध्ये नेहमी स्टॉक मध्ये नसतात. त्यामुळे त्यांना ऑर्डर दिलेनतर एक महिन्यात उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे बॉयलर चालू करणेकरीता उपरोक्त व्हॉल्व खरेदी आवश्यक असून त्याकरीता रक्कम रु. ३,२०,०३०.०० पर्यंत खर्च येणार आहे. सदरच्या खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये मान्यता घेऊन मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना पुरवठा आदेश देता येईल.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमानः-** तांत्रिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** तरी थरमॅक्स कंपनीचे अधिकृत फ्रँचीस मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून उपरोक्तप्रमाणे गॅसचे सेफ्टी व्हॉल्व, रेग्युलेटर व सोलेनॉईड व्हॉल्व खरेदीकरणेकामी व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ३,२०,०३०/- चे खर्चास मान्यता घेणेकामी सदर विषयाची टिपणी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील प्रसादभोजन बनविणेकामी अडचण येऊ नये याकरीता थरमॅक्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून प्रस्तावीत गॅसचे सेफ्टी व्हॉल, रेग्युलेटर व सोलेनॉईड व्हॉल्व खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३,२०,०३०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१३ विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.८५३ मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** दि.१२.०६.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.४०३ (१) नुसार संस्थानचे धनादेश व बँकेस देण्यात येणाऱ्या धनकर्षासाठीच्या पत्रावरील स्वाक्षरीचे संपुर्ण अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणेत यावे, तसेच मा.कार्यकारी अधिकारी यांचे अनुपस्थितीत हे अधिकार मा.उप कार्यकारी अधिकारी यांना असतील असे ठरलेले होते.

आजचे सभेत रक्कम रु.२५,०००/- मात्र मर्यादेपर्यंतच्या धनादेश व बँकेस देण्यात येणाऱ्या धनकर्षासाठीच्या (NEFT/ RTGS) पत्रावरील स्वाक्षरीचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार अबाधित ठेवून त्यांचेबरोबरीने मा.उपकार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणेत आले.

मा.कार्यकारी अधिकारी यांचे अनुपस्थितीत वरील संपुर्ण अधिकार मा.उप कार्यकारी अधिकारी यांना असतील. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

वरील निर्णय क्र. ८०६ ते ८५३ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०६.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (अजय मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी

**निर्णय क्र.८३४** यावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे मुद्येनिहाय मान्यता देण्यात आली.

**मुद्या क्र.१ :-** निर्णय क्र.६४७/२९.०७.२०१२ अन्वये राजीव गांधी आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासन नियुक्त नॅशनल इन्शुरन्स कंपनीशी करण्यात आलेल्या करारातील (MOU) अटी-शर्तीस अनुसरुन प्रत्यक्ष कार्यवाही संबंधित होणाऱ्या गाईडलाईन्सप्रमाणे संबंधित विभागाने कामकाज करण्यास व आर्थिक बाबींशी निगडीत अटी-शर्तीत काही बदल झाल्यास त्यास मा.व्य.समितीची मान्यता घेऊन लाभार्थी रुग्णासाठी सदर योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली.

**मुद्या क्र.२ :-** MOU मधील अट-शर्त क्र.६.९ अन्वये, हॉस्पिटलने रुग्णास आवश्यक असलेले ब्लड उपलब्ध करुन देण्यासाठी मदत आणि सेवा द्यावी. हॉस्पिटलची ब्लडबँक असल्यास त्यामध्ये असलेल्या ब्लडच्या उपलब्धतेनुसार व मंजुर पॅकेजमध्ये असल्याप्रमाणे उपलब्ध करुन द्यावे. उपलब्ध नसल्यास इतर ठिकाणावरुन मिळविण्याचा प्रयत्न करणे. तसे पत्र हॉस्पिटल रुग्णाला देईल. तसेच वैद्यकीय उपचारादरम्यान व उपचारानंतर फालोअपसाठी औषधे पुरविणे आवश्यक आहे. खरेदी विभागाने अशा औषधांचे वार्षिक खरेदीत संबंधित डॉक्टरांच्या सल्ल्याने नियोजन करावे. औषधे शिल्लक नसल्यास मा.व्य.स. निर्णय क्र.२५४/२६.०३.२०११ अन्वये मासिक रु.१,५०,०००/- पर्यंत व त्यापेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याची खरेदी करुन बिले अदा करुन नोंद घेण्यासाठी प्रस्ताव मा.व्य.स. चे सभेपुढे नोंद घेण्यासाठी ठेवण्यास अनुसरुन खरेदी विभागाने तातडीने औषध खरेदी करुन लाभार्थी रुग्णांना औषधे उपलब्ध करुन द्यावीत व विहीत कार्यपध्दतीने आवक नोंदी घेऊन बिले वित्त विभागामार्फत अदायगीसाठी सादर करावी. संबंधित डॉक्टरांनी सदर औषधे देतांना याची काळजी घ्यावी, कोणत्याही परिस्थितीत रुग्णनिहाय थेट औषध खर्च परतावा देण्यात येऊ नये.

**मुद्या क्र.३ :-** MOU अट-शर्त क्र.८/Annexure-C अन्वये मंजुर पॅकेज बिल एका ओळीचे (One Line Bill) बिल सादर करणेबाबत मान्य केले आहे. Pre-Authorisation (मंजुरी) डबल स्टेंन्ट/व्हॉल्व्/IABP साठी असेल व अपवादात्मक प्रसंगी प्रत्यक्ष उपचारात कमी वापर झाला असल्यास साहजीकच त्याप्रमाणे मंजुर पॅकेज अनुसार बिल सादर करणे आवश्यक आहे. तर मंजूर पॅकेज ऐवजी जास्त किंमतीचे अथवा स्टेंन्ट/व्हॉल्व् वापरल्यास मंजूर पॅकेज व्यतिरीक्त वाढीव बिल सादर करावे. संबंधित डॉक्टरांनी रुग्णांच्या आयपीडी फाईलमध्ये त्यांची अनिवार्यता असल्याचे स्पष्ट नमूद करावे. सदर रक्कम प्राप्त न झाल्यास त्याचे स्वतंत्र विवरण मा.व्य.समितीच्या सभेत मांडून त्यास मान्यता घेण्यात यावी.

तरी MOU प्रमाणे कार्यवाही करण्यास व अपवादात्मक परिस्थीतीत डॉक्टरांनी प्रत्यक्ष वैद्यकीय उपचार करतांना लाभार्थीच्या जिवितास धोका पोहचणार नाही यासाठी काही आर्थिक बोजाही सहन करावा लागणार असल्यास प्रसंगावधानाने उपचार करावे व आर्थिक बोजाचे सविस्तर कारण रुग्णाच्या आयपीडी फाईलमध्ये नमुद करावे, वैंद्यकीय संचालक यांनी सदर बाबीची पडताळणी करुन नियमानुसार बिलात आकारणी करुन वसुली अथवा सवलत द्यावी. तथापी कायमस्वरूपी असा आर्थिक बोजा पडणार असल्यास धोरणात्मक निर्णय घेण्यायसाठी मा.व्य.स. च्या सभेपुढे सादर करावे असे ठरले.

**निर्णय क्र.८३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील मुद्दा क्र.१** व **मुद्दा क्र.२** मधील, बाबींस अनुसरून योजनेचे दैनंदिन कामकाज, अकौंटींग व लेखा परिक्षण इ.बाबत कायम स्वरूपी मान्यता देण्यात आली.

**मुद्दा क्र.३** बाबत, सदर योजने अंतर्गत MoU करण्यापुर्वी संबंधित विमा कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी व मा.त्रिसदस्यीय व्य.स.सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली असता, संबंधित विमा कंपन्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी असे प्रतिपादन केले होते की, काही प्रोसिजर्स्‌साठी पॅकेज दर कमी असले तरी, इतर काही प्रोसिजर्स्‌च्या पॅकेजेस्‌ दर जास्त असल्याने, हॉस्पिटलला Counter Subsidy मिळुन, हॉस्पिटलचे आर्थिक नुकसान होणार नाही, त्यास अनुसरून, मंजुर पॅकेज (Society Approval) नुसार खालील, **मुद्दा क्र.२,** मध्ये नमुद करण्यात आलेले विविध प्रकारचे इमप्लांटस्‌ वापरून करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रियांची बिले सोडुन, इतर बिले सादर करण्यात यावीत व खालील बाबतीत पुढील प्रमाण बिले सादर करण्यात यावीत असे ठरले:-

**१.** एखादया रूग्णास ठराविक पॅकेज रक्कम मंजुर झालेली असेल, परंतु, कोणत्याही कारणामुळे, सदर रुग्णाचे उपचार/ शस्त्रक्रिया करण्यात आलेली नसल्यास उदा.Cancelled, Postponed, Abon1dened Procedures इ., अशा रूग्णाचे हॉस्पिटलचे प्रत्यक्ष झालेल्या रकमेचे बिल (Actual Bill Amount) विमा कंपनीस सादर करण्यात यावे.

**२.** तसेच, एखादया रूग्णास २ स्टेंटस्‌च्या ॲजिओप्लास्टीसाठी किंवा २ हॉल्वज्‌ बदलण्याच्या हृदय शस्त्रक्रियासाठी, By-Pass with IABP साठी पॅकेज रक्कम मंजुर आलेली असेल, परंतु, प्रत्यक्षात ॲजिओप्लास्टीसाठी १ च स्टेंट किंवा वॉल्ह बदलण्याच्या हृदय शस्त्रक्रियासाठी १ च हॉल्व वापरण्यात आलेला असल्यास किंवा By-Pass शस्त्रक्रियासाठी IABP वापरण्यात आलेला नसल्यास, अशा रूग्णांचे जादा मंजुर पॅकेज रकमेनुसार बिल सादर न करता, MoU अंतर्गत मंजुर पॅकेज रकमेनुसार (दर पत्रक), १ स्टेंटच्या ॲजिओप्लास्टीचे, १ हॉल्व बदलण्याच्या हृदय शस्त्रक्रियेचे किंवा By-Pass without IABP शस्त्रक्रियेचे बिल सादर करण्यात यावे.

**३.** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि.१४.२.२०१३ पासुन सदर योजनेची अंमलबजावणी चालु करण्यात आल्या पासुन, उपरोक्त इतिवृत्त मंजुर होवुन, लागु होण्याच्या तारखे पर्यंतच्या काळातील दाखल करण्यात आलेल्या मागील सर्व (Paid, Unpaid) बिलांमध्ये कोणताही बदल करता येवु शकणार नाही, उदा.बिलांमध्ये फेरबदल करून बिले पुन्हा सादर करणे इ., तरी, सदर बाबीस अकौंटींग व लेखा परिक्षण इ.बाबत कायम स्वरूपी मान्यता देण्यात आली.

**४.** तसेच, पुढील काळात, सदर योजना श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये चालु करण्यात आल्यास, श्री साईनाथ हॉस्पिटलच्या MoU व्यतिरीक्त, उपरोक्त सर्व बाबी, श्री साईनाथ हॉस्पिटलसाठी सुध्दा लागु रहातील किंवा तत्कालीन परिस्थिती व गरजेनुसार, त्या मध्ये बदल करता येवु शकतील, असे ठरले.

**निर्णय क्र.८३४ यावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे मुद्येनिहाय मान्यता देण्यात आली.**

**मुद्या क्र.१:-** निर्णय क्र.६४७/२९.०७.२०१२ अन्वये राजीव गांधी आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासन नियुक्त नॅशनल इन्शुरन्स कंपनीशी करण्यात आलेल्या करारातील (MOU) अटी-शर्तीस अनुसरुन प्रत्यक्ष कार्यवाही संबंधित होणाऱ्या गाईडलाईन्सप्रमाणे संबंधित विभागाने कामकाज करण्यास व आर्थिक बाबींशी निगडीत अटी-शर्तीत काही बदल झाल्यास त्यास मा.व्य.समितीची मान्यता घेऊन लाभार्थी रुग्णासाठी सदर योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली.

**मुद्या क्र.२:-** MOU मधील अट-शर्त क्र.६.९ अन्वये, हॉस्पिटलने रुग्णास आवश्यक असलेले ब्लड उपलब्ध करुन देण्यासाठी मदत आणि सेवा द्यावी. हॉस्पिटलची ब्लडबँक असल्यास त्यामध्ये असलेल्या ब्लडच्या उपलब्धतेनुसार व मंजुर पॅकेजमध्ये असल्याप्रमाणे उपलब्ध करुन द्यावे. उपलब्ध नसल्यास इतर ठिकाणावरुन मिळविण्याचा प्रयत्न करणे. तसे पत्र हॉस्पिटल रुग्णाला देईल. तसेच वैद्यकीय उपचारादरम्यान व उपचारानंतर फालोअपसाठी औषधे पुरविणे आवश्यक आहे. खरेदी विभागाने अशा औषधांचे वार्षिक खरेदीत संबंधित डॉक्टरांच्या सल्ल्याने नियोजन करावे. औषधे शिल्लक नसल्यास मा.व्य.स. निर्णय क्र.२५४/२६.०३.२०११ अन्वये मासिक रु.१,५०,०००/- पर्यंत व त्यापेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याची खरेदी करुन बिले अदा करुन नोंद घेण्यासाठी प्रस्ताव मा.व्य.स. चे सभेपुढे नोंद घेण्यासाठी ठेवण्यास अनुसरुन खरेदी विभागाने तातडीने औषध खरेदी करुन लाभार्थी रुग्णांना औषधे उपलब्ध करुन द्यावीत व विहीत कार्यपध्दतीने आवक नोंदी घेऊन बिले वित्त विभागाकडे अदायगीसाठी सादर करावी. संबंधित डॉक्टरांनी सदर औषधे देतांना याची काळजी घ्यावी, कोणत्याही परिस्थितीत रुग्णनिहाय थेट औषध खर्च परतावा देण्यात येऊ नये.

**मुद्या क्र.३:-** MOU अट-शर्त क्र.८/Annexure-C अन्वये मंजुर पॅकेज बिल एका ओळीचे (One Line Bill) सादर करणेबाबत मान्य करणेत आले. Pre-Authorisation (मंजुरी) डबल स्टेंन्ट/व्हॉल्व्/IABP साठी असेल व अपवादात्मक प्रसंगी प्रत्यक्ष उपचारात कमी वापर झाला असल्यास साहजीकच त्याप्रमाणे मंजुर पॅकेज अनुसार बिल सादर करणे आवश्यक राहील.

तरी MOU प्रमाणे कार्यवाही करण्यास व अपवादात्मक परिस्थीतीत डॉक्टरांनी प्रत्यक्ष वैद्यकीय उपचार करतांना लाभार्थीच्या जिवितास धोका पोहचणार नाही यासाठी काही आर्थिक बोजाही सहन करावा लागणार असल्यास प्रसंगावधानाने उपचार करावे व आर्थिक बोजाचे सविस्तर कारण रुग्णाच्या आयपीडी फाईलमध्ये नमुद करावे, वैंद्यकीय संचालक यांनी सदर बाबीची पडताळणी करुन नियमानुसार बिलात आकारणी करुन वसुली अथवा सवलत द्यावी. तथापी कायमस्वरूपी असा आर्थिक बोजा पडणार असल्यास धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादर करावे. तसेच, पुढील काळात, सदर योजना श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये चालु करण्यात आल्यास, श्री साईनाथ हॉस्पिटलच्या MoU व्यतिरीक्त, उपरोक्त सर्व बाबी, श्री साईनाथ हॉस्पिटलसाठी सुध्दा लागु रहातील किंवा तत्त्कालीन परिस्थिती व गरजेनुसार, त्या मध्ये बदल करता येवु शकतील, असे ठरले.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

## दि.१८.१०.२०१३ चे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **संस्थान वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता वाढीव साठवण तलाव तयार करणे, नविन स्वयंचलीत जलशुध्दीकरण केंद्र उभारणे, ओव्हर हेड टँक (ESR) जलवाहिन्या टाकणे इ. कामांबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे साठवण तलाव व जलशुध्दीकरण केंद्र मौजे कनकुरी ग्रामपंचायत हद्दीमध्ये आहे. साठवण तलाव व जलशुध्दीकरण केंद्र इ.ची कामे १९९२ साली पुर्ण करण्यात आलेली आहेत. सदरहु योजना ही मौजे कनकुरी, मौजे पिंपळवाडी व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची संयुक्त योजना आहे. सदरहु योजनेव्दारे मंदिर परिसर, संस्थान भक्तनिवासस्थाने, स्टाफ क्वॉर्टर्स, श्री साईप्रसादालय, मौजे कनकुरी, मौजे पिंपळवाडी येथे शुध्दीकरण केलेल्या पाण्याचा पुरवठा केला जातो.

**पाणी पुरवठा योजनेचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे-**

| अ.नं. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| ०१ | पाणी पुरवठा योजना कधीपासून कार्यान्वित करणेत आली. | सन १९९२ |
| ०२ | महिन्याला इरिगेशन विभागाकडुन घेण्यात येणारे सरासरी पाणी. | १२,५९,१०,३३३ लिटर्स. |
| ०३ | साठवण तलावाची क्षमता. | ३३२ एम.एल. |
| ०४ | साठवण क्षमता किती दिवस पुरते. (सर्वसाधारण गर्दीचे काळात) | ४० ते ४५ दिवस. |
| ०५ | साठवण तलावात उन्हाळयात अथवा गर्दीच्या काळात किती दिवस पाणी पुरते. | ३० ते ३५ दिवस. |
| ०६ | २४ तासात अंदाजे सरासरी किती दिवस पाणी पुरवठा करण्यात येतो. | ३८ ते ४० लाख लिटर्स. |

कनकुरी साठवण तलाव येथे संस्थानचे तीन साठवण तलाव आहेत. सदरहु तलावांची एकुण क्षमता ही ३३२ एम.एल. इतकी आहे. सर्वसाधारण गर्दीचे काळात व पावसाळा तसेच हिवाळयात सदरहु साठवण तालावातील पाणी हे साधारणतः ४० ते ४५ दिवस पुरते. गर्दीचे काळात, उत्सव कालावधीत व उन्हाळयामध्ये साठवण तलावातील पाणी हे ३० ते ३५ दिवस पुरते. संस्थान साठवण तलावाचे लगतचे स्थानिक शेतकऱ्यांचे विहीरी व बोअरवेलची संख्या मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे साठवण तलावातील पाण्याचे गळतीचे प्रमाणही मोठया प्रमाणात वाढलेले आहे.

संस्थानचा दैनंदिन पाणी वापर मोठया प्रमाणावर वाढलेला आहे. मात्र फिल्टर प्लँट क्षमता पुर्वीचीच असल्याने शुध्द केलेल्या पाण्याचा पुरवठा कमी पडत आहे. आजची व भविष्यातील वाढीव पाण्याची गरज लक्षात घेता नविन वाढीव फिल्टर प्लँटची आवश्यकता निर्माण झालेली आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे मार्गदर्शन मागितले असता, त्यांचे प्रतिनिधींनी प्रत्यक्ष पाहणी करून त्यानुसार सन २००७-२००८ मध्ये स्केलेटन प्रोजेक्ट तयार केला. त्या योजनेचे अंदाजे रु. ३,२६,५६,१८७/- मात्रचे इस्टिमेट दिलेले होते. त्याप्रमाणे सदरचे खर्चावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मागणी केलेली २% रक्कम रु. ६,५३,१२२/- मात्रची रक्कम त्यांचेकडे भरणा करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०७.२००७ रोजी झालेल्या सभेतील आयत्या वेळचा विषय नं. ३२, निर्णय क्रमांक ६२७ नुसार मान्यता घेण्यात येवून रु. ६,५३,१२२/- मात्रची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे भरणा करण्यात आली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सर्व्हेनुसार व त्यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि. १६.०३.२००८ चे सभेतील निर्णय क्रं.२५२ नुसार एकुण रु.७,४८,६५,५४०/- मात्रचे खर्चास तत्वतःमान्यता घेण्यात आलेली होती. त्यानुसार संस्थानमार्फत कंन्सलटंटची नियुक्ती करुन काम करणेसाठी प्रस्ताव मागविण्यात आले. त्यानुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबत दि. ०३.०१.२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा वाटाघाटी करण्यात येवून सभेतील निर्णय क्रं. १४ अन्वये किर्लोस्कर कंन्सलटंट प्रा.लि. पुणे यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली.

दि. ०६.०३.२०१० रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत किर्लोस्कर कंन्सलटंट यांची सेवा समाप्त करुन इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांची कन्सलटंट म्हणून नेमणून करण्यात यावी, तसेच तसेच उपरोक्त कामांसाठी सर्व निविदा रद्द करुन नव्याने निविदा मागविण्यात याव्या असे ठरले.

दि. ०५.०९.२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत वाढीव क्षमतेच्या स्वयंचलित जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे, ओव्हर हेड टँक उभारणे, जलवाहिन्या टाकणे इ. कामांसाठी येणारे रु. २८.१६ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांना सल्ला सेवा पुरविण्याकरीता प्रकल्पाच्या किमतीचे ३% अधिक सर्व्हिस टॅक्स इतकी फी आदा करण्यात यावी असे ठरले.

त्यानुसार दि.११/१०/२०१० रोजीचे वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे को-या निविदा विक्री करणेसाठी दि.११/१०/२०१० ते दि.३०/१०/२०१० अखेर कालावधी ठेवण्यात आला होता. सदरहू मूदतीत खालील ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

१. Laxmi Civil Engineering Services Pvt. Ltd; Kolhapur.
२. Pratibha Industries Ltd; Mumbai.
३. IVRCL Infrastructure & Projects Ltd; Pune.
४. Kirloskar Brothers Ltd; Pune.
५. K J Infrastructure Projects (I) Pvt. Ltd; Pune.
६. Megha Engineering & Infrastructure Ltd; Hyderabad.

उपरोक्त निविदाधारकांपैकी खालील ०३ ठेकेदारांनी विहित मुदतीत सिलबंद निविदा सादर केलेल्या होत्या.

| Sr.No. | Name of Contractor |
|---|---|
| ०१ | Megha Engineering &Infrastructure Ltd; Hyderabad. |
| ०२ | Pratibha Industries Ltd; Mumbai. |
| ०३ | Laxmi Civil Engineering Services Pvt. Ltd;Kolhapur. |

तरी उपरोक्त तीन (०३) निविदा सादरकर्त्यांनी सादर केलेल्या सिलबंद निविदा उघडून त्यावर चर्चा तथा वाटाघाटीने निर्णय होणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेपुढे ठेवण्यात आलेल्या होत्या.

यावर सविस्तर चर्चा होवून, संस्थानला वाढीव पाणी पुरवठा होणेसाठी लोकवर्गणीच्या १०% रक्कम भरुन या योजनेसाठी अनुदान मंजुर करुन घेणेसाठी मा. मंत्री महोदय यांची तारीख घेवून, त्यांचे समवेत मा.विश्वस्तांच्या समितीने बैठक लावून चर्चा करावी व अनुदान मंजुर करुन घेणेसाठी प्रयत्न करावे तसेच यापुर्वी संस्थानकरीता थेट दारणा व निळवंडे धरणांतून पाणी आणणेकामी सर्व्हे करण्यात आलेला आहे. त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीस सादर करावा असे ठरले.

त्यानंतर मा.ना.प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांची मा.श्री. जयंतराव ससाने अध्यक्ष व मा.श्री. शंकरराव कोल्हे उपाध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी भेट घेवून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नविन वाढीव पाणीपुरवठा योजना करणेबाबत चर्चा केली. चर्चेत मा.मंत्री महोदय यांनी संबंधीत अधिका-यांना याबाबत सत्वर कार्यवाही करणेबाबत सुचना दिल्या. प्रधान सचिव पाणी पुरवठा यांनी याकामी लगतच्या ग्रामपंचायत व शिर्डी संस्थान यांनी १० % वर्गणीचा ठराव जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडे द्यावा अशा सुचना दिल्या. मा. व्यवस्थापन समितीच्या बैठकीत दि. १३/०२/२०११ रोजी विषय नं.०४ निर्णय क्रं.०४ अन्वये सदर योजनेवर होणा-या एकुण अंदाजपत्रकीय रकमेच्या १०% इतकी रक्कम लोकवर्गणीचे स्वरुपात शासनाकडे भरणेस मान्यता देण्यात देण्यात आली.

त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत निळवंडे धरण उद्‌भव घेवून पुन्हा नव्याने सर्वेक्षण, अंदाजपत्रक व आराखडे तयार करणेसाठी त्यांना एकुण अंदाजपत्रकीय रकमेच्या २% इतके Preparation Charges भरावे लागणार असल्याने दि. २४.०९.२०११ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रं. ७४५ नुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे मागणीनुसार सर्व्हेक्षण करणेसाठी तूर्त सध्या रु. १० लाख मात्र रक्कम आदा करणेस मान्यता देणेत आली. त्यानुसार सदरची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना आदा करण्यात आलेली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण विभाग, संगमनेर यांचे जा.क्रं./ताशां/ २०१/२०१३, दिनांक ०६.०२.२०१३ चे पत्र माहीतीसाठी संस्थान कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदरच्या पत्रात वाढीव शिर्डी संस्थान, कनकुरी, पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजनेची ढोबळ किंमत सन २०११-२०१२ चे दरसुची नुसार रु. २५०६९.११ लक्ष मात्र इतकी नमूद करण्यात आलेली आहे. संस्थानचे नविन वाढीव पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून इकडील कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत.

सन २०१८ मध्ये शताब्धी महोत्सव साजरा करण्यात येणार असल्याने सदर योजनेचे कामांबाबत दिनांक ११/१०/२०१३ रोजी मे.इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री आशिष दोषी हे शिर्डी येथे आले असता, मा. कार्यकारी अधिकारी साहेब, वरिष्ठ मुख्य अभियंता, बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे समवेत झालेल्या चर्चेप्रमाणे त्यांनी संस्थानचे वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता वाढीव साठवण तलाव तयार करणे, कनकुरी साठवण तलाव ते ओव्हर हेड टॅंक (ESR) व पुढे संस्थान परिसर, साईप्रसाद, नविन भक्तनिवासस्थान, साईआश्रम प्रकल्प भाग १ व भाग २ व वाढीव फिल्टर प्लॅंट इ. कांमासाठी नव्याने सल्ला सेवा पुरविण्याची तयारी दर्शविलेली आहे.

सन २०१० मध्ये वाढीव क्षमतेच्या स्वयंचलित जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे, ओव्हर हेड टँक उभारणे, जलवाहिन्या टाकणे इ. कामांसाठी रु. २८.१६ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. आता चालू डि.एस.आर. दरानुसार सदर अपेक्षित खर्चात वाढ होणार आहे. याबाबत मा. कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात दि. ११/१०/२०१३ रोजी झालेल्या बैठकीत मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. २२१ पै व २४५ मधील संस्थान मालकीचे जमिनीत नवीन आर.सी.सी. साठवण तलावाचे बांधकाम करुन दुस-या टप्प्यात सध्याचे साठवण तलावाचे नूतनीकरण कामाचा समावेश करावा अशी चर्चा झाली आहे. त्यानुसार में. इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. आशिष दोषी यांचेशी चर्चा करुन त्यांना नियोजीत प्रकल्पासाठी अपेक्षित खर्चाचा अंदाज कळविणे बाबत विनंती करण्यात आली. त्यानुसार त्यांनी नविन आर.सी.सी. साठवण तलावाचे बांधकाम करणे, सध्याचे साठवण तलावाचे आर.सी.सी. बांधकाम करुन नुतनीकरण करणे, डब्ल्यू.टी.पी., पंपींग मशिनरी, रायझिंग मेन, डिस्ट्रीब्यूशन, इ.एस.आर., बॉटलिंग प्लान्ट, एक्सप्रेस. फिडर, इत्यादी कामांचा समावेश असलेल्या नविन वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार एकूण रुपये १३४.२४ कोटी मात्र इतका अपेक्षित खर्च कळविला असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **Description** | **Amount in Rs. Crores** | |
|---|---|---|
| Cost of Tednder floated in Oct २०१० | २८.१६ | Crore |
| Increase due to DSR rates | ८.४५ | Crore |
| New Balancing Tank (RCC, ३०० ML) | ३०.३० | Crore |
| Pumping machinery and Rising Main for new balancing tank | ५.०० | Crore |
| Modification of Existing Balancing Tank (Earthen ३३२ ML to RCC ५५० ML) | ४८.६० | Crore |
| Express Feeder | २.५० | Crore |
| Bottling Plant | १.०० | Crore |
| **Total** | **१२४.०१** | **Crore** |
| Contingencies ५% | ६.२० | Crore |
| Design and PMC ३% | ३.७२ | Crore |
| Technical santion ०.२५% | ०.३१ | Crore |
| **Total Block cost** | **१३४.२४** | **Crore** |

तरी संस्थान करीता वरील प्रमाणे वाढीव पाणी पुरवठा योजना प्रकल्प हाती घेण्यास व त्यासाठी येणारे रुपये १३४.२४ कोटी मात्रचे प्राथमिक ढोबळ अंदाजे खर्चास तत्वत: मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदर प्रकल्पासाठी सविस्तर प्लॅन इस्टीमेंटसह, डि.पी.आर.( Detailed Project Report) तयार करणेसह सर्व समावेशक प्रकल्प व्यवस्थापन सल्लासेवा (Project Management Consultancy Services) पुरविणेसाठी में. इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांची ३% (तीन टक्के) अधिक सर्व्हीस टॅक्स यापूर्वीचेच मंजुर फी व अटी शर्तीवर नेमणूक करणेस मान्यता मिळणेस विनंती.

में. इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. आशिष दोषी हे वरील प्रमाणे नियोजित प्रकल्पाचे सादरीकरण करणेसाठी आजचे सभेपुढे उपस्थित आहेत. तरी त्यांचे सादरीकरण पाहून उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८५१** **आजचे सभेत में. इन्फ्राप्लॅन इंजिनिअरींग सर्व्हीसेस प्रा.लि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. आशिष दोषी हे उपस्थित होते. त्यांनी उपरोक्त प्रस्तावीत प्रकल्पाचे सभेपुढे सादरीकरण केले .**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी वाढीव पाणीपुरवठा योजना करणेकामी थेट निळवंडे धरणातून पाणी आणण्याचे नियोजन आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करणेत यावा.**

**तसेच याबाबत योजनेचे सादरीकरण व चर्चा करणेसाठी अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना मंडळ, अहमदनगर यांना सभेपुढे बोलवण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------

**निर्णय क्र.८३४ यावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे मुद्येनिहाय मान्यता देण्यात आली.**

**मुद्दा क्र.१:-** निर्णय क्र.६४७/२९.०७.२०१२ अन्वये राजीव गांधी आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासन नियुक्त नॅशनल इन्शुरन्स कंपनीशी करण्यात आलेल्या करारातील (MOU) अटी-शर्तीस अनुसरुन प्रत्यक्ष कार्यवाही संबंधित होणाऱ्या गाईडलाईन्सप्रमाणे संबंधित विभागाने कामकाज करण्यास व आर्थिक बाबींशी निगडीत अटी-शर्तीत काही बदल झाल्यास त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन लाभार्थी रुग्णासाठी सदर योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली.

**मुद्दा क्र.२:-** MOU मधील अट-शर्त क्र.६.९ अन्वये, हॉस्पिटलने रुग्णास आवश्यक असलेले ब्लड उपलब्ध करुन देण्यासाठी मदत आणि सेवा द्यावी. हॉस्पिटलची ब्लडबँक असल्यास त्यामध्ये असलेल्या ब्लडच्या उपलब्धतेनुसार व मंजुर पॅकेजमध्ये असल्याप्रमाणे उपलब्ध करुन द्यावे. उपलब्ध नसल्यास इतर ठिकाणावरुन मिळविण्याचा प्रयत्न करणे. तसे पत्र हॉस्पिटल रुग्णाला देईल. तसेच वैद्यकीय उपचारादरम्यान व उपचारानंतर फालोअपसाठी औषधे पुरविणे आवश्यक आहे. खरेदी विभागाने अशा औषधांचे वार्षिक खरेदीत संबंधित डॉक्टरांच्या सल्ल्याने नियोजन करावे. औषधे शिल्लक नसल्यास मा.व्य.स. निर्णय क्र.२५४/२६.०३.२०११ अन्वये मासिक रु.१,५०,०००/- पर्यंत व त्यापेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याची खरेदी करुन बिले अदा करुन नोंद घेण्यासाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे नोंद घेण्यासाठी ठेवण्यास अनुसरुन खरेदी विभागाने तातडीने औषध खरेदी करुन लाभार्थी रुग्णांना औषधे उपलब्ध करुन द्यावीत व विहीत कार्यपध्दतीने आवक नोंदी घेऊन बिले वित्त विभागाकडे अदायगीसाठी सादर करावी. संबंधित डॉक्टरांनी सदर औषधे देतांना याची काळजी घ्यावी, कोणत्याही परिस्थितीत रुग्णनिहाय थेट औषध खर्च परतावा देण्यात येऊ नये.

तसेच, एखाद्या रुग्णास ठराविक पॅकेज रक्कम मंजुर झालेली असेल परंतु, कोणत्याही कारणामुळे, सदर रुग्णाचे उपचार/ शस्त्रक्रीया करण्यात आलेली नसल्यास उदा. Cancelled, Postponed, Abondened Procedures इ. अशा रुग्णाचे हॉस्पिटलमध्ये झालेल्या प्रत्यक्ष रकमेचे बिल (Actual Bill Amount) विमा कंपनीस सादर करण्यात यावे व मेडीसीन विभागातील रुग्णांची बीले मंजूरी पेक्षा कमी झालेली असली तरीही अशा रुग्णांची बिले Society Approval नुसार सादर करण्यात यावीत.

**मुद्दा क्र.३:-** MOU अट-शर्त क्र.८/ Annexure-C अन्वये मंजुर पॅकेज बिल एका ओळीचे (One Line Bill) सादर करणेबाबत मान्य करणेत आले. Pre-Authorisation (मंजुरी) डबल स्टेंन्ट/ व्हॉल्व्/ IABP साठी असेल व अपवादात्मक प्रसंगी प्रत्यक्ष उपचारात कमी वापर झाला असल्यास साहजीकच त्याप्रमाणे मंजुर पॅकेज अनुसार बिल सादर करणे आवश्यक राहील.

तरी MOU प्रमाणे कार्यवाही करण्यास व अपवादात्मक परिस्थीतीत डॉक्टरांनी प्रत्यक्ष वैद्यकीय उपचार करतांना लाभार्थीच्या जिवितास धोका पोहचणार नाही यासाठी काही आर्थिक बोजाही सहन करावा लागणार असल्यास प्रसंगावधानाने उपचार करावे व आर्थिक बोजाचे सविस्तर कारण रुग्णाच्या आयपीडी फाईलमध्ये नमुद करावे, वैंद्यकीय संचालक यांनी सदर बाबीची पडताळणी करुन नियमानुसार बिलात आकारणी करुन वसुली अथवा सवलत द्यावी. तथापी कायमस्वरूपी असा आर्थिक बोजा पडणार असल्यास धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादर करणेत यावे, असे ठरले.